महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# वार्षिक अहवाल
# २००७-२००८








# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. मर्यादित

## वार्षिक अहवाल
## २००७-२००८



Mahajenco Marathi notice.indd 1 5/29/2009 7:07:22 PM

# वार्षिक अहवाल २००७-२००८

## अनुक्रमणिका


| तपशील | पान क्रमांक |
|---|---|
| संचालक मंडळ (वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत) | ३ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य | ५ |
| महानियंत्रक व महालेखा परिक्षकांच्या अहवालाला उत्तर | ९ |
| लेखा परिक्षकांच्या अहवाल | १६ |
| सूचना (वार्षिक सर्वसाधारण सभा) | २१ |
| संचालक मंडळाचा अहवाल | २४ |
| लेखा परिक्षकांच्या अहवालातील बाबींचा खुलासा | ३७ |
| आर्थिक ताळेबंद | ४४ |
| नफा-तोटा विवरण | ४५ |
| ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची | ४६ |
| नफा तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची | ५१ |
| रोकड प्रवाह विवरण | ७८ |
| कंपनी कायदा १९५६ उपविभाग २१२(३) प्रमाणे विवरण | ८० |




Mahajenco Marathi notice.indd 2 5/29/2009 7:07:22 PM

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. मर्यादित

## संचालक मंडळ

(वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत)

**श्री. पी. अब्राहम**
अध्यक्ष
(दिनांक २९-०७-२००५ पासून)

| | | |
|---|---|---|
| व्यवस्थापकीय संचालक | **श्री. अजय मेहता** | (दिनांक ०२-०२-०९ मध्यान्हपूर्व पर्यंत) |
| | **श्री. सुब्रत रथो** | (दिनांक ०२-०२-०९ मध्यान्हपूर्व पासून) |
| संचालक | **श्री. राहुल अस्थाना** | (दिनांक २६-०८-०८ पासून) |
| संचालक | **श्री. पी. व्ही. पागे** | (दिनांक ०१-१२-०८ पासून) |
| संचालक (वित्त) | **श्री. विनायक राव** | (दिनांक ०१-०६-०७ मध्यान्हपूर्व पर्यंत) |
| | **श्री. जी. जे. गिरासे** | (दिनांक ०१-०६-०७ मध्यान्हपूर्व पासून) |
| संचालक (संचलन) | **श्री. व्ही. टी. बापट** | (दिनांक २६-११-०७ पर्यंत) |
| | **श्री. एम्. आर शेलार** | (दिनांक २७-११-०७ पासून) |
| संचालक (प्रकल्प) | **श्री. व्ही. टी. बापट** | (दिनांक २७-११-०७ पासून दिनांक १३-०३-०९ मध्यान्ह पर्यंत) |



Mahajenco Marathi notice.indd 3 5/29/2009 7:07:22 PM

## महानिर्मिती कंपनी मर्यादित यांच्या ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षाच्या आर्थिक हिशेबावर कंपनी कायदा १९५६, कलम ६१९(४) अन्वये महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे भाष्य

महानिर्मिति कं. मर्यादित यांचे ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षाचे आर्थिक हिशेबावर कंपनी कायदा १९५६ यानी नियम केलेल्या चौकटीच्या आधीन राहून महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी नेमलेले वैधानिक लेखा परिक्षक कंपनी कायदा १९५६ च्या कलम २२७ अन्वये तयार करण्यात आलेल्या या तक्त्यांवर मतप्रदर्शन करण्यास जबाबदार आहेत. सदरचे तक्ते हे त्यांच्याच व्यावसायिक भाग असलेल्या भारतीय सनदी लेखापरिक्षक संस्था यांच्या आदरी लेखापरिक्षण व विमायोजन यांच्याशी सहमत असलेल्या स्वतंत्र लेखा-परिक्षणावर आधारीत आहेत. त्याचा उल्लेख दिनांक ३० सप्टेम्बर २००८ च्या अहवालात आहे.

मी महानियंत्रक व महालेखा परिक्षक भारत सरकार यांच्या वतीने महानिर्मिति कंपनी मर्यादित ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षाच्या कंपनी कायदा १९५६ कलम ६१९(३)(ब) खाली पुरवणी लेखा परिक्षण केले आहे. सदर लेखापरिक्षण हे स्वतंत्रपणे आणि सांविधिक लेखापरिक्षकानी काम केलेल्या कागदपत्रांचा आधार न घेता केलेले आहे. तसेच ते सांविधिक लेखापरिक्षकांकडे करण्यात आलेल्या चौकशी व कंपनीचे अधिकारी व कर्मचारी आणि लेखा परिक्षण नोंदींच्या निवडक परिक्षा याच्याशी प्राथमिक दृष्टिने मर्यादित आहे. माझ्या पुरवणी लेखापरिक्षणाचा आधार घेऊन मी कंपनी कायदा १९५६ च्या कलम ६१९(४) खाली येणाऱ्या खालील महत्वाच्या मुद्यांवर अधिक प्रकाश टाकू इच्छितो जे मुद्दे माझ्या मते आर्थिक तक्ते समर्थपणे आकलन होण्यास गरजेचे आहेत त्याचा संबंध लेखा-परिक्षण अहवालाशी आहे.

**अ नफा/फायदेशीर पण यावर टीप्पणी**

**नफा/तोटा परिपत्रक**

**उत्पन्न**

**वीज विक्रीपासून मिळणारा महसूल: रु ८०८३.१८ कोटी**

१. हे रु. १.२५ कोटीने अधिक दाखवले आहेत. वीजविक्री महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (MSEDCL) त्या यावर विवाद निर्मिलेला असून या बिलाचे पैसे त्यांनी दिलेले नाहीत. विवादित महसूल तक्त्यात दाखवणे गैर आहे, त्यामुळे नफा अधिक दाखवला गेला आहे. (रु. १.२५ कोटीने).

२. या आर्थिक वर्षाचा फायदा रु. १०.६० कोटीनी अधिक दाखवला आहे. याचे कारण महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. मर्यादित यांना केलेली बिले स्वीकारली गेली नाहीत ही देयके (बिले) महावितरण कंपनीच्या चन्द्रपूर वसाहतीला पुरवठा केलेल्या वीजे संबंधी आहेत. चंद्रपूर महा औष्णिक वीज निर्मिति केन्द्र यांना २००६-२००७ व २००७-२००८ या काळामध्ये ही देयके दिली गेली व त्यामुळे या वर्षात वीज विक्री महसूल इथे रु. ५.९६ कोटीनी अधिक दाखवला आहे (या आधिच्या काळाचे उत्पन्न रु. ४.६४ कोटीने जास्त दाखवले आहे.).

**इतर उत्पन्न (अनुसूची १०) रु. १६६.७७ कोटी**

३. इथे उत्पन्न रु. २५.३८ लाख कमी दाखवले आहे कारण राहत्या घरांच्या भाड्याची रक्कम मिळालेली नाही (रु. २०.२ लाख), वजा भाडे (रु. ०.६१ लाख), पाणी पट्टी (रु. ३.५५ लाख) आणि धूळ व्यवस्था/स्वच्छता (CDM) फायदा (रु. १.२० लाख) हे कंत्राटदाराकडून येणे/सीमेन्ट कंपनीचे देणे चंद्रपूर मुक्कामी (STPS) या वर्षकाळात यामुळे होणारा नफा कमी दाखवलेला आहे.



Mahajenco Marathi notice.indd 5 5/29/2009 7:07:22 PM

**खर्च**

**इंधन किंमत रु. ५९९८.१० कोटी**

४. हा खर्च रु. ३.६० कोटीनी कमी दाखवला आहे, कारण त्यात वाहतूक भाडे धरले नाही विशेषत: नाशिकला पाठवलेल्या कोळशाचे भाडे नाशिक औष्णिक वीज निर्मिती केन्द्रासाठी जो पाठवला त्याचा वाहतूक खर्च धरलेला नाही या कारणाने तेवढा नफा जास्त दाखवला आहे. आणि चालू देणी ही पण त्या प्रमाणात कमी दाखवली आहेत.

**घसारा / कर्जफेड तरतूद: रु. २०६.५५ कोटी**

५. ही बाब तक्त्यात रु. १७.०५ कोटी रुपयानी कमी दाखवली आहे व ही हिशेबातील चूक आहे. कारण घसारा हिशेब धरताना गोड्या पाण्याच्या व्यवस्था त्यात तलाव धरून २००७-०८ यांचा घसारा धरला नाही मुख्यत: चन्द्रपूर येथील केन्द्रातील (STPS) यामुळे फायदा अधिक दाखवला जातो आहे आणि स्थावर मालमत्ता रु. १७.०५ कोटीनी अधिक आढळते.

**आर्थिव खर्च म्हणजे निधी उभारण्यासाठी होणारा खर्च रु. १.२१ कोटी**

६. हा खर्च रु. २९.७६ लाखानी कमी दाखवला आहे कारण त्यात व्यवस्था करणाऱ्याची शुल्क रु. २९.७६ लाख दाखवली नाही ही म.रा.वि.पा.कं.मर्या. (MSETCL) ला परत फेड करावयांची आहे. बँक ऑफ इंडिया दीर्घ मुदत कर्जासाठी रु. ७८.०२ कोटी चे जे म.रा.वि.पा.कं.मर्या. (MSETCL) कडून यांचे कडे आले (प्रतिलक्षी परिणामासह) त्यामुळे तेवढा फायदा कमी दाखवला व चालू देणी रु. २९.७६ लाखानी कमी दाखवली.

**ब आर्थिक स्थितीवर शेरे**

**ताळेबंद निधीवापर**

**स्थावर मालमत्ता / एकूण गट अनुसूची (५) रु. ४५९६.०२ कोटी**

७. रू. ७.१९ कोटीनी हे अधिक दाखवले आहेत याचे कारण चुकीचे भांडवलीकरण हे आहे. महसूली खर्च दुरुस्ती देखभाल यावर जो केला आहे. तो भांडवली खर्च धरला आहे. त्याबरोबर तेवढा फायदा, निवेदन आकडे या वर्षासाठी वाढले ते रू. ७.१९ कोटीनी जास्त दाखवले आहे.

८. रू. ६.७० कोटीनी हे कमी दाखवले आहेत कारण त्याचे भांडवलीकरण झाले नाही. हा खर्च रस्ता बांधणी त्या वरील पूल (रोड ओव्हर ब्रिज) जो कंपनीकडून गेली दोन वर्षे वापरात आहे.

यामुळे घसारा रक्कम कमी, फायदा अधिक आणि स्थावर मालमत्ता कमी दाखवणे हे त्याचे परिणाम आहेत याची नक्की आकडेवारी त्याच्या पूर्ततेची तारीख माहित नसल्याने देता येत नाही (ही मालमत्ता महा औष्णिक केन्द्र, चंद्रपूर येथे आहे).

**सध्याची मालमत्ता, कर्जे-अग्रीम रकमा अनुसूची (७)**

**सध्याची मालमत्ता**

**साठा रू. ७४०.६८ कोटी**

९. वरील सर्व रु. ४३.४७ कोटीने अधिक दाखवले आहे. हे भांडवली सुटे भाग जे भांडारात पडून आहेत (३१ मार्च २००८ पर्यन्त) खरेतर हे सर्व भांडवलीकरण करुन हिशेब मांडणी धोरणानुसार, जे कंपनीचेच धोरण आहे हे धोरण बाब क्र. (I)एफ(II) अनुसूची (१५) मधे दाखवले आहे.



Mahajenco Marathi notice.indd 6 5/29/2009 7:07:22 PM

यामुळे घसारा रक्कम रु. १.५७० कोटी कमी दाखवली गेली आहे. (रु. ४३.४७ कोटी ३.६० टक्के दराने) फायदा जास्त दाखवला गेला. रु. १.५७ कोटी ने स्थावर मालमत्ता रु. ४१.९० कोटीने कमी दाखवली गेली. (रु. ४३.४७ कोटी वजा रु. १.५७ कोटी), आणि चालू मालमत्ता रु. ४३.४७ कोटी ही चंद्रपूर महा औष्णिक वीज निर्मिती केन्द्रावर जास्त दाखवली.

**किरकोळ देणेदार रु. १७७४.६१ कोटी**

१०. यात रु. २१.०४ कोटी राज्य सरकारला दिलेली बिले धरली आहेत, सप्टेम्बर २००६ पासून महावितरण कंपनीला दिलेले, ती विवाद्य झाली आहेत व त्याचे येणे आलेले नाही अशा वादग्रस्त महसूलाची रक्कम (२००६-०७) पासून हिशेबात धरणे गैर ठरले आणि त्याची तरतूद करायला हवी होती.

११. हे सर्व रु. ४.३४ कोटी कमी दाखवले आहे. हा खर्च कंपनीने वापरात घेतलेल्या इमारतीवर झालेला आहे. ही इमारत म.रा.वि.मं. मुखत्यार आस्थापना कंपनीकडून भाडेपट्टीने म.रा.वि.नि.कं.ने घेतलेली आहे. हा खर्च त्यांच्या मेमोरंडम ऑफ अंडरस्टॅडींग (MOU) नुसार मिळू शकतो यामुळे त्या प्रमाणात खर्च जास्त दाखवला आहे. आणि फायदा कमी दाखवला गेला (त्याच प्रमाणात).

**क. उघड केलेल्या हिशेबात रोख**

१२. कंपनीच्या ताब्यात तसेच वापरण्यात HSBC इमारत मुंबई फोर्टचा कांही भाग आहे, वितरण कंपनी तसेच पारेषण कंपनी ही याच्या कांही भागाचा वापर करीत आहे. कंपनी २००५ मध्ये स्थापन झाल्यापासून व जी जागा पूर्वकालीन म.रा.वि.मं.ने घेतलेली आहे भाडेपट्टीवर (लीज) म्हणून कुठल्याही प्रकारच्या कराराचे गैरहजेरीत (जे या तीन कंपन्यात व्हायला हवे) या कंपनीने या (लीज) भाडेपट्टी साठी कसलीच तरतूद केलेली नाही यावर जो ज्या प्रमाणात लीज भाडेपट्टी खर्च यांच्या वाट्याला येईल, दुरुस्ती नूतनीकरण यावर जो खर्च होईल, किंवा जागेत वापरली जाणारी वीज इत्यादीचा खर्च याची तरतूद नाही व हे गेली तीन वर्षे असेच चालू आहे महावितरण कंपनीने याचा हिशेब केलेला आहे.

१३ कुठेही याचा उल्लेख किंवा टीप मांडून स्पष्ट केलेले नाही की पारस प्रकल्पासाठी भारत सरकारच्या उर्जा मंत्रालयाने जी अर्थसहाय्य (सबसीडी) दिले त्यावरचे व्याज परतफेड करावयाचे आहे या साठी पीएफसीकडून कर्ज घेतले आहे ते रु. ८.७९ कोटीचे आहे. (रु. ७.११ कोटी रोख मिळाले २००६-०७ या काळात) यातील अटी पूर्ण न झाल्याने कारखाना अेजी-एफ् सी योजनेनुसार ३१ मार्च पर्यन्त पूर्ण न झाल्याने हा भरणा करावयाचा आहे.

१४. ही बाब एखाद्या टिप्पणीद्वारा हिशेब खात्याला कळवलेली नाही. कंपनी (पूर्वीची म.रा.वि.मं.) यानी जानेवारी १९९१ मध्ये २५ एकर जागा कोरांडी औष्णिक वीज केन्द्रापाशी सेन्ट्रल पॉवर रीसर्च इन्स्टीट्यूटला दिली आहे. ही ९९ वर्षांच्या भाडेपट्टीवर दिलेली आहे त्याचे नाममात्र भाडे रु. १/- वर्षाला ठरले असून, तिथे संपूर्ण संशोधन केन्द्र उभारायचे आहे भाडेपट्टी करार अजून झालेली नाही व जमीन सध्या मोकळी आहे ही बाब लेखा खात्याला कळवलेली नाही.

**हिशेबावर टीप्पणी अनुसूची (१५)**

**कंपनीने केलेले दावे (टिप्पणी क्र. २१)**

१५. कंपनीने रु. ७६.४० कोटीचा आगीच्या नुकसान संबंधि दावा विमा संचालक, महाराष्ट्र सरकार यांना २००५-०६ या काळात लावलेला आहे. हा दावा संच क्र. ५ आणि दोन स्टेशन ट्रान्स्फॉर्मर्स यांना १ जुलै २००५ रोजी झालेल्या अपघातात चन्द्रपूर येथे (महा औष्णिक वीज केंद्र) इथे झालेल्या नुकसानी बद्दल आहे अद्यापि हा दावा खात्याला कळवणे आवश्यक आहे.



Mahajenco Marathi notice.indd 7 5/29/2009 7:07:23 PM

**ड. हिशेबतपासनीसांचे अहवालावर शेरे**

१६. हिशेब मांडणीचे धोरण जे सरकारी अनुदान वगैरे हिशेबात दाखवणे बद्दल आहे ते हिशेब तपासनीसाना माहीत करुन दिलेले नव्हते हे खरे तर लेखांकन मानके (AS१२) नुसार गरजेचे सांगितले आहे. या नियमाचे उल्लंघन कलम २२७/३/डी कंपनी कायदा १९५६ हे हिशेब तपासनीसांकडून निर्देश झाला नाही.

१७. हिशेब तपासनीसांनी कंपनीचे ताळेबंद, नफा तोटा पत्रक व रोकड प्रवाह तक्त्यानुसार हे लेखांकन मानकेनुसार आहेत/नाहीत कंपनी कायदा १९५६, कलम २२७(३)(डी) या बद्दल काही बोलत नाही.

१८. खापरखेडा मुक्कामी राख हाताळण्याची यंत्रणा मिळाल्याने निर्माण झालेली मालमत्ता कंपनी या ताळेबंदात दाखवत नाही. ही यंत्रणा SBI लीजींगकडून घेतलेली आहे. त्यासोबत कार्यालयासाठी जागाही मिळाली आहे. कर्मचारी वसाहत पाहुण्यासाठी गेस्ट हाऊस हे सर्व म.रा.वि.मं. मुखत्यार आस्थापना कंपनीकडून आले आहे लेखांकन मानके १९ नुसार हे दाखवणे गरजेचे आहे व याचे उल्लघन करणे हे संविधिक हिशेब तपासनीसांनी निर्देशिले नाही.

१९. हिशेब तपासनीसांचा अहवाल सांगतो की स्थावर मालमत्ता दफ्तरची स्थावर मालमत्ता जी ताळेबंदात दाखवली त्याच्याशी जुळत नाही यांची कारणे त्यानी शोधायला पाहिजेत.

**इ इतर टीप्पणी**

२०. ताळेबंद संक्षिप्त व कंपनीचा सर्व साधारण व्यवहार याला अध्यक्ष व दोन संचालक यांच्या सहीने अधिप्रमाणित केलेले नाही.

**नियंत्रक व महालेखा परीक्षक**
**यांच्यासाठी व यांच्यामार्फत**

**सही**
**महानियंत्रक महालेखापाल**

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: २०/४/२००९**



Mahajenco Marathi notice.indd 8 5/29/2009 7:07:23 PM

## आमच्या हिशेब मांडणीवर सहकारी हिशेबतपासनीसाठी केलेल्या शेरे बगैर व कंपनीचे (MSPGCL) यांचे खुलासे

| क्रमांक | सरकारी हिशेबनीसांचा शेरा | कंपनीचा खुलासा | तपासनीसांचा संविधिक शेरा |
|---|---|---|---|
| अ | **नफादायकतेबद्दल भाष्य**<br>**उत्पन**<br>**वीजविक्रि महसूल रु. ८०८३.१८ कोटी** | | |
| १ | हे रु. १.२५ कोटींनी अधिक दाखवले आहे ज्यात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला केलेली देयके धरली आहेत त्यांनी या देयकाबद्दल वाद उभा केला असून आणि त्याचे पैसे दिले नाहीत अशा वादग्रस्त देयकाचे येणे हिशेबात धरणे गैर आहे आणि म्हणून फायदा रु. १.२५ कोटीनी अधिक दाखवला गेला | हा रु. १.२५ कोटींचा फरक त्या संस्थेबरोबर मिळवणी चर्चा चालू आहे आणि आंतिम निर्णय जो असेल व चर्चा मिळवणी झाल्यावर योग्य प्रकारे दाखवला जाईल | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| २ | या वर्षिचा नफा रु. १०.६० कोटींनी जास्त दाखवला आहे व तोही महाराष्ट्र वीज वितरण कंपनीने काही बिले अमान्य केल्याने. ही बिले या महाराष्ट्र वीज वितरण कंपनीच्या राहत्या घरे कॉलनीला पुरवलेल्या वीजेची आहेत चंद्रपूर महा औष्णिक वीज केंद्र वर्ष २००६-०७ व २००७-२००८ या काळात ती बिले दिली होती. त्यामुळे या वर्षाचा महसूल रु. ५.९६ कोटींनी जास्त दाखवण्यात आला आहे आणि आधिच्या काळातील याचे उत्पन रु. ४.६४ कोटींने अधिक दाखवले आहे. | आपल्या कंपनीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे या वीज पुरवठ्याची बिले स्वीकारण्यासाठी प्रयत्न केले आहेत. तथापि महाराष्ट्र वीज वितरण कंपनीचे म्हणणे आहे की हा वीजपुरवठा महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने केलेला नाही आणि म्हणून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी ही देयके देण्यास बांधील नाही. आपली कंपनी ह्या बाबीसाठी अद्यापि चर्चा करीत असून व पुढील आर्थिक वर्षात म्हणजे २००८ -०९ मध्ये यांचे समायोजन केले जाईल | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| ३ | **इतर उत्पन्न (अनुसूची-१०)**<br>**रु. १६६.७७ कोटी**<br>हे कमी दाखवले असून ते रु. २५.३८ लाखाने कमी भरते कारण यात कर्मचारी वसाहतीच्या राहत्या घरातून येणे असलेले भाडे (रु. २०.२ लाख), भाडेपट्टी (रु. ०.६१ लाख), पाणीपट्टी (रु. ३.५५ लाख आणि साफसफाईचे (सीडीएम) फायदे (रु. १.२० लाख) जे चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्र येथे सीमेन्ट कंपन्या/कंत्राटदार यांच्याकडून येणे होते. यामुळे या वर्षीचा नफा तेवढा कमी दाखवला गेला आहे | आर्थिक वर्ष २००८-०९ या काळात याचा आवश्यक हिशेब नोंदला आहे. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |



Mahajenco Marathi notice.indd 9 5/29/2009 7:07:23 PM

| क्रमांक | सरकारी हिशेबनीसांचा शेरा | कंपनीचा खुलासा | संविधिक शेरा |
|---|---|---|---|
| ४ | **खर्च**<br>**इंधनाचे मोल रु. ५,९९८.१० कोटी**<br>रु. ३.६० कोटीने हा खर्च कमी दाखवला आहे कारण यात नाशिकला पाठवलेल्या कोळशाचे भाडे धरलेले नाही या कारणाने फायदा अधिक दाखवला गेला आणि चालू देणी/देय ही तेवढी कमी दाखवली गेली. | कोळसा वाहतूक पूर्ण झाल्यानंतर त्याचे वाहतूक भाडे दाखवावे लागते आणि म्हणून हे भाडे सुध्दा कोळसा वाहतूक पूर्ण झाल्यावर दाखवले जाईल | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| ५ | **घसारा व भांडवलीकरण:**<br>**रु. २०६.५५ कोटी**<br>हे रु. १७.०५ कोटीनी कमी दाखवले आहे, कारण हिशेबात चूक आहे. चंद्रपूर औष्णिक केन्द्रतील गोड्या पाण्याचा तलाव हा वर्ष २००७-२००८ या काळात घसारा किमतीत धरला नाही यामुळे नफा (स्थावर मालमत्तेवरील) रु. १७.०५ कोटीने जास्त दाखवला गेला | घसारा मोल हिशेबात ही चूक झाली आहे त्यामुळे इतर ठिकाणी घसारा मोल अधिक लावण्याची चूक झाली आहे. रु. १७.०५ कोटी चुकीमुळे नफ्यात वाढले. आवश्यक दुरुस्ती या अर्थ-वर्षात करीत आहे. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| ६ | **अर्थ/पैसे उभारणीचा खर्च**<br>**रु. १.२१ कोटी**<br>हा खर्च रु. २९.७६ लाखानी कमी दाखवला आहे, कारण अर्थसहाय्य मिळवण्याचे शुल्क रु. २९.७६ लाख जी म.रा.वि.पा.मर्या. यांना देणे आहे व हे शुल्क बँक ऑफ इंडियाकडून मुदतीचे कर्ज रु. ७८.०२ कोटी त्यांनी मिळवून दिले. व जे म.रा.वि.पा.मर्या. कडून पूर्वलक्षी परिणामाने कंपनीने घेतले आहे. त्यामुळे नफा तेवढा कमी दाखवला जाऊन चालू देणी रु. २९.७६ लाखानी कमी दाखवली. | या संबधी हे सत्य आहे की म.रा.वि. पा.मर्या. ने कर्ज मिळवून देण्याचे शुल्क रु. २९.७६ लाखाची मागणी केली आहे (कर्ज रु. ७८.०२ कोटी इतके आहे व नंतर हे कर्ज महानिर्मितीकडे आले आहे व त्याबद्दलची देणी पूर्वलक्षी परीणामाने देणे आहेत. तथापि अरेन्जर चा खर्च हा महानिर्मितीने मान्य केलेला नाही, आणि म्हणून तो चालू देणी सदरात दाखवला नाही. आता ही रक्कम आकस्मिक (कान्टीजंट) देणे म्हणून दाखवली जाईल. व ते या आर्थिक वर्षी २००८-२००९ पासून करण्यात येईल. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |



Mahajenco Marathi notice.indd 10 5/29/2009 7:07:23 PM

| क्रमांक | सरकारी हिशेबनीसांचा शेरा | कंपनीचा खुलासा | संविधिक शेरा |
|---|---|---|---|
| ब | **आर्थिक स्थितीवरील भाष्य/निधी-वापर/ स्थावर मिळकत एकूण रक्कम (अनुसूचि ५) रु. ४,५९६.०२ कोटी** | | |
| ७ | हे रु. ७.१९ कोटीने अधिक दाखवले आहे कारण चुकीचे भांडवलीकरण केले आहे. यात महसूल जो देखभाल दुरुस्तीवर खर्च झाला तो भांडवलीकरण झाल्याने नफा या आर्थिक वर्षात रु. ७.१९ कोटीने अधिक दाखवला. | रु. ७.१९ कोटीचा खर्च जो महसूल होता तो दुरुस्त करून (जेव्ही) रोजकिर्द क्र. ४५ व (जेव्ही) रोजकिर्द क्र. १०४ – जानेवारी २००९ मध्ये आर्थिक वर्ष २००८-०९ च्या काळात दुरुस्ती केला आहे. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| ८ | रू. ६.७० कोटीनी हे कमी दाखवले आहेत कारण त्याचे भांडवलीकरण झाले नाही. हा खर्च रस्ता बांधणी त्या वरील पूल (रोड ओव्हर ब्रिज) जो कंपनीकडून गेली दोन वर्षे वापरात आहे.<br>यामुळे घसारा रक्कम कमी, फायदा अधिक आणि स्थावर मालमत्ता कमी दाखवणे हे त्याचे परिणाम आहेत याची नक्की आकडेवारी त्याच्या पूर्ततेची तारीख माहित नसल्याने देता येत नाही (ही मालमत्ता महा औष्णिक केन्द्र, चंद्रपूर येथे आहे). | ही बाब आम्ही तपासत आहोत आणि आर्थिक वर्ष २००८-०९ या काळात याचा आवश्यक हिशोब नोंदवला आहे. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| ९ | **चालू मालमत्ता, कर्जे व अग्रीम रकमा (अनुसूची ७)**<br>**साठे: रु. ७४०.६८ कोटी**<br>हे रु. ४३.४७ कोटीनी अधिक दाखवले आहे ही भांडवली सुट्या भागांची किंमत आहे व ती कंपनीच्या भांडारात पडून आहेत (३१.३.०८ पर्यन्तच्या काळात). त्याचे भांडवलीकरण करुन हिशेब मांडणीच्या धोरणानुसार जी कंपनीने स्वीकारली आहे हे तसे दाखवा, आयटम नं. १(एफ)(आय), १(एफ)(आयआय) – अनुसूची १५ हिशेब ताळेबंदाची.<br>यामुळे घसारा रु. १.५७ कोटीने (रु. ४३.४७ कोटी ३.६० टक्के दराने), नफा जास्त दाखवला गेला – १.५७ कोटी रुपयानी वाढला, स्थावर मालमत्ता मोल रु. ४१.९० कोटीने कमी झाले (रु. ४३.४७ कोटी वजा रु. १.४७ कोटी) आणि चालू मालमत्ता ही रु. ४३.४७ कोटी अधिक दाखवली (चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्र). | ही बाब आम्ही तपासत आहोत आणि असे सुटे भाग प्रथमच आलेले आहेत की दुसऱ्यांदा मागवलेले (पहिले खराब झाले म्हणून), हे तपासतो आहोत. आवश्यक हिशोब मांडणी दुरुस्ती २००८-०९ सालच्या हिशेबात केली जाईल | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |



Mahajenco Marathi notice.indd 11 5/29/2009 7:07:23 PM

| क्रमांक | सरकारी हिशेबनीसांचा शेरा | कंपनीचा खुलासा | संविधिक शेरा |
|---|---|---|---|
| १० | **किरकोळ देणेकरी रु. १,७७४.६१ कोटी**<br>या रकमेत रु. ३१.४ कोटी सप्टेम्बर २००६ ते मार्च २००८ या काळात महावितरण कंपनीला केलेल्या देयकांचा समावेश आहे. ही देयके स्वीकृत झाली नसून त्या बद्दल विवाद आहे डीसेम्बर २००८ पर्यन्त याचे पैसे आलेले नाहीत. अशा शंकित महसूलाचा व त्यांच्या देयकांचा (२००६-०७) या काळात चुकीचा आहे, तेव्हा त्याची तरतूद वेगळी करायला हवी. | या वादग्रस्त देयकांचे मिळणी जुळणी समयोजना प्रक्रिया सुरू आहे. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| ११ | हे रु. ४.३४ कोटीनी कमी दाखवले आहे हे या कंपनीने म.रा.वी.मं. मुखत्यार आस्थापना कंपनीकडून भाडेपट्टी लीजवर घेतलेल्या इमारतीवर खर्च झाले आहेत. म.रा.वी.मं. मुखत्यार आस्थापना कंपनी ही होल्डींग कंपनी असून रक्कम म.रा.वी.मं.मुखत्यार आस्थापना कंपनीकडून वसूल करता येते याचा परिणाम म्हणून खर्च अधिक दाखवला गेला आहे व त्या प्रमाणात फायदा कमी दाखवलेला आहे. | या नोंदीची दुरुस्ती केलेली आहे व ती या चालू आर्थिक वर्षात २००८-०९ या काळात सुधारली जाईल | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| क<br>१२ | **प्रगटणावर भाष्य**<br>कंपनी ठराविक जागा/इमारती वापरते आहे व त्या जागांचा ताबा त्यांच्याकडे आहे, स्थावर मालमत्ता, हाँगकाँग बॅंकेची (फोर्ट मुंबई येथील) इमारत मधला काही भाग कंपनीच्या ताब्यात आणि वापरात आहे. (त्यांचे सोबत महाराष्ट्र वीज वितरण कंपनी व महाराष्ट्र वीज पारेषण कंपनी पण या इमारतीचा काही भाग वापरत आहे.) जून २००५ मध्ये ही कंपनी स्थापन झाल्यापासून ही जागा म.रा.वी.मं.ने भाडेपट्टीवर घेतलेली आहे. कुठल्याही प्रकारच्या नव्या कराराशिवाय (जो या तीन वापर करणाऱ्या कंपन्यात व्हायला हवा) आपल्या कंपनीच्या भाडेपट्टीतील स्वत:चा वाटा देण्याची कसलीही तरतूद केलेली नाही. नूतनीकर, दुरुस्ती आणि देखभाल या खर्चाची पण तरतूद नाही. वीज वापर देयके गेल्या तीन वर्षातील, जी महावितरण कंपनीने हिशेबात दाखवली आहेत<br>ही बाबत आपल्या वार्षिक अहवालात प्रगत करणे गरजेचे आहे व त्यासंबधी हिशेब खात्याकडे नोंद व्हायला हवी. | आवश्यक प्रगटण हे येत्या आर्थिक वर्षात २००८-०९ काळात करण्यात येईल | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |

| क्रमांक | सरकारी हिशेबनीसांचा शेरा | कंपनीचा खुलासा | संविधिक शेरा |
|---|---|---|---|
| १३ | पारस प्रकल्पासाठी केन्द्र सरकारने दिलेल्या अर्थसहाय्यावरील, व्याज, कंपनीला भरावे लागले आहे. पीएफसीकडून हे कर्ज घेतले होते (एकूण ८.७९ कोटी रुपयांचे हे कर्ज होते). यातले रु. ७.११ कोटी हे रोखीने मिळाले होते. व ते २००६-०७ या काळात मिळाले आहेत. त्या अटींचे पालन न केल्यामुळे ही योजना अे.जी आणि एस.पी योजनेसाठी तयार केलेली होती व ती ३१-३-२००७ पर्यंतच होती | मुद्दे मान्य (NOTED) | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| १४ | ही बाब एखाद्या टिप्पणीद्वारा हिशेब खात्याला कळवलेली नाही. कंपनी (पूर्वीची म.रा.वि. मं.) यानी जानेवारी १९९१ मध्ये २५ एकर जागा कोरांडी औष्णिक वीज केन्द्राजवळ सेन्ट्रल पॉवर रीसर्च इन्स्टीट्यूटला दिली आहे. ही ९९ वर्षांच्या भाडेपट्टीवर दिलेली आहे त्याचे नाममात्र भाडे रु. १/- वर्षाला ठरले असून, तिथे संपूर्ण संशोधन केन्द्र उभारायचे आहे भाडेपट्टी करार अजून झालेली नाही व जमीन सध्या मोकळी आहे ही बाब लेखा खात्याला कळवलेली नाही. | ह्या संदर्भात असे नमूद करण्यात येते की आतापर्यंत कोराडी येथील २५ एकर जमीन के.पॉ.री.ई. (CPRI) यांना पूर्णपणे संशोधन केंद्र चालवण्यासाठी ९९ वर्षाच्या भाडे मुदतीवर दिल्याचा कायद्याप्रमाणे कोणताही भाडेकरार म.रा.वि.मं. (MSEB) आणि के.पॉ.री.ई. (CPRI) यांच्यामध्ये झालेला नाही.<br><br>महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार कोराडी येथे नवीन औष्णिक वीज केंद्र (३ × ६६० MW) स्थापन करण्यात येत आहे. त्यासाठी म.रा.वि.नि.कं.च्या दि. १२ में २००८ च्या पत्रानुसार के.पॉ.री.ई. (CPRI), बेंगलोर यांना विनंती केलेली आहे कि त्यांनी २५ एकर जमीन जी भाडे मुदतीनुसार त्यांना दिली होती, ती त्यांनी परत करावी.<br><br>पुढे असेही नमूद करण्यात येते की जेव्हां कंपनी भाडे करारावर मालमत्ता देते तेव्हा त्याला लेखा मानक १९ च्या तरतूदी लागू होत नाहीत. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| १५ | कंपनीने रु. ७६.४० कोटीचा आगीच्या नुकसान संबंधि दावा विमा संचालक, महाराष्ट्र सरकार यांना २००५-०६ या काळात लावलेला आहे. हा दावा संच क्र. ५ आणि दोन स्टेशन ट्रान्सफॉर्मर्स यांना १ जुलै २००५ रोजी झालेल्या अपघातात चन्द्रपूर येथे (महा औष्णिक वीज केंद्र) इथे झालेल्या नुकसानी बद्दल आहे अद्यापि हा दावा खात्याला कळवणे आवश्यक आहे. | विमा संचालनालय यांच्याकडे दावा दाखल केला आहे पण विमा कंपनीकडून रक्कम येणे दर्शविले नाही आणि म्हणून ते ताळेबंदामध्ये टिपणी म्हणून दर्शविलेले नाही. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |



Mahajenco Marathi notice.indd 13 5/29/2009 7:07:23 PM

| क्रमांक | सरकारी हिशेबनीसांचा शेरा | कंपनीचा खुलासा | संविधिक शेरा |
|---|---|---|---|
| ड १६ | **हिशेब तपासनीसांचे अहवालावर भाष्य**<br><br>सरकारी अनुदानांसाठी हिशेबाचे ठरवलेले धोरण हे कंपनीने हिशेबतपासनीसांना उघड करुन सांगितले नाही. हिशोबाची धोरणे लेखा मानक -१२ या प्रमाणानुसार हे करणे गरजेचे आहे<br><br>लेखामानक -१२ चे धोरणांचे उल्लंघन हे हिशेब तपासनीसांनी परिमाणित केले नाही.. | या संदर्भात आम्ही असे सांगू इच्छितो की व्याजाचा रक्कम अर्थसहाय्य म्हणून मिळालेला पीएफसी/एजी यांच्या अखत्यारीतील फार मोठी रक्कम नाही. त्यासाठी ती हिशेबातपासनीसांच्या नजरेस आली नाही. आणि म्हणून सरकारी अर्थ सहाय्य जे व्याजभरणा रकमेसाठी मिळाले ते हिशेब धोरण लेखामानक -१२ नुसार प्रगट केले नाही. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| १७ | हिशेब तपासनीसांच्या अहवालामध्ये त्यांनी असे निवेदन केलेले नाही की कंपनीचा ताळेबंद, नफा तोटा पत्रक आणि रोकड प्रवाह हे लेखा मानके कलम २२७ (३)(डी) कंपनी कायदा १९५६ प्रमाणे नाहीत | हिशेब तपासनीसांनी हे मान्य केले आहे की ताळेबंद/नफातोटा पत्रक/रोकड प्रवाह, लेखा मानके उपकलम ३(सी) सेक्शन २११ कंपनी कायदा १९५६ प्रमाणे आहेत. | आम्ही इथेही हे परिपोषित (कन्फर्म) करतो की कंपनीचा ताळेबंद/नफा तोटा पत्रक/ व रोकड प्रवाह निवेदन हे सर्व लेखा मानके जे आपण दर्शविता आहात उपकलम (३सी) कलम २११-कंपनी कायदा १९५६ याच्या तरतुदीनुसार आहेत. |
| १८ | कंपनीने त्यांना लाभलेल्या मालमतेचा तपशील जो चालू भाडे पट्टी नुसार खापरखेडा राख यंत्रणा जी एसबीआय लीजींग कंपनीकडून घेतली, आणि कार्यालयाची जागा, स्टाफला राहण्यासाठी घर, गेस्ट हाऊस, जे म.रा.वी.मं. मुखत्यार आस्थापना कंपनी हेड ऑफिसकडून मिळाले (लेसार) हे पण लेखा मानके-१९ चे उल्लंघन ठरते. या उल्लंघनाचा उल्लेख स्टॅच्युटरी ऑडीटर्सनी दाखवले नाही | मुंबई एचएसबीसी इमारती मध्ये कंपनी वापरत असलेले कार्यालय, याबाबतीत असा उल्लेख आहे की कुठलाही भाडेपट्टी करार महानिर्मिती व एचएसबीसी बँक व म.रा. वी.मं.मुखत्यार आस्थापना कंपनी यांचा या कार्यालय जागेबद्दल कंपनीच्या दफ्तरात नोंद नाही, तसेच म.रा.वी.मं.मुखत्यार आस्थापना कंपनीचा भाडेपट्टी करारानुसार प्रकाशगड येथील कार्यालय, मुंबईतील स्टाफ क्वार्टर्स तसेच दिल्ली येथील गेस्ट हाऊस यांच्या बद्दल आवश्यक प्रगटण हे चालू आर्थिक वर्षापासून करण्यात येईल (२००८-०९) | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |

| क्रमांक | सरकारी हिशेबनीसांचा शेरा | कंपनीचा खुलासा | संविधिक शेरा |
|---|---|---|---|
| १९ | अहवालात असे नमूद केले आहे की स्थावर मालमत्तेची किंमत ही स्थावर मालमत्ता दफ्तरशी मिळत नाही व त्यातील किंमत व ताळेबंद यात फरक आहे या साठी योग्य कारण देणे गरजेचे आहे. | स्थावर मालमत्ता रजिस्टर आणि त्याचा हिशेब पुस्तकाशी मेळ, हे अद्यापि कार्य चालू आहे. यास्तव दिसणारा फरक याची आज मोजदाद करता येत नाही | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |
| २० | ताळेबंदाचा गोषवारा, कंपनीच्या सर्वसाधारण व्यवसायात्मक नफा हे अध्यक्ष व दोन संचालकांच्याव्दारे अधिकृत झालेले नाहीत. | सरकारी हिशेब तपासनीसांनी दाखविल्यानुसार ताळेबंद नफा तोटा पत्रक व सर्वसाधारण व्यवसाय यावर अधिकृतीकरण करण्यासाठी पुढील आर्थिक वर्षापासून ह्या मान्यवर अधिकाऱ्यांच्या सह्या घेण्यात येतील. | आम्ही व्यवस्थापनाच्या उत्तराशी सहमत आहोत |



Mahajenco Marathi notice.indd 15 5/29/2009 7:07:24 PM

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादितचे सभासदास सादर केलेला लेखा परिक्षकांचा अहवाल

१. सोबतचा महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. मर्यादित यांचा ताळेबंद हिशेब तक्ता ३१ मार्च, २००८ पर्यंतच्या कालावधिचा आहे व नफा-नुकसानीचा हिशेब तक्ता, जो त्याच तारखेला संपणाऱ्या वर्ष अखेरीचा आहे. तसेच रोकड प्रवाह तक्ता त्यावर उल्लेखिलेल्या वर्ष अखेरीसाठी आहे. ही सर्व कागदपत्र/लेख आम्ही तपासली आहेत. आर्थिक व्यवहारासंबंधी ही हिशेब-मांडणीची जबाबदारी पूर्णत: कंपनी व्यवस्थापनाची असून, आमची जबाबदारी त्यावर मत प्रदर्शन करण्यापुरती आहे. त्या मतप्रदर्शनास आमची तपासणी (ऑडिट) हा मुख्य आधार आहे.

२. भारतात सर्वसाधारणत: मान्यताप्राप्त अशा दर्जानुसार हे लेखा-परिक्षण केलेले आहे. त्या मान्यताप्राप्त दर्जानुसार आम्ही आमचे लेखा-परिक्षण हे पुरेशी, खात्रीलायक आर्थिक व्यवहारासंबंधी माहिती, तपशील मिळवून, तो तपशील कुठल्याही प्रकारचा संशयास्पद व्यवहार दाखवित नाही हे तपासतो. हे सर्व प्रकारचे आर्थिक तक्ते तयार करणे ही सर्वतोपरी अस्थापन (कंपनी) व्यवस्थापनाची जबाबदारी आहे/असते. लेखा परिक्षणा अंतर्गत नमुन्यादाखल तक्त्यात दाखविलेले काही खर्च इत्यादिंची सत्यता पडताळून पाहणे, त्याचप्रमाणे लेखा परिक्षणा अंतर्गत लेख-तक्ते उभारणीत वापरलेली पद्धति ही मान्यताप्राप्त अशीच असल्याची खात्री करून घ्यायची असते. त्याचप्रमाणे व्यवस्थापनाने एकंदरीतपणे आपले लेखा-तक्ते सुयोग्य पद्धतीत सादर केले आहेत ना? हे पण तपासायचे असते. आमचा असा विश्वास आहे की आमचे लेखा-परिक्षण आम्ही दिलेल्या मतांसाठी पुरेसे व सुयोग्यपणे आधारभूत आहे.

३. कंपनी कायदा (लेखा परिक्षण अहवाल) २००३ यातील हुकुमाअन्वये, तसेच (कंपनी कायदा लेखा परिक्षण अहवाल) (सुधारित हुकुम २००४) जी भारताच्या केन्द्र सरकारने प्रकाशित केली त्याच्या उप खंड ४(अे) मूळ कलम २२७ कंपनी कायदा १९५६ त्या हुकुमातील परिच्छेद-४ यात सांगितलेले विषयीचे तक्ते सोबत जोडत आहोत.

४. वर उल्लेखिलेल्या पुरवणीमधील आमची टीप्पणी व्यतिरिक्त आम्ही असे नमूद करीत आहोत की :-

अ) आमच्या लेखा-परिक्षण प्रक्रीयेच्या पूर्ततेसाठी आम्ही सर्व प्रकारचे खुलासे, शंकानिरसन कंपनी व्यवस्थापनाकडून मिळवलेली आहेत.

ब) आमच्या पाहाणी परिक्षेत आढळून आल्याप्रमाणे आम्ही असे विहित करतो की, कंपनी कायद्यानुसार हिशेबाच्या सुयोग्य पद्धतीची बुके/रजिस्टर इत्यादि या कंपनी व्यवस्थापनाने तयार करून ठेवली आहेत.

क) ताळेबंद पत्रक, महसूल जमा व व्यय यांचे पत्रक तसेच रोकड प्रवाह पत्रक जी या लेखा परिक्षणासाठी आमचे समोर आली ती या लेखा रजिस्टरांशी मिळती-जुळती आहेत असे दिसून आले आहे.

ड) सरकारी अधिसूचना नं. जीएस्आर ८२९(ई) दिनांक २१-१०-२००३ मधील सूचनेनुसार सरकारी आस्थापने यांना कंपनी कायदा १९५६ च्या कलम २७४(जी) यातील कलमातून सूट देण्यात आली आहे.

ई) दिनांक ६ जून, २००५ या काळापर्यन्त कंपनीची ''संपादित मालमत्ता'' व ''उत्तरदायित्वे'' (ॲसेट्स व लायबिलीटीज्) ही महाराष्ट्र वीज सुधारणा योजना, २००५ अंतर्गत निवेदन केल्यानुसार आहेत. आम्हाला विहित केल्याप्रमाणे ह्या शिलकी रकमा (बॅलन्सेस) सर्व महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने स्वत:चे अखत्यारीत धरलेल्या आहेत. म.रा.वि.मं. ही त्यासाठी वेगळी मुखत्यार आस्थापन (होल्डींग कंपनी) म्हणून स्थापित झाले आहे. या शिवाय पुढे असेही निवेदित करण्यात आले आहे की, अंतिम बदल योजना (फायनल ट्रान्सफर स्कीम) ही महाराष्ट्र सरकारकडून अद्यापि जारी केली गेलेली नाही. यास्तव कंपनीच्या ताळेबंद पत्रकात यासंबंधीची शिलकी रकमेची वगैरे नोंद झालेली नाही. यात भविष्य कालीन होणारे बदल (जर काही झाले तर) हे कंपनीच्या आर्थिक पत्रकावर



Mahajenco Marathi notice.indd 16 5/29/2009 7:07:24 PM

भरीव परिणाम करणारे ठरू शकतील. कंपनी हस्तांसंबंधी अनुसूची १५ मधील टीप्पणी नं. २ याकडे आम्ही लक्ष वेधीत आहोत. ही टीप्पणी कंपनी हस्तांतरण प्रक्रीयेच्या वर्षातील कर्जदायित्व संबंधी असून त्यात चढणाऱ्या व्याजाचा अंतर्भाव आहे. मुखत्यार आस्थापन (म.रा.वि.मं.) ने मान्यता दिल्यानुसार वरील सुधारित योजने अंतर्गत अशी ही बाब आहे.

फ) किरकोळ येणी (देणेकरी), किरकोळ देणी (घेणेकरी), कर्जे, आगाऊ रकमा व इतर येणाऱ्या सर्वांची शिल्लक व इतर देय/श्रेय रकमा, मुखत्यार आस्थापनाच्या धरून व मुखत्यार आस्थापनाच्या इतर सहाय्यक कंपन्या यांच्याही देय/श्रेय रकमा या सर्व ताडून जुळवणे बाकी आहे. या जुळवणीचा परिणाम म्हणून नफा-नुकसान तक्त्यात काय बदल घडू शकेल हे सांगता येत नाही.

ग) अनुसूची १५ मधील टीप क्र. २७(ई) याकडे लक्ष वेधीत आहोत. ही टीप या विभागाच्या भाडेपट्टी खर्चा बाबतची आहे. ही रक्कम विशिष्ट कारणास्तव (अॅड-हॉक-बेसीस) तात्पुरती रू. ८५ कोटी म्हणून हिशेबात दाखविलेली आहे. पण सरकारच्या 'जी-आर' अनुसार ही रक्कम रू. ४४५.५५ कोटी इतकी असायला हवी. त्यासाठी महाराष्ट्र वीज नियामक मंडळाच्या संमतिची गरज आहे.

ह) आमच्या वरच्या ४(व्ही) या परिच्छेदातील टीप्पणीप्रमाणे व आमच्या मतानुसार आणि आमच्याकडे उपलब्ध सुयोग्य माहितीनुसार आणि आम्हांला कंपनीकडून मिळालेल्या खुलाशाप्रमाणे वरील हिशेब (तक्ते) त्यावरील टीपासहित वाचले असता कंपनी कायदा १९५६, अनुसार आवश्यक माहिती देणारे ठरतात व ज्या पद्धतीने मांडणी आवश्यक आहे तशी ती झालेली आहे. या मांडणीवरून कंपनीच्या आर्थिक व्यवहाराचे खरेखुरे चित्र भारतात सर्वत्र स्वीकृत केलेल्या मान्यताप्राप्त पद्धतीनुसार झाले आहे व त्यात खालील मांडणी समाविष्ट आहे.

(अ) ताळेबंद-कंपनीच्या ३१ मार्च २००८ पर्यंतच्या व्यवहाराचे चित्रण प्रतीत होते.

(ब) नफा-नुकसान तक्त्यामध्ये या तारखेला संपलेल्या वर्षात झालेला नफा आणि

(क) रोकड प्रवाह तक्त्यानुसार या तारखेला संपलेल्या वर्ष अखेरीस असलेली स्थिति दाखवतात.

| | | |
|---|---|---|
| **मेसर्स फोर्ड, ऱ्होडस्, पार्कस् आणि कंपनी** करिता | **मेसर्स पी. जी. भागवत** करिता | **मेसर्स पी. जी. जोशी आणि कं.** करिता |
| सनदी लेखापरीक्षक | सनदी लेखापरीक्षक | सनदी लेखापरीक्षक |
| सही/- | सही/- | सही/- |
| **एस्. बी. प्रभू** | **एस्. एस्. आठवले** | **सुधीर पी. तिडके** |
| भागीदार | भागीदार | भागीदार |
| एम्. नं. ३५२९६ | एम्. नं. ८३३७४ | एम् नं. ०४३९७६ |

ठिकाण : मुंबई

दिनांक : ३० सप्टेंबर २००८



Mahajenco Marathi notice.indd 17 5/29/2009 7:07:24 PM

## आमच्या समतारखेच्या अहवालामध्ये परिच्छेद 'इ' मधे उल्लेख केलेले पूरक पत्रक (ॲनेक्सर)

१अ) स्थावर मालमत्ता, त्या मालमत्तेची मोजदाद इत्यादिचा तपशील कंपनीच्या पुस्तकात सापडत नाही. म्हणजे मालमत्तेची जागा/ठीकाण वगैरेची नोंद नाहीं त्या मालमत्तेची इतर स्थावर संपत्तीशी संबंध वगैरेची नोंद कंपनी बुकात सापडत नाहीं. स्थावर मालमत्तेची किंमत ही स्थावर मालमत्ता दफ्तर मधे नोंदलेल्या रकमांशी व ताळेबंद पत्रकात दाखवलेली स्थावर मालमत्ता किंमत यांचा मेळ बसत नाही.

१ब) आम्हाला असे विदित करण्यात आले की दर तीन वर्षांनी कंपनी आपल्या स्थावर मालमत्तेची प्रत्यक्ष पाहाणी करते ते आमच्या मते सुयोग्य ठरते. विशेषत: कंपनीच्या आकार-प्रसार यांचा विचार करता हे योग्यच ठरते. आर्थिक वर्ष २००६-२००७ मधे कंपनीने अशी प्रत्यक्ष पाहाणी केल्याची नोंद आहे. तथापि स्थावर मालमत्ता रजिस्टरमध्ये याची नोंद झालेली नाही.

१क) आमच्या तपासणी अंतर्गत येणाऱ्या कालखंडात कंपनीने कुठलीही मोठी स्थावर मालमत्ता विक्री व्यवहार केलेला नाही.

२अ) व्यवस्थापन त्यांचे वस्तू-सामान इत्यादिची यादी (इनव्हेन्टरी) ठराविक व योग्य कालांतराने प्रत्यक्षपणे करते असे दिसते.

२ब) आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार व खुलाशाप्रमाणे यादीतील सामानाची पाहाणी, तपासणी ही व्यवस्थापनाकडून योग्य प्रकारे केली जाते. विशेषत: या अस्थापनाचा आकार व पसारा पाहाता वापरात असलेली ही पद्धत योग्य अशीच आहे.

२क) सामानाच्या साठ्याच्या याद्यांची पाहाणी आणि तपासणी संबंधीचे अहवाल तपासल्यानंतर आमचे असे मत आहे की कंपनी त्या सगळयाची योग्य प्रकारे नोंद इत्यादि ठेवते आहे त्यात कुठलीही चूक/गैरप्रकार (केवळ कोळसा वापर माहिती सोडून) आमच्या लक्षात आली नाही. कोळसा वापरा संबंधी काही गैर नोंदी यापण योग्य प्रकारे पुढे सारख्या केल्या आहेत.

३अ) आम्हाला मिळालेली माहिती व खुलासे १९५६ च्या कंपनी कायदा कलम ३०१ नुसार, या कंपनीने कुठल्याही व्यापारी संस्थेला कर्जाऊ रक्कम दिलेली नाही किंवा अग्रीम पतपुरवठा केला नाही.

३ब) त्याचप्रमाणे या अस्थापनाने/कंपनीने कुठल्याही व्यापारी संस्थेकडून – ज्याचे विवरण कंपनी कायदा १९५६, कलम ३०१ मध्ये दिले आहे अशा कुठल्याही व्यापारी संस्थेला कर्ज, अग्रीम रकमा तारण देऊन अगर तारणावाचून दिल्या-घेतल्या नाहीत.

४) आम्ही मिळवलेली माहिती व खुलासे यानुसार आणि या कंपनीचा आकार, प्रकार इत्यादि लक्षात घेत कंपनी व्यवस्थापनाने अंतर्गत नियंत्रण योग्य प्रकारे प्रस्थापित केले आहे. त्यामुळे माल-सामान इत्यादिची खरेदी किंवा स्थावर मिळकत विकत घेताना कुणाकडून काही सेवा इत्यादिची खरेदी अथवा कुणाला काही साहित्य विक्री करताना सुयोग्य अंतर्गत नियंत्रण अस्तित्वात आहे. तथापि आमचे असे निरीक्षणही आहे की या अंतर्गत नियंत्रणामधे अनेक ठिकाणी दुबळेपणा लक्षात येतो. मुख्यत: चालू काळातील येणे व दायित्व यांचे संबंधी वयानुसार व सभासदानुसार याद्या ठेवण्यात कमतरता आहे.

५) कंपनी कायदा १९५६ नुसार जी रजिस्टरे, बुके राखलेली आहेत त्यात कंपनीने कुठलाही असा व्यवहार केलेला दिसत नाही जो कंपनी कायदा १९५६ च्या कलम ३०१ नुसार या रजिस्टरमधे नोंदणी आवश्यक आहे.

६) कंपनी कायदा १९५६ च्या कलम ५८(अे) मधे दाखवलेल्या नियमानुसार या कंपनीने कुठलीही ठेव जनतेकडून घेतलेली नाही. यास्तव नियम (६) परिच्छेद-४ या वरील कायद्याच्या तरतुदी या कंपनीला लागू नाहीत.

७) आमच्या मते व मिळालेल्या माहिती, खुलाशानुसार कंपनीमधे प्रचलित असलेली अंतर्गत हिशेब तपासणी पद्धत ही कंपनीच्या व्यवसायाचा आकार व प्रकार यांचे प्रमाणात, आमच्यामते अत्यंत अपुऱ्या कर्मचाऱ्यांचे सहाय्याने चालू आहे. तथापि या अंतर्गत हिशेब तपासणी व्यवस्थेत गतकालीन स्थितीच्या तुलनेत २००७-०८ या वर्षकाळात सुधारणा झाली आहे. या शिवाय कंपनीने अंतर्गत हिशेब तपासणीसाठी बाहेरील व्यावसायिक चार्टर्ड अकाउन्टट संस्थेला नेमले असून, त्यायोगे अंतर्गत हिशेब तपासणी व्यवस्था मजबूत होण्याची अपेक्षा आहे.

८) कंपनीचे हिशेब तपासणी संबंधीची रजिस्टरे, बुके ही आम्ही पूर्णतः केन्द्र सरकारच्या नियमानुसार तपासली आहेत. कंपनी कायदा १९५६, कलम २०९(आई)(डी) याचे अंतर्गत येणाऱ्या पद्धतीनुसार आम्ही त्यांची तपासणी करून त्यातील मूल्यांसंबंधीच्या नोंदी माहित करून घेतल्या आहेत. आमच्या मते, सर्वसाधारणतः ह्या सर्व नोंदी कायद्यानुसार योग्य अशाच आहेत. तथापि आम्ही या नोंदींचे विश्लेषण करून त्या तंतोतंत असल्याची खात्री केलेली नाही.

९अ) आम्हाला मिळालेल्या माहितीच्या आधारे असे दिसते की कंपनी सरकारी तिजोरीत भविष्य निर्वाह निधी गुंतवणूकदार संरक्षण निधी, कर्मचारी विमा योजनेच्या रकमा, आय कर विक्री कर, संपत्ती कर, सेवा कर, जकात निधी व इतर सरकारी रकमा सहा महिन्यात योग्य वेळी योग्य त्या सरकारी अधिकाऱ्याकडे/तिजोरीत जमा करीत असते.

९ब) कंपनीकडील नोंदीनुसार आयकर/विक्रीकर/सेवाकर/जकात (कस्टम) ड्यूटी संपत्तीकर/उत्पादन शुल्क इत्यादीच्या भरण्याची थकबाकी ठेवलेली नाही शिवाय अशा कर भरण्या विषयी कुठल्याही देयक रकमा त्या बद्दलच्या वादा अंतर्गत थकलेल्या नाहीत केवळ :

| कर प्रकार | न भरलेली रक्कम (रु. लक्ष) | वाद कुठून चालू आहे |
|---|---|---|
| उत्पादन शुल्क | १८६.६६ | केन्द्रीय उत्पादन शुल्क आयोग |
| व्यावसायिक कर | ११.५८ | सहाय्यक आयुक्त (अपील) |

१०) कंपनीच्या हिशेबात कुठलाही वाढत गेलेला तोटा (ॲक्युमलेटेड लॉस) या वर्ष अखेरीच्या हिशेबात आढळला नाही. कंपनीने कुठलाही रोख तोटा या वर्ष अखेरीला केलेला नाही किंवा येणाऱ्या आर्थिक वर्ष काळासाठी असा तोटा दिसून आला नाही.

११) आमच्या हिशेब तपासणीनुसार आणि व्यवस्थापनाकडून आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार, आमचे असे मत आहे की कंपनीने कुणाच्याही बँका, कर्जरोखे यावरील हप्ते/परतावा रकमा इत्यादि थकवलेल्या नाहीत.

१२) समभाग कर्जरोखे (शेअर्स, डीबेंचर्स) इत्यादि प्रकार तारण योग्य ठरवून आमच्या माहितीप्रमाणे कंपनीने कुणालाही कर्ज, अग्रीम रकमा वगैरे दिलेल्या नाहीत.

१३) कंपनी कुठल्याही प्रकारचा चिट फंड निधी - परस्पर निधी, सोसायटी इत्यादि प्रकारचे कुठलेही व्यवहार करणारी नाही. यास्तव आमच्यामते खंड (XIV) परिच्छेद ४ या उपरनिर्दिष्ट कायद्यातील तरतूदी कंपनीला लागू होत नाहीत.

१४) तसेच आमच्या माहितीनुसार कंपनी कुठलाही सम-भाग विक्री व्यवहार, प्रतिभूति पत्र खरेदी/विक्री व्यवहार, कर्जरोखे खरेदा–विक्री व्यवहार करीत नाही म्हणून खंड (XIV) परिच्छेद-४ उपरनिर्दिष्ट हुकुमातील तरतूदी कंपनीला लागू होत नाहीत.



Mahajenco Marathi notice.indd 19 5/29/2009 7:07:24 PM

१५) आमच्या माहितीप्रमाणे व मिळालेल्या खुलाशानुसार कंपनीने कुणालाही, व्यक्ती, संस्था इत्यादिंना कुठल्याही कर्ज व्यवहारात (बँका किंवा इतर अर्थ व्यवहार संस्था) यांना जामीन दिलेली नाही.

१६) आमच्या माहितीनुसार व आम्हाला दिलेल्या खुलाशानुसार कंपनीने घेतलेली कर्जे (ऋण) ज्या कामासाठी घेतलेली होती त्याच्यासाठीच वापरण्यात आलेली आहेत.

१७) आमच्या माहितीनुसार व आम्ही मिळवलेल्या खुलाशाप्रमाणे कुठलेही लघुकालीन कर्ज दीर्घकालीन प्रकल्पासाठी वापरण्यात आले नाही.

१८) या आर्थिक वर्ष काळात कंपनीने कुठलेही नवे भाग भांडवल उभारलेले नाही त्यामुळे अशा भागाचे कुणालाही निवडक भांडवली भाग म्हणून वाटप झालेले नाही.

१९) पूर्वकालीनी म.रा.वि.मं. यानी कर्जरोख्याचे स्वरूपात काही सुरक्षा निधी उभारला आहे. हे कर्जरोखे पुढील काळात (६ जून २००५) या कंपनीकडे हस्तांतरीत झाले आहेत तथापि हे व्यवहार कंपनी रजिस्टरकडे नोंदलेले नाहीत.

२०) या हिशेब वर्ष काळात सार्वजनिक भाग भांडवल विक्रीमधून कंपनीने कुठलाही निधी उभारलेला नाही खंड (XX) परिच्छेद-४ नुसार वरील हुकुम कंपनीला लागू नाही.

२१) या आर्थिक वर्ष काळात मिळालेल्या माहितीनुसार व आमच्या मते कंपनीत कसलीही अफरातफर, गैरव्यवहार इत्यादि आम्हाला आढळला नाही.

| | | |
|---|---|---|
| **मेसर्स फोर्ड, ऱ्होडस्, पार्कस् आणि कंपनी** करिता | **मेसर्स पी. जी. भागवत** करिता | **मेसर्स पी. जी. जोशी आणि कं.** करिता |
| सनदी लेखापरीक्षक | सनदी लेखापरीक्षक | सनदी लेखापरीक्षक |
| सही/- | सही/- | सही/- |
| **एस्. बी. प्रभू** | **एस्. एस्. आठवले** | **सुधीर पी. तिडके** |
| भागीदार | भागीदार | भागीदार |
| एम्. नं. ३५२९६ | एम्. नं. ८३३७४ | एम् नं. ०४३९७६ |

ठिकाण : मुंबई

दिनांक : ३० सप्टेंबर २००८



Mahajenco Marathi notice.indd 20 5/29/2009 7:07:24 PM

## सूचना (वार्षिक सर्वसाधारण सभा)

या पत्रकाद्वारे जाहीर सूचना देण्यात येत आहे की **महाराष्ट्र राज्य वीज निर्मिति कंपनी मर्यादित** या संस्थेच्या भागधारकांची तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा ही दिनांक ३० सप्टेंबर, २००८ या दिवशी दुपारी १ वाजता, हाँगकाँग बँक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई ४००००१ या ठिकाणी भरणार असून त्यात खालील विषयांवर चर्चा होईल.

### सर्वसाधारण विषय

१. कंपनीचे परिक्षित लेखा पत्रक ३१-३-०८ पर्यंतच्या बाबींचे सादरीकरण व त्यावर विचार होऊन ते स्वीकृत होणे. तसेच नफा-तोटा परिपत्रक, याच वर्ष कामासाठी आणि संचालकांचा अहवाल व यावरिल संविधिक लेखा परिक्षकांचा अहवाल सादर होईल. स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल स्वीकारण्यात आला.*

२. खालील ठराव विचारार्थ मांडला जाऊन तो योग्य वाटल्यास त्यात काही बदल न करता सर्व साधारण ठराव म्हणून पारित करणे:

''ठराव करण्यात येत आहे की कंपनी कायदा, १९५६ च्या कलम २२४(८)(अअ), जे कलम ६१९(२) सहित वाचायचे आहेत व इतर कंपनी कायदा १९५६ च्या लागू तरतुदीनुसार कंपनी या ठरावाद्वारे रु. १६ लाख ५० हजार इतकी रक्कम परिश्रमिक (रेम्युनरेशन) म्हणून आपल्या संविधिक हिशेब तपासनीसांना प्रदान करील. आणि हे प्रदान प्रचलित, लागू सेवाकराचे आधीन राहून केले जाईल. या शिवाय या हिशेब तपासनीसांना त्यांच्या वरकड खर्चाप्रीत्यर्थ (आउट ऑफ पॉकेट एक्सपेन्सेस) अतिरिक्त प्रतिपूर्ति रु. २ लाख मर्यादेपर्यंत केली जाईल.

ठराव असाही केला जातो आहे की वर उल्लेखिलेल्या तरतुदीनुसार आणि आधीच्या ठरावात अंशिक बदल करून (ठराव दिनांक २६-९-०७) संविधिक हिशेब तपासनीसांना आर्थिक वर्ष २००७-०८ या कालासाठी रु. १५ लाख परिश्रमिक रक्कम म्हणून प्रदान करण्यात येईल. त्यावरही लागू असलेला सेवाकर त्यातून वजा केला जाईल.

या व्यतिरिक्त आणखी असाही ठराव पारित करण्यात येतो आहे की कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक या ठरावाद्वारे सर्व कामकाज/कार्यवाही व आवश्यक ते सर्व नियम अंमलात आणण्यासाठी सर्वाधिकार ग्रहण करतील.

### खास कार्य

योग्य वाटल्यास खालील ठराव विचारात घेऊन ते मंजूर/पारित करावेत.

### सर्वसाधारण ठराव

असा ठराव करण्यात येत आहे की, श्रीयुत मधुकर रंगनाथ शेलार, जे व्यवस्थापकीय मंडळाने (कंपनी कायदा, १९५६, कलम २६० नुसार व त्यातील अनुच्छेद ८२ सहित) २७ नोव्हेंबर २००७ पासून, संचालकपदी नेमले आहेत, त्यांचा कार्यकाल या सर्वसाधारण सभेपर्यंतचाच होता. त्यांना (श्री शेलार यांना) या ठरावाद्वारे पुन्हा कंपनीच्या संचालक पदावर नियुक्त करून ही नियुक्ती चालू ठेवावी.

संचालक मंडळाचे आज्ञेनुसार,

स्थळ: मुंबई
दिनांक: ३०-०९-२००८

**राहुल दुबे**
कंपनी सचिव

*स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल स्वीकारण्यात आला.



Mahajenco Marathi notice.indd 21 5/29/2009 7:07:24 PM

## टीपा (नोट्स)

१) कंपनी कायदा १९५६, अनुच्छेद १७३(२) नुसार खुलासा निवेदन बाब क्रमांक २ संबंधी सोबत जोडली आहे. आणि म्हणून या सूचनेचा तो अंतर्गत भाग ठरतो.

२) मतदानाचा हक्क असलेला सभासद हा (फक्त) मतदानासाठी आपला प्रतिपत्री (प्रॉक्सी) नेमू शकतो. असा प्रतिपत्री (प्रॉक्सी) सभेला हजर राहून मतदानात भाग घेऊ शकतो. पण तो केवळ मतदान करू शकेल. असा प्रतिपत्री कधीही सभासद ठरत नाही.

३) १९५६ च्या कंपनी कायद्यानुसार सरकारी मालकीची कंपनी आपले संविधिक हिशेबतपासनीस (स्टॅच्युटरी ऑडिटर्स) हे कॉम्पट्रोलर व ऑडिटर जनरल मार्फतच केवळ नेमू शकेल. (अनुच्छेद ६१९/२) आणि संविधिक हिशेबतपासनीस मंडळाचे परिश्रमिक हे प्रत्येक कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कंपनी सभासदांकडून मंजूर केले जाईल.

वरील कार्यक्रमाचे अंतर्गत आणि कंपनी कायदा १९५६ च्या कलम ६१९(२) नुसार या सभासदांना विनंती करण्यात येते की हिशेबतपासनीसांचे परिश्रमिक रु. १६ लाख ५० हजार वजा लागू सेवा कर असे कंपनीच्या १ एप्रिल २००८ पासून सुरू झालेल्या आर्थिक वर्षासाठी देण्याचे मान्य करावे. याशिवाय वर उल्लेख केलेल्या परिश्रमिक हे हिशेबतपासनीसांच्या वरकड खर्चाची भरपाई करण्यासाठी रु. २ लाख मर्यादेपर्यंत देण्यात येईल. सर्वसाधारण ठरावात म्हटल्यानुसार या रकमा मंजूर कराव्यात.

४) या सूचना परिपत्रकात उल्लेख झालेल्या बाबीसंबंधीची सर्व कागदपत्रे, बुके, रजिस्टरे तपासणीसाठी सभासदांना या सभेच्या कार्यकालापर्यंत कंपनीच्या मुख्य कार्यालयात उपलब्ध राहतील.



Mahajenco Marathi notice.indd 22 5/29/2009 7:07:24 PM

## कंपनी कायदा १९५६ चे कलम १७३(२) याला अनुसरून बाब ३ विषयी खुलासा निवेदन

श्री मधुकर रंगनाथ शेलार, यांना दिनांक २७ नोव्हेंबर पासून अतिरिक्त संचालक म्हणून संचालक मंडळाने नियुक्त केले. कंपनी कायदा १९५६, कलम २६० मधील तरतुदीनुसार संचालक मंडळाने अतिरिक्त म्हणून नेमलेले संचालक हे नेहमी येणाऱ्या दुसऱ्या सर्वसाधारण वार्षिक सभेपर्यंतच कार्यरत राहू शकतात. व त्यांची नियुक्ति ही भागधारक सभासदांकडून मंजूर होणे आवश्यक असते. त्यानंतर तो नियमित संचालक म्हणून कार्यभार घेऊ शकतो. यास्तव श्री मधुकर रंगनाथ शेलार यांचा संचालक म्हणून नियुक्ति या वार्षिक सर्वसाधारण सभेने मान्यता देऊन नियमित करावा यासाठी हा ठराव सभेसमोर मांडला आहे.

संचालक मंडळाने हा ठराव पारित व्हावा अशी शिफारस केलेली आहे. स्वत: श्री मधुकर रंगनाथ शेलार हे सोडून इतर कुठल्याही संचालकाचे हा ठराव पारित करून घेण्यास हितसंबंध इत्यादि नाहीत.

संचालक मंडळाचे आज्ञेनुसार,

स्थळ: मुंबई

**राहुल दुबे**

दिनांक: ३०-०९–२००८

कंपनी सचिव



Mahajenco Marathi notice.indd 23 5/29/2009 7:07:25 PM

## संचालक मंडळाचा अहवाल

माननीय सभासद मंडळास

आपल्या कंपनीचा हा तिसरा वार्षिक अहवाल आणि ३१ मार्च २००८ या वर्ष अखेरीचे परिक्षित लेखा-विवरण आपल्या समोर सादर करण्यात आनंद होत आहे.

### वित्तिय परिणाम

| | रु. लक्ष २००७ - ०८ | रु. लक्ष २००६ - ०७ |
|---|---|---|
| **उत्पन्न** | | |
| वीज विक्रीतून आलेला महसूल | ८,०८,१९७.२२ | ७,३४,४९५.७६ |
| इतर उत्पन्न | १६,६७७.४३ | ९,५६७.५३ |
| **एकूण उत्पन्न** | ८,२४,८७४.६५ | ७,४४,०६३.२९ |
| **खर्च** | | |
| इंधन किंमत | ५,९९,८१०.३२ | ५,४४,४३४.३३ |
| निर्मिती, प्रशासन व इतर खर्च | ८४,९२८.०४ | ६७,९२९.४७ |
| कर्मचारी खर्च | ४७,४८६.९१ | ३८,६०६.३१ |
| घसारा/अमूर्ती करण | २०,६५४.८५ | ३४,८८३.०१ |
| व्याज व आर्थिक भार | १२,०६०.०७ | १९,६२६.०९ |
| कर भरणा करण्यापूर्वी निव्वळ नफा तसेच तरतुदित कालमानानुसार समायोजन | ५९,९३४.४६ | ३८,५८४.०८ |
| कर | २२,१९६.६६ | १२,०५३.१२ |
| कर भरल्यानंतर निव्वळ नफा परंतू कालपूर्व तरतूदीपूर्वी | ३७,७३७.८० | २६,५३०.९६ |
| वजा – कालपूर्व तरतूद | ७,७३४.७७ | ३,१७८.८० |
| **करभरणा केल्यानंतर उरलेला निव्वळ नफा** | **३०,००३.०३** | **२३,३५२.१६** |

### अर्थ व्यवहार कार्य

कंपनीचे एकूण उत्पन्न या आर्थिक वर्षात १०.८६ टक्यांनी वाढले असून ते रु. ८२४,८७४.६५ लक्ष इतके झाले. गतवर्षाच्या रु. ७४४,०६३.२९ लक्ष याच्या मानाने अधिक होतेच. करभरणा केल्यावर ठरणारा पण विविध तरतुदीसाठी रकमा न काढता व आधिच्या समयोजना सोयी विचारात न घेता येणारा नफा ४२.२४ टक्के जास्त आहे. हा नफा एकूण रु. ३,७०३,७४० लक्ष इतका होतो. गतवर्षाच्या रु. २६,५३०.९६ लक्ष रुपयांहून हा अधिक आहे. या वर्षी इंधन खर्च १०.१७ टक्यानी वाढला. उर्जा निर्मिती व प्रशासनीक खर्च यावर्षी २५ टक्यानी वाढले. शिवाय कर्मचारी खर्च हा २३ टक्के गतवर्षाच्या तुलनेत वाढला आहे. करभरणा केल्यानंतरचा निव्वळ नफा रु. ३०,००३.०३ लक्ष रुपयानी वाढला आहे. गतवर्षी हाच २३,३५२.१६ लक्ष रुपये होता. ही वाढ २८.४८ टक्के इतकी आहे.







## लाभांश

भविष्य काळात कंपनीला जी प्रचंड प्रमाणात क्षमता विस्तारीत करणे जरूरी आहे. व त्यासाठी विविध योजना विचाराधीन असून त्यासाठी फार मोठा निधी उभारणे अत्यंत गरजेचे आहे. आज या महाराष्ट्रात आपण अनुभवित असलेला तीव्र वीज पुरवठा तुटवडा भरून काढण्यासाठी या सर्व योजना तातडीने कार्यान्वित करायला हव्यात. याच कारणांस्तव आपल्या संचालक मंडळाने आज उभारलेला जास्तीचा निधी या प्रस्तावित योजनांसाठीच कंपनी व्यवहारात पुन्हा परत करायचे ठरवले आहे. त्यामुळे या वर्षी सभासदांसाठी या आर्थिक वर्षासाठी लाभांश म्हणून काही जाहीर केलेला नाही.

## कार्यक्षेत्र संपादन

वर्ष २००८ काळात कंपनीने वीज निर्मिती ५२,२९४ दशलक्ष युनिट (द.ल.) केली आहे. गतवर्षी २००६-०७ या काळात ही निर्मिती ५०,३५७ द.ल. युनिट होती. यात औष्णिक वीज निर्मिती ही ४३,९५४ द.ल. युनिट होती. गतवर्षी औष्णिक वीज निर्मिती ४१,२६१ द.ल. युनिट होती. यात परळी-६ व पारस-३ या केन्द्रामधील १,३५१ द.ल. युनिट समाविष्ट आहेत (२५० मेगावॅट प्रत्येकी). गॅस आधारित उर्जा निर्मिती केन्द्रातून या वर्षी ३,७२९ द.ल. युनिट वीज प्राप्त झाली. हीच गतवर्षी ४,०२० द.ल. युनिट होती. जलविद्युत प्रकल्पातून या वर्षी ४,६०६ द.ल. युनिट वीज प्राप्त झाली हीच गेल्या वर्षी ५,०६० द.ल. युनिट होती.

औष्णिक, गॅस व जलविद्युत यांचा महाजनकोने केलेल्या एकूण वीज निर्मिती उत्पादनातील वाटा ८४ टक्के, ७ टक्के आणि ९ टक्के (अंदाजे) क्रमश: या वर्षी होता.

२००७-०८ या वर्षकाळात कोळसावापर वीज निर्मिती केन्द्रातील सरासरी उपलब्धता गुणक ही गतवर्षच्या (२००६-०७) च्या मानाने सुधारून ८२.११ टक्या वरून ८७.५० टक्के इतकी झाली. तर संयंत्र भार गुणक (प्लॅन्ट लोड फॅक्टर) हा ७६.९९ टक्के झाला. जो पूर्वी ७३.६४ टक्के होता. संयंत्र भार गुणक व सरासरी उत्प्रवाह भार गुणक (पी.एल्.एफ् व एव्ही.एफ.) हे आजवर संपादन केलेले सर्वाधिक असे आहेत. नियोजित उत्प्रवाह आणि बळजोरी उत्प्रवाह गुणक सर्व औष्णिक वीज निर्मिती केन्द्रांसाठी या वर्षी (२००७-०८) ७.९५ टक्के व ४.४७ टक्के होते. तोच वर्ष २००६-०७ काळात ७.९० टक्के व १० टक्के क्रमश: होता. या वर्षी (२००७-०८) मधे एकूण कारखान्यांचे संधारण दुरुस्ती काम केले गेले. वर्ष २००६-०७ काळात २३ कारखान्यांचे संधारण दुरुस्तीकरण झाले होते.



Mahajenco Marathi notice.indd 25 5/29/2009 7:07:25 PM




| | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ |
|---|---|---|---|
| एव्हीएफ | ८१.१८ | ८२.११ | ८७.५८ |
| पीएलएफ | ७३.०५ | ७३.६४ | ७६.९९ |

गॅस वर चालणाऱ्या केन्द्रांची सरासरी उपलब्धता ९७.०२ टक्के होती. तर संयंत्र भार गुणक (प्लॅन्ट लोड फॅक्टर) ४९.८४ टक्के इतका होता.

कोळसा इंधनातून उष्णता वसुली या वर्षी ९१.३१ टक्के होती. तर गेल्या वर्षी ती ९१.२९ टक्के होती. कोळसा वापराचा निश्चित दर या वर्षी ०७९६ किलो/किलोवॉट असा होता. हाच दर गतसाली ०७६५ किलो/किलोवॉट असा होता. सर्वसाधारण एकूण उष्णीय मोल (कोळसा वापरातून) या वर्षी ३,३८५ कॅल/किलोग्राम असा होता. उष्णता वसुलीचा दर या वर्षी २,७०९ कॅल/किलोवॉट असा होता. बॉयलर टयूब गळतीची टक्केवारी प्रभावी उत्प्रवाहासाठी ६६.७७ टक्के होती. तेल इंधन वापराचे निश्चित प्रमाण या वर्षी १.७० द.ल./लीटर/किलोवॉट अवर असे होते. गतवर्षी हेच प्रमाण १.९१/द.ल./किलोवॅट अवर असे होते. सहाय्यक (ऑक्सीलरी) वापर हा पण कमी करण्यात आला होता तो ८.७८ टक्के झाला असून गतवर्षी तो ८.९८ टक्के होता.

## प्रतिस्थापित क्षमता

वर्ष २००७-०८ या काळात महानिर्मितीने ५०० मेगावॅट क्षमतेची भर राज्याच्या ग्रीडमध्ये घातलेली आहे. परळी युनिट-६ (२५० मेगावॅट) आणि पारस युनिट (२५० मेगावॅट) ही सुरू करण्यात आली असून त्यातून व्यापारी तत्त्वावर वीज पुरवठा १-११-०७ पासून आणि ३१-३-०८ पासून क्रमश: सुरु झाला आहे. अशा तऱ्हेने महानिर्मितीची एकूण प्रतिस्थापित क्षमता आता १०,१२१ मेगावॅट झाली आहे. आणि ३१-३-०८ रोजी कमी केलेली (डीरेटेड) क्षमता ९,९९६ मेगावॅट झाली आहे.

कंपनीकडे औष्णिक वीज उत्पादन केन्द्रे ७ वेग-वेगळया ठिकाणी आहेत. शिवाय एक केन्द्र गॅस वीजचक्कीवर चालणारे आणि २४ जलविद्युत उत्पादन केन्द्रे कार्यरत आहेत. त्या सर्वांची एकूण वीज निर्मिती क्षमता ही ३१-३-२००८ च्या आकडेवारी नुसार आहे.

| प्रकार | क्षमता |
|---|---|
| औष्णिक | ६,८०० मेगावॅट |
| गॅस | ८५२ मेगावॅट |
| जलविद्युत | २,३४४ मेगावॅट |
| एकूण | ९,९९६ मेगावॅट. |



Mahajenco Marathi notice.indd 26 5/29/2009 7:07:25 PM

## क्षमतेत भर घालणारे/क्षमता वाढवणारे कार्यक्रम

महाराष्ट्र राज्यातील वाढती वीज मागणी पूर्ण करण्यासाठी आपली कंपनी अनेक/विविध औष्णिक वीज निर्मिति प्रकल्प सुरु करीत आहे.

### अ) चालू प्रकल्प: याच वर्षी खालील दोन प्रकल्प चालू होण्याचे स्थितित आले आहेत

या आधि उल्लेख केल्याप्रमाणे परळी औष्णिक वीज विस्तार प्रकल्प (२५० मेगावॅट) संच ६ व पारस औष्णिक वीज विस्तार प्रकल्प (२५० मेगावॅट) संच ३ हे दिनांक १-११-२००७ पासून कार्यरत झालेले आहेत. या दोन प्रकल्पांच्या सहाय्याने महानिर्मितीने आजच ५०० मे.वॅ. अधिक क्षमतेची भर आपल्या क्षमतेत टाकली आहेच.

**टप्पा (फेज) १ प्रकल्प**

**नवे परळी औष्णिक वीज विस्तार प्रकल्प संच-२ आणि पारस औष्णिक वीज विस्तार प्रकल्प संच-२ (प्रत्येकी २५० मे. वॉ.) आणि खापरखेडा औष्णिक वीज विस्तार प्रकल्प (५०० मेगावॉट).**

या प्रकल्पांसाठी बहुतांश संयंत्रे व साधने यांच्या ऑर्डर्स मेसर्स भेल (भारत हेवी इलेक्ट्रिकल लि.) यांच्याकडे सोपविण्यात आल्या आहेत. या प्रकल्पांचे चाचणी कार्यक्रम एप्रिल २००९ पर्यन्त होण्याची अपेक्षा आहे. परळी येथील प्रकल्पाची चाचणी एप्रिल २००९ मध्ये, पारस येथील चाचणी जून २००९ मध्ये तर खापरखेडा प्रकल्पाची चाचणी जून २०१० मध्ये अपेक्षित आहे.

**भुसावळ औष्णिक वीज निर्मिती विस्तार प्रकल्प (२ × ५०० मे.वॅ.)**

दिनांक २३-१-०७ रोजी प्रमुख संयत्रांची ऑर्डस ''भेल'' कडे दिली आहे. दिनांक ५-११-०७ रोजी टाटा प्रोजेक्टस् कडे बाकी उपकरणाची ऑर्डर्स दिली आहे. दिनांक २६-३-०८ पासून बॉयलर उभारणी काम सुरु आहे. यात त्या युनिट १ ची चाचणी ऑगस्ट २०१० ला नियोजिली आहे. पाठोपाठ युनिट २ ची चाचणी डिसेम्बर २०१० ला नियोजित आहे.

वरील टप्पा (फेज) १ विस्तार प्रकल्पातून आपल्या कंपनीच्या क्षमतेत २००० मेगावॅट क्षमतेची भर प्रस्तापित क्षमतेत पडणार

| फेज (टप्पा) २ पकल्प (क्षमतेत वाढ ३५४० मे.वॅ.) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमांक | प्रकल्प नाव | क्षमता (मे.वॅ.) | अंदाजे खर्च रु. कोटी | मे.वॅट किंमत रु. कोटी | चाचणी परिक्षा |
| १ | कोराडी औष्णिक विस्तार | २ × ६६० | ७,९२० | ६.०० | संच १ - मार्च १३, संच २ - सप्टेबर १३ |
| २ | चंन्द्रपूर औष्णिक विस्तार | २ × ५०० | ५,५०० | ५.५० | संच १ - डिसेबर ११, संच २ - मार्च १२ |
| ३ | उरण गॅस पॉवर विस्तार | १२२० | ३,८५२ | ३.१६ | ब्लॉक १ - जुले २०११, ब्लॉक २ - ऑक्टो २०११ |

चंन्द्रपूर औष्णिक वीज निर्मीती केन्द्रासाठी (२ × ५०० मे.वॅ.) मुख्य संयंत्राची आदेश (बी.टी.जी. पॅकेज) जुलै २००८ ला दिली आहे. यावरुन चाचणी, संच १ ची डिसेंबर ११ ला व संच २ ची मार्च १२ ला अपेक्षित आहे.



Mahajenco Marathi notice.indd 27 5/29/2009 7:07:25 PM

**फेज III प्रतिस्थापना प्रकल्प (निव्वळ क्षमता वाढ ८९५ मे.वॅ.)**

आताच्या जुन्या झालेल्या ३० मे.वॅ./६२.५ मे.वॅ./१२० मे.वॅ. क्षमता असलेल्या केन्द्रांची प्रतिस्थापना करण्याचे ठरवले आहे. या केन्द्रांनी ३० वर्षाहून अधिक काळ कार्य केले आहे. या जागी २५० मे.वॅ./६०० मे.वॅ. क्षमतेची नवी युनिट स्थापण्याची योजना आहे.

| क्रमांक | प्रकल्प नाव | चालू क्षमता मे.वॅ.I | नियोजित क्षमता मे.वॅ. | एकूण वाढ मे.वॅ. | अंदाजे खर्च मे.वॅ./रु. कोटी | एकूण वाढ मे.वॅ. | चाचणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोरडी औष्णिक प्रतिस्थापना प्रकल्प | ४×१२० | १×६०० | १८०.०० | ६.०० | १८०.०० | मार्च २०१४ |
| २. | पारस औष्णिक प्रतिस्थापना प्रकल्प | १×६२.५० | २५० | १८७.५० | ५.५० | १८७.५० | डिसे. २०११ |
| ३. | पारस औष्णिक प्रतिस्थापना प्रकल्प | २×३० | २५० | १९०.०० | ५.५० | १९०.०० | ऑग. २०११ |
| ४. | भुसावळ औष्णिक प्रतिस्थापना प्रकल्प | १×६२.५ | २५० | १८७.५० | ५.५० | १८७.५० | ऑक्टो. २०११ |

वर वर्णन केलेल्या प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर महानिर्मिती कं आपल्या क्षमतेत ४,२८५ मेगावॅट वाढ करु शकले. (यात ७४५ मेगावॅट चे तिसऱ्या टप्प्यातील पुनर्स्थापना प्रकल्प समाविष्ट आहेत.)

वर उल्लेख केलेल्या टप्पा २ व टप्पा ३ (फेज II व फेज III) प्रकल्पांसाठी महानिर्मिती ही मूलभूत तयारी, आवश्यक साहित्य इत्यादि जमविण्याच्या प्रक्रियेत गुंतलेली आहे. या शिवाय या कामांना लागणारे वैधानिक परवाने इत्यादि मिळविण्याचे कामही चालू आहे.

## दुय्यम संस्था

**महागुज कॉलीअरीज लि.**: ही संस्था आपली कंपनी आणि गुजरात राज्य वीज कंपनी मर्यादित यांच्यातील संयुक्त परिक्रम आहे. या परिक्रमात मच्छकाटा (ओरिसा) येथील कोळसा खाणीतील सर्व उपलब्ध कोळसा काढण्याची संयुक्त कार्ययोजना हाती घेतली आहे. खाणीचा विकास करून खाणी उत्पादक करण्यासाठी कंपनीने निविदा प्रस्तृत/प्रकाशित केली आहे. निविदा अर्ज विक्रिला मोठा प्रतिसाद लाभलेला आहे. भूगर्भ शास्त्रज्ञांचे अंतिम अहवाल (CMPDIL) हाती आले आहेत. ते अहवाल सर्व निविदा अर्ज खरेदी करणाऱ्यांना वाटण्यात आले आहेत. खाणीचा नकाशा तयार करण्याचे काम आणि कुंपण रेषा नक्की करुन त्या ठळकपणे दर्शविण्याचे काम, ही प्रक्रीया आता सुरू आहे.

**धोपावे कोस्टल पॉवर लि.**: या कंपनीची स्थापना २×८८० मेगावॅटची दोन औष्णिक वीज निर्मिती कारखाने धोपावे याच गावी करण्यासाठी प्रस्थापिलेली आहे. या औष्णिक वीज निर्मितीसाठी फक्त आयात केलेला कोळसा इंधन म्हणून वापरला जाईल. (म्हणून याला ग्रीन फील्ड प्रोजेक्ट म्हटले आहे.) आपली कंपनी अधिकृत प्रतिनिधी म्हणून महावितरणने नेमलेली आहे. आम्हाला इथे या प्रकल्पाचे, प्राथमिक प्रकल्प विकास कार्य पूर्ण करायचे आहे. हा निर्णय महावितरण (MSEDCL) ने घेतलेला आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पासंबंधीची सर्व कागद पत्रे (प्रकल्प उभारणी, ती महावितरणला सोपवणे, इत्यादी) MSEDCL च्या निर्देशानुसार अधिकृत संस्थांकडे सोपविली आहेत.

**औरंगाबाद पॉवर कंपनी लि. आणि धुळे पॉवर कं. लि.**: या संस्था विविध औष्णिक प्रकल्प (ग्रीन फील्ड म्हणून) भारत सरकारच्या वीज मंत्रालयाच्या (केस २) मार्गदर्शक तत्त्वानुसार उभारल्या आहेत.



Mahajenco Marathi notice.indd 28 5/29/2009 7:07:25 PM

### अपारंपारिक उर्जा स्त्रोत उभारण्यासाठी कंपनीने घेतलेला पुढाकार (सौर उर्जा (PV) निर्मिती)

सौर उर्जेची संभाव्य प्रचंड क्षमता लक्षात घेता महानिर्मितीने सौर उर्जा (पीव्ही) आधारित व मेगावॅट क्षमतेची संयत्रे उभारण्याचे नक्की केले आहे. हे संयत्र ‘‘नवी पुनर्निर्मिति उर्जा’’ (New and Renewable Energy) (MNRE) खाती अपारंपारिक उर्जा स्त्रोत भारत सरकार, मंत्रालय यांच्या मार्गदर्शनानुसार उभारले जाणार आहे. हे १ मेगावॅट सौरउर्जा संयत्र चंद्रपूर येथे उपलब्ध जागेत उभारले जाणार आहे. यासाठी MNRE भारत सरकार यांचे कडे अर्ज या आधि रवाना केलेला आहे. या प्रकल्प कार्यासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रकल्पाला अंदाजे रु. २५ कोटी खर्च अपेक्षित आहे. यातील निधी ’’पी.एफ.सी.’’ किंवा ’’आय.आर.इ.डी.ए.’’ यांचे कडून ७०/३० प्रथेवर घेतला जाईल. या वर्ष अखेर हे यंत्र सुरु व्हावे अशी अपेक्षा आहे.

### नव्या प्रकल्पासाठी निधी सोय/व्यवस्था

सर्व नियोजित क्षमता वाढवणारे प्रकल्प यांच्यासाठी लागणारा निधी ८०:२० ऋण समतुल्यता गुणोत्तरात उभारले जातील. कंपनी आपल्या महसूलाचा काही भाग वर्गणी म्हणून या प्रकल्पाचे समभाग उभारण्यात वापरील प्रकल्पाचा ८० टक्यापर्यंचा खर्च अर्थ व्यवहार संस्थांकडून घेतलेल्या निधीतून केला जाईल. वीस टक्के निधीसाठीचे समभाग हे मुख्यत: महाराष्ट्र राज्य सरकारकडून घेतले जाईल. महाराष्ट्र सरकारने २,३७६ कोटी रुपये हे या कोराडी व चंद्रपूर येथील प्रकल्पाच्या विस्तारासाठी भागभांडवल म्हणून मंजूर केलेले आहे. चन्द्रपूर प्रकल्पासाठी उर्वरित निधी हा आर.इ.सी.कडून मुदत कर्ज घेऊन पूर्ण होईल.

### पत श्रेयता (क्रेडिट रेटींग)

मेसर्स क्रेडीट ऍनालिसीस ऍण्ड रीसर्च लिमिटेड CARE (केअर) या मान्यवर संस्थेने कंपनीचे क्रेडीट रेटींग ह्या दीर्घकालीन कर्ज व लघुकालीन कर्ज या दोन्ही करता तपासलेली असून त्यानी आपल्या कंपनीला ‘‘अे’’ मानक (उच्च श्रेयता) प्रदान केली आहे. लघुकालीन कर्जासाठी पी.आर.आय. (PRI) म्हणजे वेळच्या वेळी परतावा करण्याची मानसिकता आणि घेतलेली लघुकालीन बंधने योग्य प्रकारे पाळण्याची क्षमता म्हणून कमीत कमी धोका अशी शिफारस कंपनीला या संस्थेकडून मिळाली आहे.

### इंधन सुरक्षा

आपली प्रस्थापित वीज उर्जा निर्मिती क्षमता ही बहुतांशी औष्णिक उर्जा आहे. या मुळे कंपनी फार मोठया प्रमाणात कोळसा या इंधनावर अवलंबून आहे. पुरेसा, वेळीच व उत्तम प्रतिचा कोळसा पुरवठा होणे हे आपल्या सातत्याने वीजनिर्मिति करुन जनतेला पुरवणे या कार्यातील अति महत्त्वाचे गमक आहे. या साठी कंपनीने आपल्या प्रथम टप्प्यातील विस्तार कार्यक्रमाला कोळसा पुरवठयाची दीर्घकालीन सोय करुन ठेवली आहे. त्यासाठी आपल्या कंपनीने कोल इंडियाच्या विविध दुय्यम संस्थांपाशी दीर्घकालीन संबंध प्रस्थापित केले आहेत. या शिवाय ओरिसा राज्यातील मच्छकाटा व महानंदा कोळसा क्षेत्र हे कायम स्वरूपी हक्काचे म्हणून आपली दुय्यम कंपनी महागुज कॉलीअरीज तर्फे मिळवलेले आहेत. या खाणीमधून मिळणारा कोळसा दुसऱ्या टप्याचे नियोजित विस्तार कार्यक्रमात उपयोगी पडणार आहे. या शिवाय काही पुनर्बान्धणी प्रकल्पातही या कोळशाचा उपयोग होईल आपल्या कंपनीला उत्तर प्रदेश राज्य विद्युत नियम मर्यादित यांच्याकडून चंदीपाडा व चंदीपाडा-I इथे आणि छत्तीसगड मिनरल कंपनीकडून कोळसा काढण्याचे अधिकार मिळाले आहेत.



Mahajenco Marathi notice.indd 29 5/29/2009 7:07:26 PM

कोळसा पुरवठयात वारंवार जाणवणारी कमतरता पूर्ण करण्यासाठी कंपनीने कोळसा आयात करण्याचे धोरण ही अवलंबिले आहे. ही आयात (१,५०० दशलक्ष मेट्रीक टन) भुसावळ, परळी, खापरखेडा व नाशिक येथील औष्णिक वीजनिर्मिती केन्द्रासाठी आहे.

## नजीकच्या काळासाठी उपाययोजना

सध्या गॅसवर चालणारी संयंत्रे गॅसचा कमी पडणारा पुरवठा व त्यावर उपाय म्हणून कंपनीने एप्रिल ८ पासुन जागेवर मिळणारा एल.एन.जी. गॅस वापरायला सुरुवात केली आहे. कंपनीने नैसर्गिक वायु/रीगॅसिफाईड लीक्वीफाईड नॅचरल गॅस (RLNG), मे. एल.एन.जी. हाजिरा प्रा. लि. यांच्याकडून खरेदी केला आहे. तसेच ओ.एन.जी.सी. कडून ही विकत घेतला आहे.

## मानवी साधन संपत्तीचे व्यवस्थापन

आपले कर्मचारी हे कंपनीची सर्वात महत्त्वाची संपत्ति होय. त्यांच्या उत्तम कार्यक्षमतेसाठी सभोवारचे वातावरण हे सतत उत्साहवर्धक आणि सृजनशील ठेवण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची असून व्यक्ती-व्यक्ती मधील नव संकल्पना/सृजनता यांना प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. आपल्या कंपनीने या दिशेने सतत प्रयत्न केले आहेत. कर्मचारी वर्गाची कार्यक्षमता वाढविणे हे उदिष्ट डोळ्यासमोर ठेऊन कंपनीने पावले उचलली आहेत. शिक्षित, तंत्र विशारद, आणि बहुविध शिक्षित तज्ञ असे कर्मचारी हे महानिर्मितीकडे असलेले मोठे भांडवल आहे. त्यांच्या क्षमतेच्या सामर्थ्यावरच कंपनी अनेक प्रकारची आव्हाने पेलून पार करु शकते आहे. आपल्या कंपनीची सांघिक श्रेष्ठता तत्वावर पूर्ण श्रध्दा आहे. आणि म्हणून माणूस (कर्मचारी) हित प्रथम हे तत्व पाळले जाते. त्यातूनच बरोबर काम करण्यांच्या सक्षमतेचा योग्य वापर घेण्यात आम्ही यशस्वी ठरतो. आज कंपनीकडे एकूण कर्मचारी संख्या १५.५२८ इतकी आहे. (ही आकडेवारी ३१-३-०८ ची आहे.) गतवर्षी ३१-३-०७ आपली कर्मचारी संख्या १४,६५५ इतकी होती.

## औद्योगिक संबंध

कंपनीतील कर्मचाऱ्यांशी व्यवस्थापकीय संबंध हे सौहार्दपूर्ण असेच राहिले आहेत सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामासंबंधी अधिक प्रशिक्षित व कार्यक्षम करण्याच्या हेतूने अभ्यासवर्ग सर्व स्तरावर घेतले जातात. सभोवार सतत बदलल्या स्थितिविषयी/तंत्रज्ञाना बद्दल आणि एकूण परस्पर संबंधी होणाऱ्या बदलांबद्दल त्याग अधिक संवेदनशील करण्यासाठी या अभ्यास-गटांचा उपयोग होत असतो.

एकंदरीत पाहता कंपनीतली औद्योगिक नातेसंबंध स्थिति ही शांतीपूर्ण अशीच राहिली आहे. त्यात परस्पर विश्वास व सुसंवाद साधणारा असाच धागा नेहमी राखला जातो.

## अनुसूचित जाती जमाति व इतर मागास वर्गासाठी राखीव जागा

आपल्या कंपनीने सरकारची या बाबतची धोरणे व सूचनानुसार अनुसूचित जाति जमाति, इतर मागास वर्ग या सर्वासाठी आपल्या सेवा क्षेत्रात राखीव जागा व्यवस्था केली आहे.

## प्रशिक्षण आणि विकास

महामंडळाच्या संस्कृतिला साजेल अशा निगमी दुरदृष्टिनुसार सर्वोत्तम सुपरिणामी, सक्षम अशी या देशातील वीज निर्मिति संस्था आपल्याला ठरले पाहिजे. यासाठी आपली कंपनी कर्मचारी वर्गाचा सर्वागीण विकास घडविण्यासाठी सतत कार्यरत आहे. कंपनीची स्वत:ची दोन प्रशिक्षण केन्द्रे आहेत. कोराडी अणि नाशिक येथे प्राथमिक स्वरूपाचे प्रशिक्षण प्रदान केले जाते. शिवाय अधिकारी वर्गासाठी विविध स्वरूपाच्या कामाचे प्रशिक्षण प्रदान करण्यात येते. यात वीज निर्मिती कारखान्याचे दैनंदिन

कार्य व त्याचा विकास याचा समावेश आहे. याशिवाय गरजेनुसार कंपनी पुणे मुक्कामी 'यशदा' या केंद्रावर, इएससीआई, हैद्राबाद, विविध आइआइटी कॉलेजेस, भेल व इतर बाहेरील केंद्रे अशा ठिकाणी ओएंडएएम, एमडीपी, सुरक्षा प्रकल्प व्यवस्थापन, वागणूकीचे शास्त्र इत्यादि विषयात आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करेल. गतवर्षी एकूण ६३ प्रशिक्षण केंद्रे विविध कर्मचाऱ्यांसाठी उपयोगात आणलेली आहेत.

## अनुसूची VI वरुन कंपनी कायद्या नुसार हिशेबांचे स्थलांतर

कंपनीच्या अर्थकारण, हिशेब या खात्यातील अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या सतत प्रयत्नानुसार कंपनीला आपली हिशेब-पध्दति ही वीज पुरवठा (वार्षिक हिशेब) नियम १९८५ अनुसूची VI या पध्दतिवरुन स्थलांतरीत करुन ती कंपनी कायदा १९५६ अनुसार आर्थिक वर्ष २००८ पासून बदलता आली आहे.

## मराठी भाषेचा वापर

आपली कंपनी दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा वापर होण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे. अंतर्गत पत्रव्यवहार आणि सरकारी खाती वगैरेशी होणारा पत्रव्यवहार मराठीतून होण्यासाठी कंपनी जागरूकतेने आणि प्रयत्नपूर्वक कार्यरत राहिलेली आहे. वार्षिक अहवाल/लेखा परिक्षणे इत्यादि तांत्रिक बाबीपण मराठी भाषेतून सादर केल्या जात आहेत.

## बदलांचे व्यवस्थापन 'इआरपी'ची पूर्तता

एन्टरप्राईज रीसोर्स प्लॅनिंग (इआरपी) या तत्वांची पूर्तता करण्यात आपली कंपनी सध्या व्यस्त आहे. कंपनीमधील विविध खाती, कार्यालये, शाखा व संबंधित सर्व संघटना यांच्यातील परस्पर संवाद, माहितीची देवाण-घेवाण ही वाढती तसेच वरची उपयुक्त पातळी राखून कंपनीच्या कारभारात सक्षमता आणणे/राखणे, प्रगतीची वाट स्पष्ट करणे, रुंदावणे ही या 'इआरपी'ची उद्दीष्टे असून ती अंमलात आणण्यासाठी कंपनी जोरदार प्रयन्त करीत आहे.

## दर नियामक खाते

केंद्रीय व राज्य सरकारच्या नेमलेल्या मंडळाचे (कमिशनचे) नियमांनुसार व त्यासंबंधी बाबींचे नियमन करण्यासाठी एक लहान खाते कंपनीने उभारले आहे. या खात्याकडून महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून दर-पत्रके मंजूर करून घेणे आणि वार्षिक कार्याचा आढावा २००७-०८ आणि २००८-०९ या वर्षाचे दर पत्रक तयार करणे व तेय मंजूर करून घेणे ही जबाबदारी या खात्याला दिलेली आहे. 'एइआरसी'ने ३१-०–०८ रोजी आज्ञा जारी केली आहे. त्यानुसार ती दरपत्रके असल्याची खात्री करून घेणे ही या खात्याची कामे आहेत. महानिर्मितीने अपिलेट ट्रीब्यूनलकडे या हुकुमाविरूद्ध अपील केले आहे. या अपिलेट ट्रीब्यूनलने पहिल्या वर्षापासून २००८ पर्यंतच्या दरपत्रकांची पाहणी करून घेण्यासाठी खास स्वतंत्र समिति नेमण्याची आज्ञा केलेली आहे.

## पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा

पर्यावरण स्तर सांभाळण्यासाठी आपल्या कंपनीने सर्वत्र विशेष काळजी घेतलेली आहे. त्यातले काही उपाय पुढे दिले आहेत.

## वृक्ष लागवड आणि हिरवळ पट्टे यांचा विकास

महानिर्मितीने वनीकरणाची मोठी योजना हाती घेतली असून या बहुतांश महानिर्मितीच्या औष्णिक वीज निर्मिती केंद्रांच्या परिसरात आहेत. आतापर्यंत २७ लाख ५० हजार झाडे अशा प्रकारे वाढवलेली आहेत. आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परिमाणानुसार हिरवळ पट्टे हे सर्व औष्णिक वीज निर्मिती केंद्राभोवती विकसित केलेले आहेत.



Mahajenco Marathi notice.indd 31 5/29/2009 7:07:26 PM

## धुरांडी व धूर नियंत्रण

ठरलेल्या ध्येय-धोरणांना अनुसरून महानिर्मितीने आपल्या जुन्या झालेल्या औष्णिक वीज निर्मिती केंद्रांमधील हवेत निघणारा धूर 'एस-पी-एम' नियमांनुसार नियंत्रित केला आहे. २०० मेगावाटचे कोराडी केंद्र नूतनीकरण करून त्यावर अमोनिया पिशवी बसवलेली आहे. (यालाच अमोनिया 'जीएफसी' असे नाव आहे.) 'एस-पी–एम'ने प्रमाणित केलेल्या नियमांनुसार राहिलेल्या इतर १० संचामधे उडणारी राख नियंत्रित करण्याची यंत्रणा बसवण्यात आली आहे. आपल्या इतर १० संचावरही कंपनीने वायु अनुकूल पध्दति (गॅस कंडिशनिंग सिस्टीम) बसविण्याचा निर्णय घेतला आहे.

### वातावरणाची गुणात्मकता

सर्व औष्णिक वीज निर्मिती केन्द्रांमधील वातावरणाची गुणात्मकता सतत लक्षपूर्वक तपासली जाते व ती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवलेल्या मर्यादेनुसार असल्याची खात्री करण्यात येते.

### आरोग्यदायी वातावरणासाठी सुरक्षा तपासणी

वातावरण, आरोग्य आणि सुरक्षा यांची नियमित तपासणी ही २००४-०५ वर्ष काळात केन्द्रीय कामगार संस्थेने केली आहे. सर्व औष्णिक वीज निर्मिति केन्द्रामधे त्यांच्या शिफारसी अंमलात आणल्या जातात. अंतर्गत तपासणी याचसाठी वर्ष २००७-०८ मधे केली गेली

### राखेचा वापर

महानिर्मितीने राखेचा वापर अधिक परिणामकारक केलेला आहे. ही सुधारणा गेल्या तीन वर्षातील असून त्याची आकडेवार खाली दिली आहे.

| वर्ष | राख वापर टक्केवारी |
|---|---|
| २००४-०५ | १५.९५% |
| २००५-०६ | २४.१०% |
| २००६-०७ | २७.००% |
| २००७-०८ | ३०.६०% |

पारस केन्द्रातील ८३.५० टक्के, भुसावळ ६०.६२ टक्के आणि खापरखेडा औष्णिक केन्द्रात ४४.०८ टक्के राखवापर २००७-०८ या वर्षकाळात साध्य झाला

### औष्णिक वीज निर्मिति केन्द्रातून निघणाऱ्या राखेचे उपयोग/उपयुक्तता ही वाढविण्यासाठी संशोधन प्रकल्प

खाण-खड्डा भरणी दुर्गापूर भूगर्भ खाणीत १ लाख सी.यु.टी.आय.एफ.ए.च्या सहाय्याने चंद्रपूर महाऔष्णिक वीज केन्द्र येथे केले आहे

### निसृत पाणी वापर यंत्रणा

महानिर्मितीने आपल्या विविध औष्णिक वीज निर्मिति केन्द्रात वाहून जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करण्याची सोय करणारी यंत्रणा बसवली आहे. असा पुनर्वापार करुन शुध्द केलेले पाणी वार्षिक सरासरी नुसार पारसला १०० टक्के आहे. खापरखेडा ७३ टक्के, नाशिक ६६.८२ टक्के आणि कोराडी केन्द्रात ६२.९० टक्के आहे.

### नवे प्रकल्प व शुध्द वातावरण

उरण प्रकल्पाची वाढीव क्षमता १,२२० मेगावॅट साठी वातावरण शुध्दी परवानगी एम.ओ.इ.एफ. ने दिली आहे. २ × ८०० मेगावॅटचे संयत्र धोपावे प्रकल्पासाठी जे उभारायचे आहे. त्यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उभारणी परवानगी मिळाली आहे. परळी, पारस, भुसावळ इथे प्रत्येकी १ × २५० मेगावॅटचे संयत्र पुर्नउभारणी कार्यक्रमात बसवायचे आहे. त्यासाठी परवानगी एम.ओ.इ.एफ., नवी दिल्ली यांचे कडून मिळविण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे चंद्रपूर येथे २ × ५०० मेगावाटचे दोन महाऔष्णिक वीज केन्द्र विस्तार प्रकल्प आणि ३ × ६६० मेगावॅट प्रकल्प कोराडी येथील औष्णिक केंद्राच्या विस्तार योजनात आहेत. या सर्वाची परवानगी मिळविण्यासाठी प्रक्रीया सुरु आहे.

### संचालक

या वर्षकाळात श्री. बी. पी. पांडे, मुख्य सहायक (ऊर्जा), जी.ओ.एम. हे या कंपनीचे संचालक म्हणून राहिले नाहीत त्यांच्या जागी श्रीयुत राहुल अस्थाना, मुख्य सहायक (ऊर्जा), जी.ओ.एम. यांना कंपनी संचालक, दिनांक ५-४-२००७ पासून नियुक्त करण्यात आले आहे.

या वर्ष काळात श्री. जी. जे. गिरासे यांना कंपनीने संचालक (वित्त) म्हणून ५ मे २००७ पासून नियुक्त करण्यात आले आहे.

श्री. एम. आर. शेलार यांना कंपनी संचालक (प्रवर्तन) म्हणून २७-१–०७ पासून नियुक्त केले आहे. मुखत्यार आस्थापन म.रा.वि.मं. यांच्या मंजूरीनुसार ही नियुक्ती झाली आहे व ती नियुक्ती संस्थापक नियमावलीचा अनुच्छेद ७५ व ७० नुसार झाली आहे.

संचालक मंडळ श्री. विनायक राव, श्री. बी. पी. पांडे आणि राहुल अस्थाना यांनी केलेल्या मौलिक सेवेचा गौरव इथे नमूद करीत आहे. मंडळावर नव्याने नियुक्त झालेल्या सभासदांचे हे मंडळ हार्दिक स्वागत करते आहे.

### संचालकांच्या जबाबदारी संबंधि निवेदन

कंपनी कायदा १९५६ चे कलम २१७ (२)(ए)(ए) अनुसार संचालकांच्या जबाबदारी बद्दल निवेदन इथे देण्यात आले आहे.

१) वार्षिक हिशेब ताळेबंद हे लागू असलेल्या मानक विनिर्देशानुसार तयार केले असून योग्य तो खुलासा या विनिर्देश बाहेर गेलेल्या बाबी बद्दल दिला गेला आहे. यांची खातरजमा करणे.

२) निव्वळ/निश्चित केलेली हिशेब/लेखा लिखाण धोरणे योग्य प्रकारे आणि सतत लागू केलेली आहेत व निवाडा-निर्णय आणि अंदाज पत्रके ही सुयोग्य आहेत व विवेकपूर्ण पध्दतीने बनवली गेली आहेत जेणे करुन कंपनीच्या स्थितिचा सुयोग्य आढावा घेता येऊ शकेल (दिनांक ३१ मार्च २००८ रोजी) आणि कंपनीच्या नफ्याचे परिक्षण करता येईल

३) संचालकांनी योग्य, पुरेसा वेळ/काळजी घेऊन लेखा पध्दतीचे विवरणादि देणारी कागदपत्रे/बुके, रजिस्टरे ही कंपनी कायदा १९५६ नुसार तयार केली आहेत याची खात्री करायची असते. जेणे करून कंपनीची संपत्ती, मालमत्ता यांची सुरक्षा सुनिश्चित राहील. आणि कुठलीही अफरातफर होण्यापासून कंपनी वाचू शकेल अथवा झालेली अफरातफर उघडकीस आणता येईल.

४) चालू नित्य व्यवसाय या आधारेच कंपनीचे वार्षिक लेखा हिशेब तयार केले जातात ते आर्थिक वर्ष ३१ मार्च २००८ साठीच तयार केले आहेत



Mahajenco Marathi notice.indd 33 5/29/2009 7:07:26 PM

## उर्जा संधारण नव तंत्रज्ञान आत्मसात करणे व परकीय चलन अर्जन

उर्जा संवर्धनाबद्दल माहीती, नव नवे तंत्रज्ञान आत्मसात करणे व परकीय चलन मिळकत व खर्च या बद्दलची माहीती कलम २१७(१)(९) कंपनी कायदा १९५६ नुसार अनुसूची (अ) या अहवालाचा भाग असलेले त्यात दिलेली आहे.

## नियत ठेवी

कंपनीने कुणाकडूनही अशा नियत ठेवी (फिक्स्ड् डिपॉजिटस्) मागवल्या नाहीत अथवा कुणाच्याही अशा ठेवी कंपनीकडे नाहीत

## विमा

कंपनीची सर्व मालमत्ता/संपत्ती इत्यादिंना पूर्ण विमा संरक्षण घेतले आहे.

## परिव्यय लेखा परिक्षक (कॉस्ट ऑडिटर)

कंपनीने मेसर्स वाय. आर. दोशी ऍण्ड कं., परिव्यय लेखा परिक्षक यांना ३१-३-२००८ ला संपणाऱ्या वर्ष काळासाठी परिव्यय लेखा परिक्षक म्हणून कंपनीचे व्यवहार तपासण्यासाठी नेमले आहे. ही नेमणूक केन्द्र सरकारच्या सांघिक कारभार मंत्रालयाकडून मंजूर होणे अपेक्षित आहे.

## लेखा परिक्षक (ऑडिटर्स)

कंपनीचे संविधिक लेखा परिक्षक हे महालेखाकार वाणिज्यिक, लेखापरिक्षा यांचेकडून नेमले जातात. मेसर्स फोर्ड ऱ्होड्स् पार्कस् ऍण्ड कंपनी, मुंबई व मेसर्स पी. जी. जोशी ऍण्ड कंपनी, नागपूर व मेसर्स पी. जी. भागवत ऍण्ड कं., पुणे हे संयुक्तपणे संविधिक लेखा परिक्षक आर्थिक वर्ष २००७-०८ या काळात या अवधितील व्यवहारासाठी नेमलेले आहेत.

## अभिस्वीकृति-आभार

कंपनीचे संचालक हे आपले गौरवपूर्ण कौतूक त्या सर्वाप्रति इथे मुद्दाम नोंद करु इच्छितात, ज्या सर्वांनी आपले मनापासून सहकार्य आमच्या यशस्वी कार्यवाही करता आम्हाला दिले आहे. यात केन्द्र सरकार मधील अधिकारी/कर्मचारी, राज्य सरकार मधील अधिकारी/कर्मचारी विविध खात्या अंतर्गत काम करणारे सर्व अभिप्रेत आहेत.

त्याशिवाय आर्थिक संस्था, बॅन्का, संविधिक लेखा परिक्षक, परिव्यय परिक्षक, केन्द्रीय व राज्य स्तरीय वीज नियामक अधिकारी, अपील प्राधीकारीय आणि कंपनीचे भाग धारक या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत म्हणून त्या संगळ्यांचे आभार मानतो आहोत. संचालक मंडळ कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांचेही इथे आभार मानत आहोत.

संचालक मंडळाचे वतीने

सही

| | | |
|---|---|---|
| स्थळ: मुंबई | **पी अब्राहम** | **अजय मेहता** |
| दिनांक: ३०-०-२००९ | अध्यक्ष | व्यवस्थापकीय संचालक |

# संचालक मंडळाचा अहवालातील प्रकट निवेदन कंपनी कायदा (रूल) नियम १९८८ नुसार तपशील

## उर्जा संवर्धन

२००७-०८ या वर्षकाळात खालील उर्जा संवर्धन उपाय केले गेले.

- उर्जावापर तपासणी – कंपनीच्या विविध संस्था/कार्यालये/कारखाने यात कम्प्रेस्ड एअर, बॉयलर, पाणी पुरवठा, थंड करण्यासाठी वापरलेले पाणी पद्धतीचे निरीक्षण तपमान वृद्धि तपासणी इत्यादि.
- कर्मचारी वर्गातील उर्जाबचती संबंधी जाणीवा वाढवणे, त्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन.
- महानिर्मितीकडे इंजीनीअर्सचा एक ताफा कार्यरत आहे, त्यांचे काम – उर्जा संवर्धन वाढवणे/टिकवणे हेच असून तेच उर्जावापर तपासणी करतात. हे इंजीनीअर्स प्रमाणित उर्जावापर व्यवस्थापकही आहेत. त्यांच्या जाणकार विद्येचा फायदा महानिर्मितीला आपल्या दैनंदिन कार्यप्रणालीत होतो.

## सहाय्यकारी उर्जा वापर

- ०.२ वर्ग उर्जामीटरच्या वापराने सहाय्यक उर्जा वापराची तंतोतंत आकडेवारी मिळते.
- सूर्यप्रकाशाचा पूर्ण उपयोग.
- कार्यरत नसलेली यंत्रे, उपकरणी, दिवे इ. कटाक्षाने बंद करणे.
- प्रकाशयोजनेत कमी उर्जेत सर्वाधिक प्रकाश देणाऱ्या साधनांचा वापर करणे. जुन्या पद्धतीचे नूतनीकरण.
- कम्प्रेस्ड एअर मशीनमधील गळती ओळखून त्वरित थांबवणे, वाफ-वाहक-पाईपमधील गळती थांबवणे, संयंत्र थंड करणाऱ्या जलवाहिन्यातील गळती थांबवणे, अनेक ठिकाणी होणारी वीजवाहकातील गळती थांबवणे.
- DM पाणी प्रवाहमापक (मीटर्स) बसवले आहेत.
- नैसर्गिक थंडावा देणाऱ्या पद्धति उरण केंद्रावरील वायु/औष्णिक युनिटमध्ये बसवल्या आहेत.
- सहाय्यक यंत्रणेची वेळोवेळी पाहाणी करून वेळीच त्यांची दुरुस्ती करून अपव्यय टाळणे.

## प्रकाश योजना

- अति उच्च शक्तिचे जुने एचपीएमव्ही दिवे बदलून नवे एचपीएसव्ही दिवे बसविले आहेत.
- इलेक्ट्रॉनिक बालास्ट आणि सीएमएफ दिव्यांचा वापर.
- इमारतींमधील जिने व टरबाईन, बेसमेन्ट सारख्या भागात प्रत्येक प्रकाशदायी दिव्याची चालू-बंद स्वीचेस (बटणे) बसवली आहेत.

## उष्णता उर्जा

- ऑनलाईन कण्डेन्सर ट्यूब क्लीनींग सिस्टीमवर बारीक लक्ष ठेवणे.
- उष्णता वाहकावर लावलेले इन्शुलेशन गरज पडताच लगेच दुरुस्त करणे.
- हवेचे उष्णीकरण करणारी सिस्टीम आणि भट्टी या स्वच्छ ठेवणे.



Mahajenco Marathi notice.indd 35 5/29/2009 7:07:27 PM

- बॉयलरमध्ये येणारी अतिरिक्त हवा प्रमाणित करणे.
- एसई/जीएम/सीजीएम पातळ्यावर उष्णतादर आठवड्याला/पंधरवड्याला व दरमहा प्रमाणित करणे.

## वंगण

- सर्व उर्जानिर्मित कारखाने/युनिट येथे गळती पूर्णत: थांबवणे.
- वाहत्या पाण्याबरोबर जाणारे तेल – पाण्यातील तेलांश काढून घेणारे ''स्कीमर्स'' तयार केले आहेत.
- भुसावळ व नाशिक औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील टर्बाइन व बीएफपी ऑईल गाळणारी अपकेंद्री (सेन्ट्रीफुगल) यंत्रणा बसवली आहे.

## डीएम वॉटर

- डीएम वॉटर फीड लाईन व स्टीम गळती लगेच दुरूस्त केली जाते.
- खापरखेडा औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील बॉयलर ट्यूब सोनिक झाल्याचे लगेच उघडकीस आणणारी यंत्रणा लावली आहे.

## संकीर्ण पाणी

- कोराडी, नाशिक, खापरखेडा, चन्द्रपूर येथील औष्णिक वीज निर्मिति केंद्रात राखाडी थंड करण्यासाठी वापरलेले पाणी शुद्ध करण्याची यंत्रणा बसवली आहे.
- अग्नी शमन्तसाठी जमिनीवर बसवलेल नळ जमिनीखालून वर आलेले असतात. त्यातली गळती थांबवणे प्राथमिकतेने केले जाते.

## तंत्रज्ञान आत्मसात करणे आणि संशोधन व विकास

- अमोनिया इन्जेक्शन फ्ल्यु गॅस पद्धत स्थापणे.
- वापर पद्धत वरच्या दर्जाची (अपग्रेडेड) परळी युनिट ३ येथे.
- 'ई' टेण्डरची अंमलबजावणी साहित्य सामान इत्यादिच्या खरेदीसाठी – दोन्ही मुख्य कार्यालय व उत्पादक केंद्र या ठिकाणी.

## भविष्यातील योजना

- एएफजीसी पद्धत औष्णिक बीज निर्मिति केंद्रासाठी.
- कम्प्युटरमधील ऑनलाईन उर्जा व्यवस्थापन पद्धतिचा अवलंब.



Mahajenco Marathi notice.indd 36 5/29/2009 7:07:27 PM

## लेखा परिक्षकांच्या अहवालातील बाबींचा खुलासा (१.४.०७ ते ३१.३.०८)

| अ. क्र. | लेखापरीक्षण अहवाल | महानिर्मितीचे उत्तर |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा ३१ मार्च २००८ पर्यन्तचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक तपासला आहे. त्याचप्रमाणे रोकड प्रवाह तक्ताही अनुबध्द केलेला आहे. या सर्व प्रस्तुत केलेली आर्थिक विधानांची जबाबदारी पूर्णपणे कंपनीच्या व्यवस्थापनाची आहे. उपरनिर्दिष्ठ आर्थिक विधानांवर आमचे मत प्रदर्शित करणे फक्त हीच जबाबदारी आमची होय. | वस्तुस्थिति |
| २. | हिशेब तपासणीची जी प्रमाणे भारतात सर्वसाधारणत: मान्य आहेत त्यानुसारच आम्ही आमची तपासणी पूर्ण केलेली आहे त्या प्रमाणानुसार आम्ही हे आर्थिक तक्ते/हिशेब/इत्यादि कुठल्याही प्रकारची चुकीची माहिती दाखवणारी नाहीत याची खात्री करुन घेतो. त्याच तपासणीत कुठल्या तत्वावर हिशेब मांडणी केली आहे. कर्ता तत्त्वे सर्वमान्य/योग्य अशी आहेत याची खात्री करुन घ्यायची असते व्यवस्थापनांने केलेले विशेष अंदाज पत्रक योग्य पायावर उभे आहे याची खात्री करायची असते. आमचा असा विश्वास आहे की आमच्या तपासणीत या बाबीची खात्री आम्ही केलेली आहे. व त्यानुसार आम्ही आमचे मत देण्यास पात्र आहोत. | वस्तुस्थिति |
| ३. | कंपनी कायदा (हिशेब तपासणी नियम २००३ नुसार तो नंतर कंपन्याना जसा सुधारित केला त्यानुसार (सुधारणा) आज्ञा २००४, जी केन्द्र सरकारने जारी केली आहेत, ज्यात मुख्यत्वे उप कलम ४-(अ) याचा समावेश आहे. जे कलम २२७ चा भाग आहे व जो आमच्या तपासणीसाठी, आमच्या महितीनुसार आवश्यक होतो, आम्ही आमच्या जोड अहवालात परिच्छेद ४ व ५ यात त्याचा उल्लेख केला आहे. | वस्तुस्थिति |
| ४. | आमच्या या परिच्छेद ४-५ यातील टीप्पणी शिवाय आमचे असे मत नमूद करीत आहोत की:– | |
| | i) आम्ही आमच्या पूर्ण माहिती व संपूर्ण ज्ञात स्थितीनुसार या तपासणीसाठी आवश्यक सर्व माहिती मिळवली आहे. | वस्तुस्थिति |
| | ii) तक्त्यात कायदे/नियम इत्यादि नुसार हिशेबाची सर्व बुके / दफ्तरे / खातेवही कंपनीने ठेवली आहेत हे आमच्या तपासणी दरम्यान उघड, जेवढे आढळले त्यावरुन आम्ही सांगू शकतो | वस्तुस्थिति |
| | iii) ताळेबंद, नफातोटा पत्रक, रोकड प्रवाह (कॅश फ्लो) जी या अहवालात सर्व आम्ही तपासली बुके/दफ्तरे इत्यादि विषयी सर्व मिळती-जुळती आहेत. | वस्तुस्थिति |
| | iv) अधिसुचना क्रं. जी.एस.आर. ८२९ (इ) दिनांक २१-१०-२००३ सरकारी कंपन्या कलम २७४(१)(जी) कंपनी कायदा १९५६ याच्या बंधनातून मुक्त आहेत. | वस्तुस्थिति |



Mahajenco Marathi notice.indd 37 5/29/2009 7:07:27 PM

| अ. क्र. | लेखापरीक्षण अहवाल | महानिर्मितीचे उत्तर |
|---|---|---|
| | v) (अ) कंपनीची मालमत्ता व देणी दिनांक ६ जून २००५ रोजी जे आकडे दाखवण्यात आले ते महाराष्ट्र वीज सुधारण हस्तांतरण योजना २००५ नुसार आले आहेत. आम्हाला सांगितल्याप्रमाणे हे आकडे म.रा.वि.मं. मुखत्यार अस्थापना कंपनीने स्वीकृत केले आहेत या शिवाय असेही सांगण्यात आले की या बद्दलची अंतिम योजना ही महाराष्ट्र सरकार कडून अद्याप जाहिर केली गेलेली नाही आणि म्हणून सुरवातीच्या दाखवलेल्या रकमा कंपनीने स्वीकार करणे बाकी आहे. यात होऊ शकणारे बदल, त्यांचा प्रभाव आणि कंपनीच्या अर्थव्यवहारातील विधानावर पडेल, शिवाय आम्ही आमची टिप क्रं. २ कडे आपले लक्ष वेधित आहोत जी अनुसूची १५ मधे आहे. कंपनीला या वर्षात जे कर्ज दायित्व आहे. त्याबद्दलही टिप आहे. याचे व्याज कंपनीच्या जबाबदारीवर आहे. त्यात म.रा.वि.मं. मुखत्यार अस्थापना कंपनाने बदल योजना कंपनीला दिले आहे. | वस्तुस्थिति |
| | (ब) किरकोळ देणेकऱ्यांची बाकी/घेणेकऱ्यांची बाकी/कर्जे व अग्रीम रक्कमा व इतर येणी/देणी यांची बाकी (ज्यात म.रा.वि.मं. मुखत्यार अस्थापना कंपनीकडून येणे असलेली रक्कमही सामील आहे व इतर दुय्यम कंपन्यांचे व्यवहारही त्यात आहेत हे सर्व निश्चितपणे खात्री होणे गरजेचे आहे. खात्री करताना आवश्यक मेळ साधून समायोजन करावे लागेल. या समायोजनाचा परिणाम जो या जुळवणी मुळे उदभवू शकेल त्याचा 'नफा तोटा' पत्रकावर परिणाम निश्चित होईल. | तीनही भगिनी कंपन्यांचे अधिकारी वर्गाची समिति तयार केलेली आहे. ते या फरकाची मिळवणी करतील. |
| | vi) आमची टीप क्रं. २७(इ) या कडे पुन्हा लक्ष वेधित आहोत (अनुसूची १५) | |
| | ही टीप जलविद्युत केन्द्र भाडेपट्टीच्या भाड्यासंबंधी आहे. त्याचा हिशेब आता तदर्थ (अॅडहॉक) प्रकारे दाखवला आहे. व तो रु. ८५ कोटी इतका दाखवला आहे. प्रस्तावित दर हा रु. ४४५.५३ कोटी येवढा असून तो महाराष्ट्र विज नियामक मंडळाकडून मंजूर होणे बाकी आहे. | वस्तुस्थिति |
| | आमचा परिच्छेद ४ (V) मधील टीप्पणी करुन आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहिती नुसार व आम्हाला दिलेल्या खुलाशानुसार वरील हिशेब त्यावरील टीप्पणी सहित हे कंपनी कायदा १९५६ च्या आवश्यकते नुरूप सर्व माहिती देणारे आहेत शिवाय या माहितीची मांडणी पण कायद्यानुरूप असून योग्य आर्थिक चित्र दाखवतात.<br>अ) ताळेबंदाचे बाबतीत कंपनीची आर्थिक स्थिति ३१ मार्च २००८ ला काय होती.<br>ब) नफा-तोटा पत्रकानुसार हे त्या दिवशी संपलेल्या काळात झालेला नफा दाखवतात<br>क) रोकड प्रवाह (कॅश फ्लो) पत्रकानुसार त्या तारखेची स्थिती प्राप्त होते. | वस्तुस्थिति |

## लेखा परिक्षक (ऑडिटर्स) यांच्या जोड अहवालातील तिसऱ्या परिच्छेदात उद्घृत केलेल्या विषयांचा खुलासा

| क्रम | | लेखा परिक्षकांचा परिच्छेद | महानिर्मिती कंपनीचा खुलासा |
|---|---|---|---|
| १. | अ) | कंपनीने योग्यप्रकारे ज्यात संपूर्ण तपशील मिळू शकेल असे अभिलेख सांख्यकी तपशील व स्थिति याबद्दल माहिती म्हणजे ठिकाण त्याचा प्रत्यक्ष मालमत्तेशी संबंध त्या मालमत्तेचा क्रमांक हे दाखवणारे नोंद ठेवलेले नाही. त्याशिवाय मालमत्तेचे मोल, स्थावर मालमत्तेबद्दल त्या 'स्थावर मालमत्ता रजिस्टर' मध्ये व ताळेबंदात मिळते-जुळते दाखवलेले नाही. | तपशीलवार स्थावर मालमत्ता कार्यपध्दत याची रजिस्टरमध्ये नोंद आहे ते हिशेबाच्या कोडमध्ये दाखवले आहे. खंड ५, प्रकरण ५ आमच्या सर्व संचाना या नोंदी ठेवण्याबद्दल सूचना दिल्या आहेत या प्रक्रियेनुसार स्थावर मालमत्तेच्या मोलाची जुळणी ताळेबंदावरून होऊ शकेल. |
| | ब) | आम्हांला दिलेल्या माहितीनुसार कंपनी दर तीन वर्षांनी प्रत्यक्ष पाहणीवरून सर्व स्थावर मालमत्तेची पात्रता ठरवते जे आमच्या मते योग्यच आहे. कंपनीचा आकार/आवाका/ इत्यादी विचार करता व त्यांच्या त्या बाबतच्या व्यवसायाचे स्वरूप पाहता हे योग्यच आहे. कंपनीचे या आधि आर्थिक वर्ष २००६-०७ या काळात अशी पाहणी केली आहे. तथापि याची मिळवणी स्थावर रजिस्टरमध्ये नोंदलेले दिसत नाही. | सर्व औद्योगिक संच/घटक यांना स्थावर मालमत्तेच्या प्रत्यक्ष पडताळणीच्या मोलाशी मिळवणी स्थावर मालमत्ता रजिस्टरबरोबर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. |
| | क) | हिशेब तपासणी ज्या काळातील व्यवहाराची झाली त्या काळात कंपनीने कुठलीही स्थावर मालमत्ता किंवा अशा मालमत्तेचा मोठा भाग विकलेला नाही | वस्तुस्थिति |
| २. | अ) | व्यवस्थापन योग्य काळात आपल्या साठयाचे प्रत्यक्ष स्वरूपात पाहाणी करते व ते बरोबर असल्याची खात्री करून घेते | वस्तुस्थिति |
| | ब) | आम्हांस प्राप्त माहितीनुसार व खुलासा यावरून साठयांचीही प्रत्यक्ष तपासणी प्रक्रिया व्यवस्थापन ज्या प्रकारे करते आहे त्या सर्व जबाबदार पध्दति आहेत व पुरेशा सत्यदर्शक आहेत. इथे कंपनीच्या आकार/आवाक्याचा विचार करता याच प्रक्रिया योग्य ठरतात. | वस्तुस्थिति |
| | क) | प्रत्यक्ष पाहाणी संबंधी आम्ही तपासलेला अहवालावरून आम्ही असे सांगू शकतो की आमच्या मते कंपनी योग्य अभिलेख ठेवते आहे. यात कुठेही मोठी तफावत (कोळसा साठा सोडून) आढळली नाही. कोळशाच्या साठयातील तफावत ताळेबंदात योग्यप्रकारे समायोजित केली आहे. | वस्तुस्थिति |
| ३. | अ) | कंपनी कायदा १९५६ मधील कलम २०१ यात उल्लेख असलेल्या कुठल्याही कंपनीला, व्यवसायात किंवा संस्थाना कंपनीने कर्ज दिलेले नाही. हे आम्हांला मिळालेल्या माहितीनुसार आम्ही सांगतो आहेत. | वस्तुस्थिति |

| क्रम | लेखा परिक्षकांचा परिच्छेद | महानिर्मिती कंपनीचा खुलासा |
|---|---|---|
| | ब) आम्हांला मिळालेल्या माहितीनुसार कंपनीने 'कंपनी कायदा १९५६' मध्ये कलम ३०१ मध्ये उल्लेखिलेल्या कुठल्याही संस्थेला, कंपनीला इत्यादीकडून कर्जाऊ रक्कम घेतलेली नाही. | वस्तुस्थिति |
| ४. | आमच्या मते आणि आम्हांला प्राप्त माहितीच्या आधारे व खुलासा यावरून कंपनीमध्ये पुरेशी अंतर्गत नियंत्रण व्यवस्था आहे व ती व्यवस्था कंपनीच्या कारभाराचा आवाका/ आकार यानुसार आहे. कंपनीला लागणारे आवश्यक सामान त्याचा साठा तसेच स्थावर मालमत्ता व कंपनी बाहेरून घेत असलेल्या या सर्वावर पुरेसे नियंत्रण आहे.<br><br>तथापि आमच्या असे निरिक्षणात आले आहे की या अंतर्गत नियंत्रण व्यवस्थेत काही ''दुबळे दुवे'' असावेत विशेषत: खरेदी ज्याचे कडून होते त्या पुरवठादारांच्या याद्या ज्यात त्यांच्या संबंधी आवश्यक तपशील आढळत नाही आणि चालू येणी/देणी यांचा तपशील, विशेषत: सध्या घेत असलेल्या मालमत्तेबाबत तपशील ठेवलेला आढळला नाही. | सध्या पुरवठादारांसंबंधी माहिती त्यांच्या कार्यकालानुसार (वय) आणि त्यांच्या हिशेबाच्या 'कोड'नुसार आमच्या नव्या पध्दतीत मिळू शकते. |
| ५. | आम्ही तपासणी केलेल्या हिशेबाची पुस्तके, दफ्तरे यानुसार आणि आम्हांला मिळालेल्या माहितीनुसार कंपनीने कुठलाही व्यवहार कंपनी कायदा १९५६, कलम ३०१ नुसार दफ्तरमध्ये नोंद करणे गरजेचे ठरावे असा नाही. | वस्तुस्थिति |
| ६. | आमच्या माहितीनुसार व मिळालेल्या खुलासाप्रमाणे कंपनीने जनतेकडून कुठल्याही ठेवी स्वीकारलेल्या नाहीत कंपनी कायदा १९५६ कलम ५(८)(भ) या कलमातील समजुतीनुसार व नियमांनुसार यासाठी कंपनीने या कायद्यातील उपकलम (क्लॉज)(६) परिच्छेद वरील हुकुम या वर्षीचा ताळेबंद काळात (आम्ही तपासलेला) त्यांना लागू होत नाहीत. | वस्तुस्थिति |
| ७. | आमच्या मते आणि आम्हांला मिळालेल्या माहितीनुसार अंतर्गत हिशेब तपासणी व्यवस्था ही कंपनीचा कारभार, व्याप, आवाका इत्यादीसाठी अपुरी आहे तसेच कंपनीच्या व्यवसायाला अनुसरूनही ही पध्दत अयोग्य वाटते. कंपनीचे अंतर्गत हिशेब तपासणी खाते, आमच्या मते अपुऱ्या कर्मचाऱ्यांवर चालवले जाते आहे त्यामुळे त्यांच्या तपासाची व्याप्ती हीच अपुरी दिसून आली. कंपनी व्यवहाराचे सर्व पैलू या आर्थिक वर्ष काळात या हिशेब-तपासणी खात्याकडून तपासले गेले नव्हते. तथापि या अंतर्गत व्यवस्थेत काही सुधारणा दिसली विशेषत: गतवर्षीच्या तुलनेत. यंदाचे त्यांचे काम बरेच व्यापक व सुधारलेले आहे. याशिवाय आता कंपनीने बाह्य सनदी लेखापाल संस्थेला या कामासाठी नेमले आहे व ती या वर्षअखेरची घटना असून अंतर्गत हिशेब तपास व्यवस्थित होण्याची अपेक्षा आहे. | कंपनीमध्ये वेगळे/वेगळे स्वतंत्र अंतर्गत हिशेब तपास खाते आहे व त्याचे प्रमुख मुख्य व्यवस्थापक दर्जाचे नेमले आहेत. त्यांना मदतनीस म्हणून दोन मोठे अधिकारी, ३ विभागीय सहाय्यक, १ उच्चस्तरीय लिपिक व १ निम्नस्तरीय लिपिक नेमले आहेत.<br><br>हेच अंतर्गत हिशेब तपासणी खाते, बाहेरील क्षेत्रीय कार्यालये यांचेही हिशेब तपासते. मुख्य कार्यालय व २५ क्षेत्रीय कार्यालय यांचे हिशेब याच खात्याने गतवर्षी तपासले. इतर अंतर्गत तपासणी पध्दति पण कार्यरत आहे. यात महत्वाची पध्दत म्हणजे आर्थिक खर्चाची तपासणी निविदा विभागाचे कामावरही अंतर्गत तपासणी पध्दति आहे आता हे खाते अधिक सक्षम केले जात आहे. |

| क्रम | लेखा परिक्षकांचा परिच्छेद | महानिर्मिती कंपनीचा खुलासा |
|---|---|---|
| ८. | आम्ही स्थूल मानाने हिशेबाची पुस्तके इत्यादी तपासली आहेत व हे केंद्र सरकारच्या नियमानुसार आहे. कंपनी कायदा १९५६ कलम २०९ (आय)(ए) यातील केंद्र सरकार नियमाना धरून हे सर्व केले आहे. कलम २०८(आय) कंपनी कायदा १९५६ यात सांगितलेली किंमत (मोल) नोंदीबद्दल आमचे मत आहे की मूलभूतपणे आम्हांला तपासणीसाठी दिलेले अभिलेख योग्य प्रकारे ठेवलेले आहे. तथापि आम्ही सर्व अभिलेखांची तपासणी पाहाणी केलेली नाही. | वस्तुस्थिति |
| ९. | अ) आमच्या मते व माहितीनुसार ही कंपनी सर्वसाधारणत: नियमितपणे त्या-त्या अधिकारी संस्थेकडे संविधिक (स्टॅच्युटरी) देणी वेळीच भरणा करते ज्या देण्याबद्दल विवाद असेल ती सर्व भविष्य निर्वाह निधीत गुंतवून आणि सुरक्षा निधी, कर्मचारी राज्य विमा योजना वर्गणी आयकर, निधीकर, संपत्तिकर, सेवाकर, आयात शुल्क, निर्मिती शुल्क अशी सर्व सांविधिक देणी कधी बाकी ठेवलेली नाहीत. आमच्या माहितीनुसार आयकर, संपत्तिकर, आयात शुल्क, निर्मिती शुल्क यापैकी कुठलेही देणे सहा महिन्याहून अधिक काळ देण्याचे बाकी राहिलेले नाही. | वस्तुस्थिति |
| | ब) कंपनीकडील नोंदी अभिलेखानुसार: आयकर/विक्रीकर/सेवाकर/ आयात शुल्क सांपत्तिक/ यावर्षी कुठल्याही प्रकारच्या (विवादामुळे) भरणा झालाच नाही असे काही आम्हांला आढळले नाही.<br><br>देणे प्रकार — न भरलेली रक्कम रू. लक्ष — विवाद स्वरुप<br>उत्पादन शुल्क — १८६.६६ — केंद्रीय उत्पादन शुल्क आयोग<br>व्यवसाय कर — ११.५४ — केंद्रीय सहाय्यक आयुक्त (अपील) | वस्तुस्थिति |
| १०. | या आर्थिक वर्ष अखेरीस कंपनीला कुठलेही साचलेले/साचत गेलेले तोटे नाहीत. हिशेब दफ्तर/पुस्तके यांचे तपासणी वरून असे स्पष्ट होते की कंपनीने कसलाही रोख तोटा सोसलेला नाही तसेच या आधिच्या लगतच्या आर्थिक वर्षातही असा तोटा झालेला नाही. | वस्तुस्थिति |



Mahajenco Marathi notice.indd 41 5/29/2009 7:07:27 PM

| क्रम | लेखा परिक्षकांचा परिच्छेद | महानिर्मिती कंपनीचा खुलासा |
|---|---|---|
| ११. | आमच्या हिशेब तपासणी प्रक्रियेवर आधारित आणि आम्हांला दिलेल्या माहितीनुसार या सर्वांवरून असे स्पष्ट होते की कंपनीने कुणाचेही देणे बुडवलेले नाही. बँक, अर्थ-संस्था वगैरे या पैकी कुणाचेही देणे बाकी नाही. कर्जरोखे धारकाचा सुध्दा व्याज इत्यादी वेळच्या वेळी पोच होत असते. | वस्तुस्थिति |
| १२. | आमच्या माहितीनुसार/मिळालेल्या खुलाशाप्रमाणे कंपनीने कुणालाही समभाग (शेअर्स) वगैरे सारख्या तारणावर कर्ज वगैरे दिलेले नाही किंवा अग्रीम रक्कमही कुणाकडून (अशा तारणावर) घेतलेली नाही. | वस्तुस्थिति |
| १३. | आमच्या माहितीनुसार/मिळालेल्या खुलाशानुसार हे स्पष्ट होते की कंपनी कुठलाही चीटफंड निधी परस्पर फायदा संघटन इत्यादी काहीही चालवत नाही म्हणून आमच्या मते कंपनी कायदा १९५६ मधील उपवाक्य (८) परिच्छेद ४ यावरील आज्ञा तरतुदी कंपनीला लागू होत नाहीत. | वस्तुस्थिति |
| १४. | कंपनीकडील नोंदी/अभिलेख तसेच आम्हांला मिळालेली माहिती यावरून हे स्पष्ट होते की कंपनी समभाग (शेअर्स) वगैरेचा व्यवहार करीत नाही कर्जरोखे इत्यादी व्यवहार करीत नाही तसेच इतर कुठल्याही प्रकारच्या गुंतवणूक प्रकाराचा व्यापार करीत नाही. यास्तव कलम (५) च्या तरतुदी मधील परिच्छेद ४ ची उपवाक्य '(क्लॉज) ८ वर दिलेल्या हुकुमातील तरतुदी कंपनीला लागू नाहीत. | वस्तुस्थिति |
| १५. | आमच्या माहितीनुसार/मिळालेल्या खुलाशानुसार कंपनीने इतर कुठल्याही संस्था अथवा व्यक्ती यांस त्यांनी घेतलेल्या कर्जासाठी जामीन/हमी वगैरे दिलेली नाही. | वस्तुस्थिति |
| १६. | आमच्या अभिलेख तपासणी वरून/मिळालेल्या माहिती नुसार कंपनीने मुदतीची जी कर्जे घेतली होती ती ज्या कार्यास्तव घेतली त्यावरच त्याचा वापर/खर्च झालेला आहे. | वस्तुस्थिति |
| १७. | आमची तपासणी/मिळालेली माहिती या नुसार आम्हांला असे आढळले की खात्री लायकपणे म्हणता येते की कुठलीही अल्प मुदतीची कर्जे दीर्घ मुदतीच्या कामात कंपनीने वापरली नाहीत. | वस्तुस्थिति |
| १८. | या आर्थिक वर्षात कंपनीने कुठल्याही नव्या भांडवलाची उभारणी केलेली नाही. या कारणे पसंतीचे अधिभाग समभाग वाटणीचा प्रश्न उद्भवत नाही या अधिमान्य कंपन्याचा नोंद कायदा कलम ३०१ प्रमाणे रजिस्टरमध्ये आहे. | वस्तुस्थिति |

| क्रम | लेखा परिक्षकांचा परिच्छेद | महानिर्मिती कंपनीचा खुलासा |
|---|---|---|
| १९. | पूर्वकालीन म.रा.वि.मं. कंपनीला कर्जरोख्यावर संरक्षण दिलेले आहे. हेच कर्ज रोखे नंतर या महानिर्मिती कंपनीकडे दिलेले आहेत (जून २००५ रोजी). हे सर्व बदल योजनेअंतर्गत झालेले आहे. तथापि हा बदल कंपनी निबंधक (रजिस्टार ऑफ कंपनीकडे) नोंदण्यात आलेला नाही. | वस्तुस्थिति |
| २०. | कंपनीने समभाग काढून जनतेकडून पैसे (भांडवल) उभारलेले नाही. या आर्थिक वर्षकाळाच्या हिशेब तपासणीत यासाठी कलम (२०) परिच्छेद ४ वर उल्लेख केलेल्या कायद्याची तरतूद या कंपनीला लागू होत नाही. | वस्तुस्थिति |
| २१. | आम्हा हिशेब तपासणीसाना (ऑडिटर्सना) कंपनीने कुठल्याही प्रकारच्या अफरातफरीची माहिती दिलेली नाही. आमच्याही ध्यानात असे काही आलेले नाही. कुठेही असा प्रकार आढळला नाही कंपनीची हिशेब पुस्तके तपासताना जी आम्ही सर्वसाधारण/सर्वमान्य प्रक्रीया आहे त्यानुसारच केली आहे. आमच्या ध्यानात असा कुठलाही खोटा व्यवहार/अफरातफर आली नाही. ही खात्री आम्ही या आर्थिक वर्षकाळाविषयी देत आहोत. | २००७-२००८ या वर्ष काळात अफरातफरीची घटना घडली/आढळली नाही किंवा तशा घटनेची कुणी तक्रार वगैरे केलेली नाही. |



Mahajenco Marathi notice.indd 43 5/29/2009 7:07:28 PM

# आर्थिक ताळेबंद ३१ मार्च २००८ कालावधीचा

| | अनुसूची क्रमांक | ३१ मार्च २००८ रु. | ३१ मार्च २००७ रु. |
|---|---|---|---|
| **अ. निधी स्त्रोत** | | | |
| (१) भागधारकांचा निधी | | | |
| अ) भाग भांडवल | १ | ५००,००० | ५००,००० |
| ब) भाग भांडवल निलंबित हिशेब (नोंद नं. ५ (i)). | | २५,६३३,६३३,५३७ | २५,६३३,६३३,५३७ |
| क) भाग भांडवल निधी/वाटणी प्रलंबित | | ५,५००,०००,००० | ४,०००,०००,००० |
| ड) राखीव आणि अतिरिक्त | २ | ३,७५२,४१५,३९५ | ३,५८९,५९९,७८८ |
| (२) कर्ज निधी | | | |
| अ) सुरक्षित कर्जे | ३ | ५०,२८१,४९३,७१५ | ३१,३४०,९०८,७७५ |
| ब) सुरक्षित न केलेली कर्जे | ४ | २,५३०,५०१,९९२ | २,८४४,०००,००४ |
| (३) प्रलंबित कर दायित्व | | ४,०७३,८४२,४९७ | – |
| **एकूण** | | **९१,७७२,३८७,१३६** | **६७,४०८,६४२,१०४** |
| **ब. निधी वापर विवरण** | | | |
| (१) स्थावर मालमत्ता | | | |
| अ) एकूण एक गठ्ठा | ५ | ११४,७८३,८३४,६४४ | १००,००८,५७९,०७४ |
| ब) वजा: घसारा | | ६८,८२३,६५७,५१० | ६६,७२५,६८९,४८९ |
| क) उपयुक्त गठ्ठा निधी | | ४५,९६०,१७७,१३४ | ३३,२८२,८८९,५८५ |
| ड) कर्जे-अग्रीम रकमा | | ३६,९०८,६२९,४१४ | २९,५८९,९३८,३२९ |
| (२) गुंतवणूक | ६ | १,८००,१०० | ३००,१०० |
| **क. चालू संपदा, कर्ज व अग्रीम रकमा** | ७ | | |
| अ) माल सामान यादी/याद्या | | ७,४०६,७७२,४२४ | ७,७०३,७८०,५१४ |
| ब) किरकोळ येणी/देणेदार | | १७,७४६,०७४,७३९ | १६,११८,२६६,७१३ |
| क) रोकड व बँक शिल्लक | | १३३,१४२,१९३ | ४६१,४३१,८६४ |
| ड) कर्जे-अग्रीम रकमा | | ४८,९८४,६६३,२५९ | ३३,३२६,६५९,४३३ |
| (A) | | ७४,२७०,६५२,६१५ | ५७,६१०,१३८,५२४ |
| वजा: चालू देणी/दायित्वे व त्यासंबंधी योजना | | | |
| अ) चालू देय के दायित्व | ८ | ६०,०८१,३२४,६०९ | ४९,५११,०८५,९३६ |
| ब) निधी आगाऊ तरतूद | ९ | ५,२८७,५४७,५१८ | ३,५६३,५३८,४९८ |
| (B) | | ६५,३६८,८७२,१२७ | ५३,०७४,६२४,४३४ |
| निव्वळ चालू संपदा अ - ब | | ८,९०१,७८०,४८८ | ४,५३५,५१४,०९० |
| **एकूण** | | **९१,७७२,३८७,१३६** | **६७,४०८,६४२,१०४** |
| **हिशेबावरील टीप** | १५ | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार
**मेसर्स फोर्ड, ऱ्होडस्, पार्कस् आणि कंपनी करिता**
सनदी लेखापरीक्षक

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**एस्. बी. प्रभू**
**मेसर्स पी. जी. जोशी आणि कं. करिता**
सनदी लेखापरीक्षक

**जी.जे.गिरासे**
संचालक (वित्त)

**अजय मेहता**
व्यवस्थापकीय संचालक

**पी. अब्राहम**
अध्यक्ष

**सुधीर पी. तिडके**
**मेसर्स पी. जी. भागवत करिता**
**संजय आठवले**
भागीदार

**राहुल दुबे**
कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३० सप्टेंबर २००८

# नफा-तोटा विवरण ३१ मार्च २००८ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी

| | अनुसूची क्रमांक | ३१ मार्च २००८ रु. | ३१ मार्च २००७ रु. |
|---|---|---|---|
| **मिळकत :** | | | |
| वीज विक्रीतून मिळालेला निधी | | ८०,८३१,७५६,७२७ | ७३,४५२,९१२,९३६ |
| वजा: वीजेवरील कर (ड्यूटी) | | १२,०३४,७८८ | ३,३३६,४४५ |
| | | ८०,८१९,७२१,९३९ | ७३,४४९,५७६,४९१ |
| इतर उत्पन्न | १० | १,६६७,७४३,७५७ | ९५६,७५२,९५१ |
| | | **८२,४८७,४६५,६९६** | **७४,४०६,३२९,४४२** |
| **खर्च** | | | |
| इंधनाची किंमत | | ५९,९८१,०३१,६४८ | ५४,४४३,४३३,०७५ |
| निर्मिती, प्रशासन व इतर खर्च | ११ | ८,४९२,८०४,४४८ | ६,७९२,९४६,७७५ |
| कर्मचारी मूल्य (कॉस्ट) | १२ | ४,७४८,६९१,३१६ | ३,८६०,६३१,१४२ |
| घसारा/हस्तांतरण | | २,०६५,४८४,६३९ | ३,४८८,३००,८२१ |
| व्याज/निधी खर्च | १३ | १,२०६,००७,०४६ | १,९६२,६०९,३११ |
| | | **७६,४९४,०१९,०९७** | **७०,५४७,९२१,१२४** |
| **कर भरण्या आधी नफा** | | **५,९९३,४४६,५९९** | **३,८५८,४०८,३१८** |
| वजा: **कर भरणा तरतूद** | | | |
| चालू कर भरण्यासाठी | | ५४९,०००,००० | १,१९१,७४१,६५६ |
| राहिलेला कर भरण्यासाठी | | १,६५७,६६६,४३१ | – |
| व काठावरील फायद्यावर कर | | १३,०००,००० | १३,५६९,८०५ |
| **निव्वळ नफा कर भरणी नंतर** | | **३,७७३,७८०,१६८** | **२,६५३,०९६,८५७** |
| आधिच्या वर्षकाळासाठी केलेली तरतूद | | ४२९,१२६,१८१ | – |
| गतकालीन श्रेय/मोल (निव्वळ) | १४ | (१,२०२,६०३,२७६) | (३१७,८८०,५२१) |
| **या वर्षातील नफा** | | **३,०००,३०३,०७३** | **२,३३५,२१६,३३६** |
| अधिक: गत वर्षाची पुढे घेतलेली रक्कम | | ३,४६४,५८८,३८८ | १,१२९,३७२,०५२ |
| वजा: कर दायित्व (लांबणीवर टाकलेल्या करदायित्वासाठी) अनुसूची १५ मधील नोंद नं. २४ग(iii) पाहा | | २,४१६,१७६,०६६ | – |
| वजा: कर्मचारी हितार्थ तात्पुरती सोय (अनुसूची १५ तील नोंद नं. २४ब(ii) | | २९६,३००,००० | – |
| वजा: कर्ज रोख भरणा करण्यासाठी राखून ठेवलेली रक्कम | | १३,१२५,००० | – |
| **शिल्लक जी ताळेबंद तक्त्यावर** | | **३,७३९,२९०,३९५** | **३,४६४,५८८,३८८** |
| **प्रति समभाग उत्पन्न (रु.)** | | | |
| प्रति समभाग मूलभूत उत्पन्न | | ६०,००६ | ४६,७०४ |
| प्रति समभाग कमी झालेले उत्पन्न | | ०.९८ | ०.८३ |
| **हिशेबावरील टीप** | १५ | | |

सोबत जोडलेल्या आमच्या अहवालानुसार

**मेसर्स फोर्ड, ऱ्होडस्, पार्कस् आणि कंपनी करिता**
सनदी लेखापरीक्षक

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित करिता**

**एस्. बी. प्रभू**
**मेसर्स पी. जी. जोशी आणि कं. करिता**
सनदी लेखापरीक्षक

**जी.जे.गिरासे**
संचालक (वित्त)

**अजय मेहता**
व्यवस्थापकीय संचालक

**पी. अब्राहम**
अध्यक्ष

**सुधीर पी. तिडके**
**मेसर्स पी. जी. भागवत करिता**
**संजय आठवले**
भागीदार

**राहुल दुबे**
कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३० सप्टेंबर २००८

# ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| | ३१ मार्च २००८ रु. | ३१ मार्च २००७ रु. |
|---|---|---|
| **अनुसूची १ : भाग भांडवल** | | |
| **अधिकृत:** | | |
| ५,०००,०००,००० समभाग प्रत्येकी रु. १० किंमतीचा | ५०,०००,०००,००० | ५०,०००,०००,००० |
| **प्रचलित, अभिदत्त आणि भरणा झालेले:** | | |
| ५०,००० समभाग प्रत्येकी रु. १० किंमतीचा | ५००,००० | ५००,००० |
| (वरील सर्व समभाग हे नामनिर्देशित संस्थांनी महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने धारण केले असून सर्व विभाजन/बदल योजना झाल्यावर ते एम.एस.ई.बी. होल्डींग कंपनीकडे जातील) | | |
| **एकूण** | ५००,००० | ५००,००० |
| **अनूसूची २ : राखीव आणि अतिरिक्त** | | |
| **१. भांडवली राखीव** | | |
| ग्राहकांकडून वर्गणी/सरकारी अनुदान/भांडवली मालमत्ते बदल्यात गत वर्षाच्या ताळेबंदा प्रमाणे शिल्लक | १२५,०११,४०० | ८,८०० |
| अधिक: या वर्षी त्यात पडलेली भर | – | १२५,००२,६०० |
| | १२५,०११,४०० | १२५,०११,४०० |
| वजा: उत्पन्न म्हणून दाखवलेले | ११,४०० | – |
| वजा: संबंधित स्थावर मिळकतीला बदली केले (नोट ६ असुसूची १५ अनुसार) | १२५,०००,००० | – |
| | – | १२५,०११,४०० |
| **२. कर्ज रोखे भरणा करण्यासाठी राखीव** | | |
| सुरुवातीची शिल्लक | – | – |
| अधिक: या वर्षी त्यात पडलेली भर | १३,१२५,००० | – |
| | १३,१२५,००० | – |
| **३. नफा-तोटा तक्त्यानुसार दाखविलेली शिल्लक** | ३,७३९,२९०,३९५ | ३,४६४,५८८,३८८ |
| **एकूण** | ३,७५२,४१५,३९५ | ३,५८९,५९९,७८८ |

# ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| | ३१ मार्च २००८<br>रु. | ३१ मार्च २००७<br>रु. |
|---|---|---|
| **अनुसूची ३ : सुरक्षित कर्जे** | | |
| **१. कर्ज रोखे** | | |
| १४.१८ टक्के - ७ अपरिवर्तनीय कर्जरोखे प्रत्येकाचे दर्शनी मोल १०,०००,००० (मूळ किंमतीला ३२ सम हफ्त्याना दर तीमाहीला डिसेंबर ३१, २००१ पासून भरणा केले जाणारे) | १३,१२५,००० | २१,८७५,००० |
| **२. मुदत कर्जे** | | |
| बँकांकडून | – | ३,८४६,३७२,३०४ |
| केंद्र सरकारकडून | ५,२२२,०२५,२९८ | ४५३,२१५ |
| पॉवर फायनान्स महामंडळ | ३५,६७३,१८३,७७७ | २७,४७२,२०८,२५६ |
| ग्रामीण विद्युतीकर महामंडळ | २,६६०,६१२,५८५ | – |
| **३. व्यावसायिक भांडवलासाठी कर्जे** | ६,७१२,५४७,०५५ | – |
| **एकूण** | **५०,२८१,४९३,७१५** | **३१,३४०,९०८,७७५** |
| **अनुसूची ४ : असुरक्षित कर्जे** | | ५ |
| राज्यसरकारकडून घेतलेली १ वर्ष मुदतीत रु. ३१६,२५०,१९६ परत करण्याचे बोलीने (गतवर्षी रु. ३१६,०००,०१२) | २,५३०,५०१,९९२ | २,८४४,०००,००४ |
| **एकूण** | **२,५३०,५०१,९९२** | **२,८४४,०००,००४** |

# ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

## अनुसूची ५ : स्थावर मालमत्ता

| मालमत्ता | एकगठ्ठा (एकूण किंमत) | | | | घसारा/अमूर्तीकरण | | | | निव्वळ ऋण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १-४-२००७ रोजी रु | वाढ/समयोजना रु | वजा/समयोजना रु | ३१-३-२००८ पर्यंत रु | ३१-३-२००७ पर्यंत रु | घसारा/अमूर्तीकरण रु | वजा/समयोजना रु | ३१-३-२००८ पर्यंत रु | ३१-३-२००८ पर्यंत रु | ३१-३-२००७ पर्यंत रु |
| **मूर्त मालमत्ता** | | | | | | | | | | |
| जमीन (विकास खर्च धरून) | | | | | | | | | | |
| मुक्त | ५४९,३२२,६६२ | १,५३८,१७८ | – | ५५०,८६०,८४० | – | – | – | – | ५५०,८६०,८४० | ५४९,३२२,६६२ |
| भाडेपट्टीची | ५५,०४६,४६३ | ४१९,८५९,४२६ | – | ४७४,९०५,८८९ | १४,२५४,७२४ | ९५३,०८४ | – | १५,२०७,८०८ | ४५९,६९८,०८१ | ४०,७९१,७३९ |
| इमारत | | | | | | | | | | |
| कारखाना इमारत | ५,११६,०६७,१६३ | ९३९,३७३,०६६ | – | ६,०५५,४४०,२२९ | ३,८४९,५४६,९११ | ९९,६१९,०७९ | २९,०१३ | ३,९४९,१३६,९७७ | २,१०६,३०३,२५२ | १,२६६,५२०,२५२ |
| इतर | २,९७१,७३५,८८७ | १३५,३३३,१४७ | १०९,०९२,९२४ | २,९९७,९७६,११० | ९२७,८५९,२९१ | ४७,०९२,७०५ | (१,३९६,७९४) | ९७६,३४८,७९० | २,०२१,६२७,३२० | २,०४३,८७६,५९६ |
| जलविद्युत संयंत्र | ७,४६१,६२९,७०८ | ९९३,१६५,४०० | १,३०३,१८६ | ८,४५३,४९१,९२२ | ४,३८५,४१२,२६० | ३५३,६४३,६७८ | (२६५,८४८) | ४,७३९,३२१,७८६ | ३,७१४,१७०,१३६ | ३,०७६,२१७,४४८ |
| इतर बांधकामे | | | | | | | | | | |
| रेल्वे सायडींग | २,२९६,०७६,१६३ | ३१४,०९६,०५६ | – | २,६१०,१७२,२१९ | ५१०,१३३,३८० | ४२,१२१,४३१ | – | ५५२,२५४,८११ | २,०५७,९१७,४०८ | १,७८५,९४२,७८३ |
| रस्ते व इतर | ३,२४८,२३८,००० | ३९६,७७४,२८० | २५,५०५,६०१ | ३,६१९,५०६,६७९ | ९६०,३९६,६७० | ८९,२८७,९७२ | (५,८५९,५३१) | १,०५५,५४४,१७३ | २,५६३,९६२,५०६ | २,२८७,८४१,३३० |
| संयंत्र, मशीन व सामान | ७५,६४३,७३६,६११ | ११,७७६,२१७,५२७ | ५१५,६१७,२४४ | ८६,९०४,३३६,८९४ | ५४,७८०,४१३,८४३ | १,३७६,४९०,९१२ | ६,६८६,०२९ | ५६,१५०,२१८,७२६ | ३०,७५४,११८,१६८ | २०,८६३,३२२,७६८ |
| लाईन्स व केबल्स | १,६२२,७८५,९२५ | १६०,९७०,५४३ | – | १,७८३,७५६,४६८ | ९८६,९५३,६९१ | ४३,७६१,५३२ | – | १,०३०,७१५,२२३ | ७५३,०४१,२४५ | ६३५,८३२,२३४ |
| वाहने | १४२,३४३,४५७ | २३,१३३,६३८ | २,०३५,६६५ | १६३,४४१,४३० | ११८,१७८,६४४ | ८,७६२,४१४ | (३१२,२७८) | १२७,२५३,३३६ | ३६,१८८,०९४ | २४,१६४,८१३ |
| फर्निचर व इतर सामान | ११६,६००,२२५ | २५,९००,७५१ | १५,००६,८९७ | १२७,४९४,०७९ | ९७,२४६,०४७ | (६,८९२,००९) | (७,८१८,९०२) | ९८,१७२,९४० | २९,३२१,१३९ | १९,३५४,१७८ |
| कार्यालयीन साहित्य (संगणकासहित) | १५५,२९६,१९३ | २५,९७०,२२८ | – | १८१,२६६,४२१ | ८२,०६६,३१४ | ७,५९०,७८३ | – | ८९,६५७,०९७ | ९१,६०९,३२४ | ७३,२२९,८७९ |
| भांडवली खर्च मालमत्ता मिळविण्यासाठी पण कंपनीची मालकी नसते | ६१९,५४८,९०१ | २१३,६३८,०२८ | – | ८३३,१८६,९२९ | १३,२२७,७१४ | २२,४९२,२६९ | – | ३५,७१९,९८३ | ७९७,४६६,९४६ | ६०६,३२१,१८७ |
| स्थावर मालमत्ता (ज्याची चौकशी चालू आहे) | १६०,८०९ | ६२०,२२२ | ५५५,८५१ | २२५,१८० | – | – | – | – | २२५,१८० | १६०,८०९ |
| अमूर्त मालमत्ता | | | | | | | | | | |
| पाणी, वीज मिळण्याचे हक्क | ९,९८७,९०७ | – | – | ९,९८७,९०७ | – | २,३२६,६१५ | – | २,३२६,६१५ | ७,६६१,२९२ | ९,९८७,९०७ |
| सॉफ्टवेअर परवाना | ३,००० | १७,७८२,४४८ | – | १७,७८५,४४८ | | १,७७९,२४५ | | १,७७९,२४५ | १६,००६,२०३ | ३,००० |
| **एकूण** | १००,००८,५७९,०७४ | १५,४४४,३७२,९३८ | ६६९,११७,३६८ | ११४,७८३,८३४,६४४ | ६६,७२५,६८९,४८९ | २,०८९,०२९,७१० | (८,९३८,३११) | ६८,८२३,६५७,५१० | ४५,९६०,१७७,१३४ | ३३,२८२,८८९,५८५ |
| गतसाल | ९६,४४३,१४४,९९३ | ३,६९६,०५९,९३५ | १८०,७२४,२९५ | ९९,९५८,४८०,६३३ | ६३,१८१,०९२,३७० | ३,४७६,१९१,२३० | ६३,९५५,०३० | ६६,७२१,२३८,६३० | ३३,२३७,२४२,००३ | ३३,२६२,०५२,६२३ |
| समयोजन पुनर्गठन केल्याने | – | – | – | ५०,०९८,४४२ | – | – | – | ४,४५०,८५९ | ४५,६४७,५८३ | - |
| – गेल्या वर्षाचे आकडे (पुनर्गठित) | ९६,४४३,१४४,९९३ | ३,६९६,०५९,९३५ | १८०,७२४,२९५ | १००,००८,५७९,०७४ | ६३,१८१,०९२,३७० | ३,४७६,१९१,२३० | ६३,९५५,०३० | ६६,७२५,६८९,४८९ | ३३,२८२,८८९,५८५ | ३३,२६२,०५२,६२३ |

नोट: कंपनीच्या नावे केलेली मालमत्ता (नव्या बदली योजनेनुसार) ते अद्यापि कंपनीच्या नावे झालेली नाही.

# ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| | ३१ मार्च २००८ रु. | ३१ मार्च २००७ रु. |
|---|---|---|
| **अनुसूची ६ : गुंतवणूक (मूळ किंमत, उद्धृत न केलेली)** | | |
| **व्यापारी गुंतवणूक - दीर्घ मुदतीची** | | |
| समभाग सहाय्यक कंपन्यांचे | | |
| ३०,००० समभाग महागुजरात कॉलिअरीजचे प्रत्येकी रु. १०/- किंमतीचे पूर्ण पैसे भरलेले | ३००,००० | ३००,००० |
| ५०,००० (शून्य) समभाग धोपावे कोस्टल पॉवर म. यांचे प्रत्येकी रु. १०/- किंमतीचे पूर्ण पैसे भरलेले | ५००,००० | – |
| ५०,००० (शून्य) समभाग धुले थर्मल पॉवर कं. म. यांचे प्रत्येकी रु. १०/- किंमतीचे पूर्ण पैसे भरलेले | ५००,००० | – |
| ५०,००० (शून्य) समभाग औरंगाबाद पॉवर कं. म. यांचे प्रत्येकी रु. १०/- किंमतीचे पूर्ण पैसे भरलेले | ५००,००० | – |
| **गैर व्यावसायिक गुंतवणुकी** | | |
| १० समभाग कोल्हापूर जिल्हा सहकारी बँक यांचे प्रत्येकी रु. १०/- किंमतीचे पूर्ण पैसे भरलेले. | १०० | १०० |
| **एकूण** | १,८००,१०० | ३००,१०० |
| **अनुसूची ७ : प्रचलित संपत्ति कर्जे व अग्रीम रकमा** | | |
| **प्रचलित मालमत्ता** | | |
| **अ) वस्तुंची यादी (व्यवस्थापनाने मूल्यांकित करून प्रमाणित केलेली)** | | |
| कोळसा व इंधन | १,९८७,१४७,५७८ | २,६१७,२५९,१९८ |
| भांडार व सुटे भाग | ५,२७५,७३४,९५८ | ४,९४७,८३८,९३६ |
| वाटचाल करणारे सामान | १४३,८८९,८८८ | १३८,६८२,३८० |
| **एकूण** | ७,४०६,७७२,४२४ | ७,७०३,७८०,५१४ |
| **ब) किरकोळ देणेकरी** | | |
| (असुरक्षितपणे सन्माननीय) | | |
| - कर्जे ६ महिन्याहून अधिक काळ येणे असलेली | ३,२८९,५२४ | - |
| - इतर कर्जे | १७,७४२,७८५,२१५ | १६,११८,२६६,७१३ |
| **एकूण** | १७,७४६,०७४,७३९ | १६,११८,२६६,७१३ |
| **क) रोकड व बँक शिल्लक** | | |
| १. हाती असलेली रोकड व स्टॅम्प | १,९४६,४३६ | ३,६३०,९०४ |
| २. हाती आलेले चेक | ५५,७२५ | - |
| ३. शेड्यूल बँकाकडे असलेले करंट खात्यावरील पैसे | १२५,८१७,८७७ | ४०२,७३९,७८० |
| ४. येऊ घातलेली येणी | ५,३२२,१५५ | ५५,०६१,१८० |
| **एकूण** | १३३,१४२,१९३ | ४६१,४३१,८६४ |

## ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| | ३१ मार्च २००८ रु. | ३१ मार्च २००७ रु. |
|---|---|---|
| **कर्जे व अग्रिम रकमा** | | |
| असुरक्षित तथापि चांगल्या समजल्या जाणाऱ्या केवळ तशा ठरवल्यावाचून | | |
| १. अग्रीम रकमा व कर्ज दुय्यम कंपन्यांना | २१,२८८,२०४ | ६४७,७९६ |
| २. वसूल होण्याजोग्या अग्रीम रकमा रोकड किंवा इतर साधनाने आवश्यक मोल मिळण्यासाठी | ४७६,७०२,८४४ | ५७१,७७०,३८९ |
| ३. अग्रीम रकमा ओ एण्ड एम पुरवठ्यासाठी | १,७३३,०९१,६२८ | १,६४३,७३८,८२३ |
| ४. अग्रीम रकमा कोळसा पुरवठ्यासाठी/इंधनासाठी | ४३,७९५,१४६,६१९ | २८,७३५,०७२,८९४ |
| ५. कर्मचारी वर्गाला दिलेल्या अग्रीम रकमा | १६७,७१६,५८७ | १३९,५०८,७१६ |
| ६. ठेवी | १,५८६,७९३,२४६ | १,१३१,४३०,१७६ |
| ७. एक्साईज/कस्टम अधिकाऱ्याकडून येणे | ११,२८०,६५० | १०,३०५,५०० |
| ८. आगाऊ दिलेली खर्चाची रक्कम | १८९,७२९,६४७ | २७७,११९,८५६ |
| ९. येणे शक्य असलेले दावे व इतर चालू मालमत्ता | १,०६५,८२७,३२६ | १,०६८,७७६,२३४ |
| | ४९,०४७,५७६,७५१ | ३३,५७८,३७०,३८४ |
| वजा: संशयित कर्जासाठी तरतूद | | |
| १. कोळसासाठा/इंधनसाठा | ४७,८७३,०७६ | २३७,३५७,२८० |
| २. पुरवठा करणाऱ्यांना अग्रीम रक्कम | ६,००४,६६० | ५,२०६,०१६ |
| ३. मिळणाऱ्या उत्पन्नासाठी | ६,३४०,८८५ | ६,३४०,८८५ |
| ४. अग्रीम रकमा येणे असलेली रोकड किंवा साधन | ७७,२२९ | - |
| ५. किरकोळ येणी | २,२७५,६२२ | २,८०६,७७० |
| ६. ठेवी | ३४२,०२० | - |
| | ६२,९१३,४९२ | २५१,७१०,९५१ |
| | ४८,९८४,६६३,२५९ | ३३,३२६,६५९,४३३ |
| | ७४,२७०,६५२,६१५ | ५७,६१०,१३८,५२४ |

## अनुसूची ८ : चालू देयक/देणी

| | | |
|---|---|---|
| (१) किरकोळ घेणेकरी | | |
| भांडवली खर्चाकरता | | |
| सूक्ष्म, लहान, मध्यम दर्जाचा (अनुसूची १५ मधील नोंद नं. १८ पाहा) | – | – |
| इतर देयके | १,८८१,८३०,७७९ | ९९४,४२०,२९० |
| माल पुरवठा व सेवा यासाठी | | |
| सूक्ष्म, लहान, मध्यम व्यावसायिक (अनुसूची १५ मधील नोंद नं. १८ पाहा) | – | – |
| इतर देणी | ४६,९१२,५६१,५४० | ३३,५१०,२४८,९५६ |
| (२) ठेवी व मागे ठेवलेली देयक कंत्राटदार, उपभोक्ते व इतर | ३,३०५,३४१,६८९ | १,१८६,४५७,४०७ |
| (३) इतर देणी | ७,२४१,५३१,१४० | १३,२९५,५३५,२०० |
| (४) झालेले व्याज पण देय झालेले नाही असे | ७४०,०५९,४६१ | ५२४,४२४,०८३ |
| **एकूण** | ६०,०८१,३२४,६०९ | ४९,५११,०८५,९३६ |

## अनुसूची ९ : तरतूद

| | | |
|---|---|---|
| सेवकांचे उपदान (ग्रॅच्युटी) | २,८४८,४३१,६९६ | २,६६६,८००,००० |
| रजेचा पगार / रजा न उपभोगल्या बद्दल | १,९२६,०७१,३४२ | – |
| आयकर भरणा करण्यासाठी तरतूद | १,७४०,७४१,६५६ | १,७६४,७६९,४३८ |
| वजा: अग्रीम कर जमा (टीडीएस धरून) | १,२२९,२९५,४६८ | ८६८,०३०,९४० |
| | ५११,४४६,१८८ | ८९६,७३८,४९८ |
| किरकोळ लाभावरील कर | २६,५६९,८०५ | १३,५६९,८०५ |
| वजा: अग्रीम जमा केलेला कर | २४,९७१,५१३ | १३,५६९,८०५ |
| | १,५९८,२९२ | – |
| **एकूण** | ५,२८७,५४७,५१८ | ३,५६३,५३८,४९८ |

# नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| | ३१ मार्च २००८ रु. | ३१ मार्च २००७ रु. |
|---|---|---|
| **अनुसूची १० : इतर उत्पन्न** | | |
| व्याज उत्पन्न [मूळ देयकातून कापलेला आयकर रु.१९,६१,१९५ (गतसाल रु.३४,४१,५८७)] | २२,७३८,५९० | १९,४८३,३३२ |
| भाडे व भाड्याने दिलेल्या मशीनरी वरील उत्पन्न | ३०,१४८,३७८ | ३२,३१२,१३९ |
| भंगार विक्रीतून मिळालेला फायदा | २३४,८३४,७४२ | ३४२,१३५,७७४ |
| स्थावर मालमत्ता विक्रीतून मिळालेला फायदा | ७,९५८ | – |
| निविदा नमुने (फॉर्म) विक्री | १६,९७०,६०९ | १३,१८३,९२५ |
| इतर उत्पन्न | ४८६,६१२,६५९ | ५४९,६३७,७८१ |
| अतिरिक्त तरतूद पुन्हा जमा | ८७६,४३०,८२१ | – |
| | **१,६६७,७४३,७५७** | **९५६,७५२,९५१** |
| **अनुसूची ११ : निर्मिती, प्रशासन व इतर खर्च** | | |
| वंगण, इतर वापर झालेले साहित्य, स्थानिक पुरवठा | ३०१,७८७,५७७ | २८३,४६२,०११ |
| पाणी पट्टी | ८२४,४८३,११२ | ८२४,६४४,०९१ |
| भाडे | ११७,५६२,१४७ | १०७,७४०,८३६ |
| लीज (भाडेपट्टी) भाडे | ९१८,४१५,३६४ | ९१५,६४४,९५१ |
| **दुरुस्ती देखभाल** | | |
| प्लॅन्ट व मशीनरी | ४,४९३,१८७,१०७ | ४,२२४,४०२,४१४ |
| इमारत | ७३,२५८,९०५ | ३४,२०९,०५२ |
| इतर | ३०५,०८३,७२६ | ३३३,८५०,३०९ |
| विमा | ४२,३३६,०६८ | ४२,७७७,८४९ |
| कर | ३५,७५९,१६३ | ६३,६२७,४९१ |
| कायदा व इतर व्यावसायिक देणी | ३७,४१९,२०५ | ८,६७६,६९१ |
| हिशेब तपासनीसांची देणी | १,३५३,४०० | १,१२२,४०० |
| दलालाचे अडति | ८०,५५६,१०२ | ७२,२०७,९१७ |
| इतर प्रशासकीय हिशेब | ९९५,१६०,४४१ | ३३४,९९१,८०५ |
| | ८,२२६,३६२,३१७ | ७,२४७,३५७,८१७ |
| वजा: देखभाल दुरुस्ती खर्च भांडवलीकरण (एकूण) | २१,९८०,८६५ | ४,७४३,७५४ |
| प्रशासकीय खर्च व एच.ओ.एस. भांडवलीकरण (अनुसूची १५ मधील टीप २२(ii) अ व ब पाहा) | (२८८,४२२,९९६) | ४४९,६६७,२८८ |
| | **८,४९२,८०४,४४८** | **६,७९२,९४६,७७५** |
| **अनुसूची १२ : कर्मचारी खर्च** | | |
| पगार, भत्ते, बोनस इत्यादि | ३,५६७,४००,८१६ | ३,३५७,२९७,४०५ |
| कर्मचारी कल्याण निधी | ५८,७०१,०८५ | ५४,८२५,२०४ |
| इतर कर्मचारी खर्च | ४१,८०५,२२८ | ३९,३६४,४३१ |
| रजेचा पगार (रजा न घेतल्याचा) | ३६९,५१२,२१० | १९२,३११,६६३ |
| अनुदान | ४५१,३३३,६४४ | ३५६,२२०,६९३ |
| भविष्य निर्वाह निधी अंशदान | ३७३,२१९,००९ | ३४२,८२७,३१५ |
| नियोजित मालमत्ता खर्चातील तुटीसाठी केलेली तरतूद | १६,०००,००० | - |
| | ४,८७७,९७१,९९२ | ४,३४२,८४६,७११ |
| वजा: कर्मचारी खर्च भांडवली कर (एकूण) [अनुसूची १५ मधील टीप २२(ii) पाहा] | १२९,२८०,६७६ | ४८२,२१५,५६९ |
| | **४,७४८,६९१,३१६** | **३,८६०,६३१,१४२** |

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| | ३१ मार्च २००८ रु. | ३१ मार्च २००७ रु. |
|---|---|---|
| **अनुसूची १३ : व्याज व इतर आर्थिक भार** | | |
| **व्याज** | | |
| राज्य सरकारी कर्जे | ३१०,४०४,१६७ | ३४६,७४४,१६८ |
| कर्जरोखे | २,६४०,४१७ | ४,११९,१२१ |
| इतर कर्जे/स्थगित उधारी | ३,२३२,०९८,२९२ | २,०८३,०९५,३५३ |
| खेळत्या भांडवलासाठी उसनवारी | ६२६,२६४,६३२ | २,४४२,४८७ |
| गिऱ्हाईकांच्या ठेवी | २२,८१४ | १६,८८६ |
| **आर्थिक प्रभार** | | |
| सरकारी हमीसाठी फी/प्रभार | २६२,३९०,७९९ | २५०,८७७,६४६ |
| पैसे उभे करण्यासाठी मोजलेली किंमत | १२,१२६,९७३ | ५,८३५,६०४ |
| इतर प्रभार | १३,०९१,६९२ | ३२,७६८,०४६ |
| | ४,४५९,०३९,७८६ | २,७२५,८९९,३११ |
| वजा: व्याज व आर्थिक प्रभार भांडवलीकरण केलेला (निव्वळ) [नोट २२(ii)सी अनुसूची १५ पाहा] | ३,२५३,०३२,७४० | ७६३,२९०,००० |
| | १,२०६,००७,०४६ | १,९६२,६०९,३११ |

| | ३१ मार्च २००८ रु. | ३१ मार्च २००७ रु. |
|---|---|---|
| **अनुसूची १४ : पूर्वकालीन उधार/प्रभार निव्वळ** | | |
| **उत्पन्न** | | |
| इतर उत्पन्न | ६४,२०५,१८७ | १२२,६७७,१४७ |
| गतकालीन बिलांसाठी समयोजन (गेल्या वर्षासंबंधी) | १,३३७,३४२,२४८ | – |
| इतर अतिरिक्त तरतुदी गतकालीन | ४३,७५३,५३८ | ४५,७४९,३११ |
| | १,४४५,३००,९७३ | १६८,४२६,४५८ |
| **खर्च** | | |
| व्याज खर्च | ७२७,८८४ | – |
| इंधनासंबंधी फायदा/तोटा | १,९०८,५८२ | ८,५३५,१७१ |
| गिऱ्हाईकांकडून मिळालेले | – | (३,३६७,०७५) |
| अतिरिक्त/कमी तरतुदी घसाऱ्यासाठी | १९,७५०,६०९ | ५८,६४८,६०४ |
| व्याज व आर्थिक खर्च | ८०९,७३९ | ७,७१८,२६१ |
| व्यावसायिक व्यवहार खर्च | ७१९,२०४,३७४ | १४८,१६८,०५९ |
| कर्मचारी खर्च (पगार ठरवणवर दिलेली बाकी) | ३२,९५५,५९१ | १०८,६६७,१३६ |
| रजेचा पगार रोखीने | १,७३५,०९२,०८५ | – |
| प्रशासकीय खर्च | ८,०४५,५९९ | ८९,३२५,११२ |
| सामानासंबंधी खर्च | १२९,४०९,७८६ | ६८,६११,७११ |
| | २,६४७,९०४,२४९ | ४८६,३०६,९७९ |
| **एकूण** | (१,२०२,६०३,२७६) | (३१७,८८०,५२१) |

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

## अनुसूची १५ : हिशेब तक्त्यावरील टीपा

१. **विशेष हिशेब धोरण ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षातील व्यवहारासाठी**

**अ) आर्थिक तक्ते तयार करण्यासाठी आधारभूत तक्ते**

ही कंपनी पब्लिक लिमिटेड कंपनी असून कंपनी कायदा १९५६ चे तरतुदीनुसार रजिस्टर (नोंदणी) झालेली आहे. कंपनी विज कायदा २००३ सालच्या तरतुदीनुसार कार्यान्वित आहे. विज कायदा २००३ च्या तरतूद या त्यातील नियमांसह या कंपनीच्या कार्यवाहीला लागू आहेत व हे नियम जिथे कंपनी कायदा १९५६ तरतूदी विरोधात आहेत, विषेशत: विज कायदाचे खंड १७४ तिथे त्या विज कायदयानुसारच कार्यवाही होते.

चालू व्यवसाय याच संकल्पनेनुसार हिशेब तक्ते तयार केले आहेत शिवाय ऐतिहासिक मूल्य विभागणी संकल्पनाही यात लागू आहे. ''कंपनीने मिळकत-धोरण आधार'' मूलभूत धरून हिशेब तयार केले आहेत व सर्व मालमत्ता हिशेब हा (GAAP) सर्वसाधारण स्वीकृत हिशेब तक्ते (जनरली ॲक्सेप्टेड अकाउन्टींग प्रिन्सीपल) यानुसार तयार केलेला आहे. नियम २००६ अधिसुचना नं. जी.एस.आर. ७३९(३) दिनांक ७-१२-२००६.

संपत्ती (मालमत्ता) व देयक जबाबदाऱ्या जी विज कायद्यानुसार निर्मिलेली आहेत ती विशिष्ट सुयोग्य शीर्षकाखाली दाखवलेली आहेत.

**ब) अंदाज पत्रकांचा वापर**

सर्व साधारणत: स्वीकृत असा हिशेब मांडणी तत्वानुसार त्यातील अंदाजपत्रके (खर्चासाठी) आणि अपेक्षा (ॲजम्पशन) मिळकतीसाठी त्या हिशेबाच्या पुष्टयर्थ असावी लागतात. यातील प्रत्यक्ष खर्च व अंदाज पत्रक तसेच अपेक्षित उत्पन्न व लाभलेली रक्कम यात एकूण वर्षभराचे हिशेबात जे फरक दिसतील ते त्या-त्या वर्षातील जिथे निश्चित निर्णय परिणाम माहित झाले आहेत त्यात मान्य होतात.

**क) स्थावर मालमत्ता**

(i) कंपनीच्या हिशेब रजिस्टरमध्ये स्थावर मालमत्तेची नोंद आहे/असते व प्रत्येक ताळेबंद पत्रकात तिचा उल्लेख असतो. फक्त त्याचे मोल हे ऐतिहासिक धरलेले असते. स्थावर मालमत्ता मिळवताना/खरेदी करताना/उभारणी करताना आलेल्या खर्चाचे आधारावर या स्थावराचे मोल उल्लेख केलेले असते त्यातून कालमानानुसार येणारा घसारा वजा होत असतो.

(ii) स्थावर मालमत्ता खरेदी करताना दिलेली किंमत, वाहतुक खर्च, जकात खर्च, कर इत्यादि सहित दाखवलेली असते (काही कर सरकारकडून नंतरच्या काळात वसूल होतात या किंमतीत ते समाविष्ट नाहीत तथापि यात पैसे उभारण्यासाठी भरलेले व्याज, कर व इतर प्रासंगिक खर्च जो अशी मालमत्ता उपयोगी व्हावी म्हणून केलेला असतो तो सर्व किंमतीत समाविष्ट असतो.)

(iii) नविन प्रकल्पासाठी संपादन केलेले जमीन जुमले व जुने प्रकल्प वाढविण्यासाठी खर्च केलेली रक्कम व त्या रकमावरील प्रकल्प सुरू होईपर्यंतच्या काळाचे व्याज हे सर्व भांडवली खर्च म्हणून गणले जाते.

(iv) कंपनीने केलेला भांडवली खर्च/नव्या प्रकल्पांसाठी/प्रकल्प विस्तारासाठी/त्या संबंधीचा खर्च व त्यावरील व्याज (प्रकल्प सुरू होईपर्यंतच्या तारखेचे) यातील स्थावर मालमत्तेची मालकी कंपनीकडे (अद्यापि)

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

आलेली नसते. ताळेबंद हिशेब पत्रकात हा खर्च वेगळा ''चालू भांडवली कार्य खर्च'' म्हणून दाखवलेला असतो. त्यानंतर हे सर्व स्थावर मालमत्ता संपत्ती म्हणून दाखवली जाते.

(v) जिथे भांडवली खर्च प्रकल्प काम अपुरे/चालू असताना ठेवीच्या रूपात केलेला असतो, त्याची जेव्हा कत्रांटदार इत्यादिंच्या देयकांची अंतिम तडजोड ठरून रक्कम अदा केली जाते, अशा वेळी ठेवीवरचा खर्च तात्पुरता भांडवली खर्चात दाखवून नंतर हिशेब पूर्तता काळी त्या वर्षीच्या हिशेब तक्त्यात या रकमा सारख्या केल्या जातात, (ॲडजस्ट होतात) तसे करणे गरजेचे आहे/असते.

(vi) भांडवली खर्चाचे बाबतीत दीर्घकालीन काळात होणारे किंमती मधील फरक हे कंपनीने ते स्वीकृत केल्यानंतर हिशेबात धरले जातात.

(vii) या कालखंडातील कंपनीने केलेला एकूण प्रकल्प व योजनांवरील खर्च ते त्या त्या ठराविक भांडवली खर्चाचा भाग (भांडवलीखर्च: ''कार्यप्रगती चालू'' या कलमाखाली झालेल्या खर्चाचे रकमांनुसार दाखवला जातो.)

(viii) प्रकल्पाचे चाचणी दरम्यान येणारा खर्च अथवा होणारे उत्पन्न हे भांडवल खर्च/उत्पन्न म्हणूनच दाखवावे लागते.

(ix) कुठल्याही प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी केलेली पाहणी-ओळख शक्यता इत्यादि साठी होणारा खर्च हा वेगळा 'मंजूर खर्च' म्हणून दाखवावा लागतो व तोही 'कार्य-सुरु पण-अपुरे' या शीर्षकाखाली येतो.

(x) हिशेब पुस्तकात स्थावर मालमत्तेचे मोल ''एकूण'' म्हणून कुठल्याही सरकारी अनुदान जे या मालमत्तेसाठी मिळाले असेल, ते तसे दाखवले जाते.

(xi) रु. ५,०००/- पेक्षा कमी मोल असलेली स्थावर मालमत्ता 'नफा-नुकसान तक्त्यात' नुकसान दाखविलेली असते.

(xii) अमूर्त स्थावर मिळकत ही तिच्या मूळ खर्च/किंमत यानुसार भांडवलीकरण केली जाते जर अशा स्थावर मिळकतीपासून पुढे होणारे फायदे/लाभ कंपनीला मिळाले तर त्या अमूर्त स्थावराची सुयोग्य किंमत ठरवली जाते.

**ड) कर्ज/उसनवारी यांचे मोल**

ज्या स्थावर मालमत्तेसाठी अशी उसनवारी केली असेल त्यावर जर हे मोल चढवता येत असेल तर ते भांडवलीकरण करून दाखवता येते (त्या स्थावराची किंमत म्हणून). अशा प्रकारची मालमत्ता पूर्णत: उपयोगी म्हणून वापरात येण्याला दीर्घ काळ लागतो. इतर उसनवारीचा खर्च तो या भांडवल खर्च म्हणून दाखवलेल्या मालमत्तेवर दाखवता येत नाही. तो त्या-त्या काळातील निव्वळ खर्च म्हणून दाखवायचा असतो.

**ई) बिघाड झालेली मालमत्ता**

ताळेबंद तयार करण्याचे दिवशी कंपनी सर्व मालमत्तेचा आढावा घेते. तसेच या मालमत्तेचे गट तयार होतात यात रोख लाभ देणारी मालमत्ता (कॅश जनरेटिंग युनिट्स) यांचा वेगळा गट असतो. जर अशा मालमत्तेत बिघाड झाला किंवा बिघाड होण्याची शक्यता दिसली तर या बिघाडांसाठी वेगळी तरतूद केली जाते. इथे ही मालमत्ता बाळगणे अथवा दुरूस्त करणे या संबंधीचा खर्च हा जर त्यापासून पुढे मिळणाऱ्या रोखीपेक्षा अधिक भरत असेल तर त्यासाठी वेगळी तरतूद करायची असते.

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

**फ) यंत्रे व सुटे भाग-पुर्जे**

(i) मशीन कारखाना इत्यादिंचे खरेदी सह मिळवलेले सुटे भाग-पुर्जे, ज्यांचा वापर अनियमित असण्याची शक्यता आहे आणि या पुर्जाची किंमत माहित असेल तर त्यांचा खर्च वेगळा भांडवली खर्च म्हणून दाखवायचा असतो. तथापि त्यांचे मोल/किंमत माहित नसेल तर मात्र ते त्या मूळ कारखान्याच्या किंमतीसह भांडवली खर्च म्हणून दाखवायचे असतात.

(ii) नंतरच्या काळात विकत घेतलेल्या पुर्जांचा खर्च सुद्धा भांडवली खर्च म्हणूनच दाखवायचा असतो.

(iii) मशीनरीचे सुटे भाग, पुर्जे यांची घसारा किंमत त्या मशीनच्या अपेक्षित उपयोगित्वाच्या काळानुसार दाखवायची असते.

(iv) मशीनरीचे सुटे भाग/पुर्जे यांची किंमत ही महसूली खर्च म्हणून ज्या काळात हे पुर्जे/सुटे भाग खरेदी केले त्या वर्षीच्या हिशेबात दाखवायची असते.

(v) इतर सर्व सुटे भाग हे भांडाराचा हिस्सा व सुटे भाग म्हणूनच दाखवायचे असतात. त्यांची मूळ किंमत अथवा विक्री केल्यास मिळू शकेल अशी किंमत यातील जी कमी असेल ती दाखवायची असते.

**(ग) घसारा/कर्जफेडीची तरतूद**

(i) **स्थावर मालमत्ता**

सरळ रेषा या पद्धतीत कंपनीने त्यांच्या स्थावर मालमत्तेवरील घसारा ९० टक्क्यांपर्यंन्त दाखवला आहे. यासाठी त्यांना केंद्रीय विज नियामक आयोग (CERC) यांनी जानेवारी २००६ मध्ये जी प्रशुल्क पद्धत जारी केली त्यानुसार लावलेली आहे.

वाढवलेल्या किंवा कमी केलेल्या मालमत्तेचे घसारा मोल यथाप्रमाण पद्धतीने (प्रोऱ्राटा बेसीस) मालमत्ता उपयोगी ठरेपर्यंतच्या काळाचे केले आहे.

जिथे मालमत्तेचे आयुष्य-उपयोगिता वाढविण्यात आली (त्यासाठी नूतनीकरण दुरुस्ती, आधुनिकीकरण वगैरे करून) त्यावर झालेला खर्च व त्याच्या कर्जफेडीची, तरतुदीवर न करता घसारा रक्कम त्या मालमत्तेच्या वाढीव उपयोगी आयुष्य तंत्रज्ञांच्या मते जे ठरेल. त्या मुदतीवर लावायचे असते.

भाडेपट्टीने (लीजवर) घेतलेल्या जमीनीची कर्जफेड तरतूद लीज मुदतीनुसार करायची असते.

(ii) **अमूर्त मालमत्ता**

अमूर्त अशा मालमत्तेची कर्ज परतफेड ही त्या मालमत्तेच्या उपयोगी आयुष्यावर ठरवावी लागते. तथापि संगणकासाठी केव्हाही १० वर्षांपेक्षा हा काळ अधिक असू शकत नाही. इतर अमूर्त मालमत्ता ही कर्जफेड काळ त्यांच्या उपयोगी आयुष्याचे अंदाजानुसार ठरवायचा असतो.

(iii) **विविध मालमत्ता प्रकारांचे घसारा दर खाली दिले आहेत:**

| | |
|---|---|
| जल-विद्युत शक्ती कामे | १.८० टक्के ते ३.६० टक्के |
| इमारती व इतर बांधकाम | १.८० टक्के ते ३.६० टक्के |
| संयंत्र, कारखाने व यंत्रे | २.५७ टक्के ते १८ टक्के |
| प्रेषण वहन लाईन, वीजतार जाळे वगैरे | २.५७ टक्के ते ६.०० टक्के |
| फर्निचर व इतर कार्यालयीन सामान | ६.०० टक्के |
| वाहने | १८.०० टक्के |

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

**(ह) वस्तू सूची**

सामानाचा साठा, भांडार, सुटे भाग हे खालच्या पातळीवरच्या मोलाचे धरायचे असतात. अथवा त्यांची बाजारात विक्री करता नक्की मिळणारी रक्कम त्यांचे मोल ठरवते. वस्तुच्या वजनावर जेव्हा मोल करावे लागते तेव्हा बाजार भाव मोल सरासरी प्रमाणात धरायचे असते.

निरुपयोगी भांडारामुळे होणारा तोटा हा खालच्या पातळीवरील मोलाने मोजतात किंवा विक्री केल्यास येणारी एकूण किंमत ही मोल ठरवायची रीत ती वस्तु विकत घेताना आपण दिलेली किंमत अधिक इतर खर्च जे ती वस्तु जागेवर आणण्यासाठी झाले असतील असे मिळून ठरते.

निरुपयोगी भांडारामुळे होणारा तोटा हा पुनर्तपासणी प्रमाणे ठरतो.

**(ई) महसूल मिळवणी**

वीज पुरवठा विक्री महसूल महाराष्ट्र विज नियामक आयोगाने (एम.ई.आर.सी.) ठरविलेल्या दरानुसार होतो त्यात इंधन खर्चास्तिव केलेली समयोजना फी व देयके न केलेला वीज पुरवठा महसूल त्या हिशेबावर वर्षाअखेरपर्यंतचा समावेश असतो.

इतर उत्पन्न प्रत्यक्ष स्थितीनुसार करतात. भंगार विक्री किंवा निरुपयोगी कोळसा विक्री ही जेव्हा करार होतो त्यानुसार ठरते.

**(ज) गुंतवणूकी**

दीर्घकालीन गुंतवणूक ही त्यांच्या प्रत्यक्ष स्वरूपानुसार ठरते व त्यातून होणारी घट (ऱ्हास) जे असतील किंवा अपेक्षित असतील ते कायमस्वरूपी आहेत यास्तव केलेली तरतूद वजा केली जाते.

**च) परकीय चलनातील गुंतवणूक**

परदेशी चलनातील गुंतवणूक त्याच्या सुरुवातीच्या काळातील त्या चलनाचे मोल जे असेल त्यानुसार ठरते व नोंद होते. व्यवहार झाला त्या दिवशीचा परकीय चलनाचा दर हिशेबात धरला जातो.

परकीय चलनाचे विनिमय दरात होणाऱ्या बदलांमुळे होणारा फायदा/तोटा हा नफा-तोटा तक्त्यात दाखवला जातो.

**(छ) कर्मचारी हित/फायदे**

(i) कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे लघुकालीन फायदे

(ii) नोकरी (सेवाकाळ) संपल्या नंतरच्या काळात दिले जाणारे फायदे

**ठराविक अंशदान योजना**

ठराविक अंशदान योजना ह्या कर्मचारी सेवा निवृत्तिनंतर मिळणाऱ्या लाभाचा भाग आहे/असतो. त्या योजनेनुसार कंपनी ठराविक रक्कम ही त्याला देय ठरते (झालेला खर्च) त्यातून आधि केलेले अंशदान वजा होते. कंपनीचे ठराविक अंशदान योजनाना होणारे अंशदान हे नफातोटा तक्त्याने त्या आर्थिक वर्षाचा एक भाग म्हणून मान्य केलेला आहे.

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

**ठराविक फायदे योजना**

**उपदान आणि रजा न घेण्याबद्दल दिलेला रक्कम**

या उपार्जन खर्चास्तव तरतूद उपदान व रजा न घेतलेल्या काळाचे वेतन हे निवृत्तीनंतर दिले जाते व ते देयक म्हणून त्या वर्ष अखेरीला होणाऱ्या खर्चानुसार ठरते.

**भविष्य निर्वाह निधी फायदे**

कंपनी ठराविक रक्कम अंशदान म्हणून भविष्य निर्वाह निधीकडे जमा करते व ते अंशदान कर्मचाऱ्यांचे वेतनातून कापून घेतलेल्या अंशासह दिले जाते. याचे दर पूर्वीपासून ठरलेले असतातच. ह्या रकमा ठराविक विश्वस्त मंडळाकडे सुपूर्द केल्या जातात. ही विश्वस्त मंडळे इतरही अनेक कंपन्यांचे असे निधी स्वत:कडे ठेऊन त्याचे व्यवस्थापन करीत असतात. सरकारने मंजुरी दिलेल्या योजनांमध्ये हा निधी गुतवण्यात येतो. अशा भविष्य निर्वाह निधीला अस्थापन/कंपनी यांनी दिलेले अंशदान हे खर्च म्हणून मानले जाते व ते नफा-नुकसान तक्त्यात दाखवले जाते.

**ठराविक लाभ योजना**

**उपदान आणि रजेचा पगार रोखीत देणे.**

उपदान व रजेचा पगार या संबंधीची 'देय रक्कम' जी निवृत्तीनंतर कर्मचारीना दिली जाते त्यासाठी योग्य तरतूद ही दरसाल हिशेबाचे अखेरीस ठराविक रकमेची करायची असते.

**भविष्य निर्वाह निधी फायदे**

पूर्वी ठरलेल्या दरानुसार कंपनी भविष्य निर्वाह निधीच्या अंशदानाची रक्कम ठरवते व त्यासह कर्मचाऱ्यांचे वेतनातून कापून घेतलेली रक्कम विश्वस्त संस्थेकडे भरणा करते. विश्वस्त मंडळ हा निधी इतर कंपन्यांकडूनही जमा करते व सर्व रक्कम सरकारने ठरवून दिलेल्या गुंतवणूक योजनात गुंतवते. ठराविक काळासाठी या निधीला दिले जाणारे अंशदान हे खर्च म्हणूनच धरले जाते व ते नफा-नुकसान तक्त्यात तसे नोंदले जाते.

कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या ठराविक फायद्यांचा खर्च/रकमा या ताळेबंद पत्रकात नियोजित खर्च म्हणून मानला जातो व ते अमानित फायदा-तोटा व अमानित गतसेवासाठी खर्च म्हणून धरला जातो कुठलाही फायदा मालमत्ता (नकारात्मक) ठरवलेले फायदे/देणी ही या हिशेबात दिसतात. हा खर्च गतकालीन न ओळखलेले गतकालीन सेवेचा खर्च व उपलब्ध निधीचे सध्याचे मोल आणि कमी केलेला 'कमी योजना खर्च' असा धरला जातो.

**म) भाडेपट्टया**

**आर्थिक भाडेपट्टी**

जी मालमत्ता भाडेपट्टीवर आर्थिक निधी सहाय्याने मिळवली जाते महाराष्ट्र वीज सुधारित हस्तांतरण योजना २००५ (हस्तांतरण योजना) त्या भाडेपट्टीच्या भाड्याची रक्कम जेव्हा मिळेल तशी नफा-तोटा पत्रकावर दाखविली जाते.

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

५ जून २००५ नंतर मिळवलेली मालमत्ता ही आर्थिक भाडेपट्टी मालमत्ता म्हणून वर्गीकृत होते. इथे कंपनीला मालकी हक्कांचे सर्व फायदे व धोके पत्करायचे असतात व ती कमीत कमी न्याय्य किंमतीची धरली जाते अथवा कमीत कमी सध्याची किंमतीची मानली जाते. त्यावरील भाडेपट्टी कमीत कमी देय ठरते व त्यानुसार देय मोल ठरविण्यात येते. भाडेपट्टी योजनावरील भाडे हे देय व व्याज मोल यांच्यात धरली जात असून त्यातून कायमस्वरूपी व्याज दर प्रत्येक कालखंडासाठी निश्चित केला जातो.

**कार्यान्वित (चालू) भाडेपट्टी**

जी मालमत्ता भाडेपट्टीवर घेतली जाते व ज्या मालमत्तेवरील मालकी हक्क, फायदे हे परिणामकारकपणे स्वत:कडे ठेवले जातात त्याला कार्यान्वित किंवा चालू भाडेपट्टी (लीज) म्हणतात अशा कार्यान्वित भाडेपट्टीचे भाडे हे सरळ खर्च म्हणून धरले जाते.

**न) कराधान**

(i) **आयकर**

त्या-त्या वर्षीच्या करपात्र उत्पन्नावरील कर आयकर कायदा १९६१ अंतर्गत नियमांनुसार ठरतात व भरणा करण्याच्या कर रकमांमधून मान्यता प्राप्त सूट इत्यादि वजा होते.

(ii) **स्थगित कर**

स्थगित कर म्हणजे करपात्र उत्पन्न आणि हिशेबातील उत्पन्न यांच्या काळातील फरक. हे उत्पन्न एका कार्यालयात तयार होते व दुसऱ्या कार्यालयात ते मागे फिरवता येते. यात करभरणा दर व करभरणा कायदा यांचा योग्य विचार करून ताळेबंदात हे उत्पन्न दाखवण्यात येते. हे सर्व हिशेब मानक-२२ करभरणा हिशेब यानुसार केले जाते.

जो घसारा हिशेबात धरला गेला असेल किंवा जो तोटा पुढे हिशेबात घेतला असेल त्यातली स्थगित कर मालमत्ता ही केवळ त्याच्या भविष्यकालीन मान्यतेवर अवलंबून असते.

**ओ) गतकालीन कलम/बाबी आणि विशेष प्रकारच्या बाबी**

चुकीमुळे अथवा नजरचुकीने आर्थिक तक्त्यात राहून गेलेल्या बाबी या नंतरच्या आर्थिक हिशेबात ''गतकालीन'' अशा शीर्षकाखाली मांडायच्या असतात.

**प) तरतूदी, आकस्मिक तरतूदी व आकस्मिक मालमत्ता**

गतकालीन घटनांचा परिणाम म्हणून मोठ्या प्रमाणात तरतूद करावी लागली व चालू काळात त्याची जबाबदारी उचलावी लागते. अशा घटनांमधून कदाचित नवे उत्पन्न स्त्रोत्रही निर्माण होऊ शकतात.

आकस्मिक तरतूदी मान्य होत नाहीत, पण टीपांमध्ये दाखवल्या जातात अशा आकस्मिक तरतूदींचा आर्थिक परिणाम उपलब्ध माहितीनुसार दाखवता येतो. ज्या तारखेला आर्थिक हिशेब मंजूर होतात त्या काळापर्यंतची ही तरतूद दाखवायची असते.

आकस्मिक लाभ/मालमत्ता ही आर्थिक तक्त्यात कुठेही दाखवित नाहीत.

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

२. **पुर्नबांधणी योजना**

दिनांक ६ जून २००५ पर्यंतच्या कंपनीची मालमत्ता व देणी यात दाखवलेले समतोल हिशेब जे महाराष्ट्र वीज सुधारित हस्तांतरण योजना २००५ अंतर्गत या कंपनीकडे बदलून आले त्यानुसार पूर्वकालीन म. रा. वि. मं. च्या कर्जवाटप प्रक्रीये अंतर्गत बदल प्रक्रीयेतला घटक म्हणून व वारसदार म्हणून महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी कडून काही कर्जाचे संधारण (सर्व्हीसींग) काही असंतत काळासाठी केले जात असे. तर काही कर्जे अधून-मधून सविराम काळासाठी संधारण केली गेली ही कर्जे शेवटी या कंपनीकडे (म्हणजेच महाराष्ट्र वीज निर्मिती कंपनीकडे) सुपूर्द झाली व तशी ती धारणजमीन कंपनीने मंजूर केली याला धरुन खालील रकमा म.रा.वि.वि.कं.ली. ला दिलेल्या आहेत. या योजनेची अंतिम अधिसूचना मिळेपर्यंत या रकमांचा कुठलाही परिणाम ''राखीव'' कलमात दाखवलेला नाही. किंवा भाग-भांडवलाच्या निलंबन लेखा पत्रिकेतही दाखवलेला नाही. आणि हे म.रा.वि.वि.कं.ली. कडून येणी/देणेबाकी म्हणून दाखवून समयोजित केल्या आहेत.

| **विवरण** | **रक्कम** |
|---|---|
| कर्जफेड-आर.ई.सी. (To REC) ला | ७५०,०००,००० |
| अपरिवर्तनीय कर्जरोखे आय.एफ.सी.आय. (IFCI) ला | ९२४,८११,३५० |
| अपरिवर्तनीय कर्जरोखे बी.ई.एस.टी. (BEST) ला | १३,१२५,००० |
| **एकूण मुद्दल रकमेची परत फेड (A)** | **१,६८७,९३६,३५०** |
| लघु मुदतीची कर्जे व्याज भरणा इंडियन बँकेला (२००६-०७) करता | ६७१,८७१ |
| लघु मुदतीची कर्जे व्याज भरणा इंडियन बँकेला (२००५-०६) करता | ३८,५७९,०७४ |
| व्याज भरणा अपरिवर्तनीय कर्जरोखे बी.ई.एस.टी. (BEST) २००६-०७ करता | २,१९१,७०९ |
| व्याज भरणा अपरिवर्तनीय कर्जरोखे बी.ई.एस.टी. (BEST) २००५-०६ करता | ३,९३३,८५८ |
| आर.ई.सी. (REC) ला कर्जावरील व्याज २००५-०६ करता | १६,९५३,१२५ |
| अपरिवर्तनीय कर्जरोख्यावरील व्याज आय.एफ.सी.आय. (IFCI) २००५-०६ करता | ८९,६८८,९०३ |
| **व्याज भरणा - एकूण रक्कम (B)** | **१५२,०१८,५४०** |
| **म.रा.वि.वि.कं.ली. (MSETCL) भरलेली एकूण रक्कम (A)+(B)** | **१,८३९,९५४,८९०** |

३१ मार्च २००८ या वर्षकालासाठी अंतिम तक्ता अनुसूची ६ मध्ये कंपनी कायद्यानुसार तयार केलेला आहे. या आधिच्या काळी कंपनीची पद्धत ही वार्षिक हिशेब पत्रक बनविण्याची होती व ती नियम ५(१) वीज पुरवठा (वार्षिक हिशेब) नियम १९८५ यानुसार होती. त्यामुळे गतवर्षाचे आकडे पुनर्गठित केले आहेत व ते या वर्षीच्या पद्धतिनुसार जरूर तसे मांडले आहेत.

३. **भांडवली बांधिलकी**

संविदा (कॉन्ट्रॅक्ट) रकमा देणे वगैरेच्या बाकी आहेत त्या अंदाजे भांडवली खर्च रु. २,८५५.९० कोटी असून त्याची तरतूद झालेली नाही (गत वर्षीचे हिशेब ज्ञात होऊ शकले नाहीत).

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

४. **आकस्मिक देणी/दायित्वे (तरतूद न झालेली)**

(प्रत्येकी मोल रु. १० लाखाहून अधिक)

(i) अस्वीकृत (रिजेक्टेड) कोळसा उचलण्याचे कंत्राट 'कोहीनूर इन्फ्रास्ट्रक्चर', जळगाव यांना भुसावळ 'टी.पी.एस.' कडून ऑर्डर नं. BTPS/CGM/TECH/T-2/2007/P2420, दिनांक २८-४-०७ नुसार देण्यात आले. कोहीनूर इन्फ्रास्ट्रक्चर, जळगाव, यानी हे काम न केल्याने त्यातील बाबी व अटी आणि इतर संविदा बाबीनुसार त्यांची सुरक्षा ठेव रु. ५,३२३,००० ही जप्त (भुसावळ टी.पी.एस. कडून) झाली. तथापि या वादीने उच्च न्यायालयात (मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद) येथे दावा केला होता व तोही त्यांचे विरुद्ध गेला आहे.

(ii) रुपये २ कोटी ६३ लक्ष (गतसाली रु.२ कोटी ६३ लक्ष) केन्द्रीय उत्पादनशुल्क विभाग चंद्रपूर टी.पी.एस. साठी तयार केलेल्या सामानावर कर म्हणून मागितले ते कंपनीने वाद म्हणून देण्याचे नाकारले. आता हा विषय न्यायालयात प्रलंबित आहे. तथापि, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कंपनीने बँक हमीं रु. १८६.६६ लक्ष रकमेची दिली आहे. आणि रु. २१.३४ लक्ष एवढी रक्कम उत्पादनशुल्क अधिकाऱ्यांकडे जमा केली आहे. कंपनीचे या बाबतचे अपील केन्द्रीय उत्पादनशुल्क आयुक्तांकडे प्रलंबित आहे.

(iii) परळी येथील जमीनीसाठी द्यावयाची अधिक नुकसानभरपाई संबंधीचे अपील रु. ९.२६ कोटी आणि खापरखेडा येथील जमीनीसाठी रु. ४.५१ कोटी या बाबी न्यायालयात प्रलंबित आहेत. तरी यास्तव कुठलीही तरतूद केलेली नाही.

(iv) कामठी-खैरी धरणातून मिळालेल्या पाण्यासाठी पाटबंधारे विभागाने प्रभारित केलेले रु. १.९१ कोटी आणि कोराडी टी.पी.एस. कडून पुनर्लेखित रक्कम म्हणून कुठलीही तरतूद केलेली नाही.

(v) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित ही या अकस्मात व्याजभरणा दाव्या विषयी 'देय' ठरू शकते. हे एकूण व्याज १०६.९४ कोटी रुपये इतके आहे. (गतसाली ८७.१२ कोटी) डब्ल्यु.सी.एल., एस.सी.सी.एल. आणि एम.सी.एल. यांचे व्याजभरणा दावे (एकूण रु. १०६.९४ कोटी) गतसाल (रु. ८७.१२ कोटी) हे अशा काळासाठीचे आहेत जेव्हा-जेव्हा कुठलेही 'इंधन-पुरवठा' करार महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं. लि. आणि कोळसा पुरवणाऱ्या कंपन्या यांच्यामध्ये अस्तित्वात नव्हता. एस.ई.सी.एल. आणि एम.सी.एल. यांचे बाबतीत त्यांनी ज्या तत्वांनुसार हे वादग्रस्त दावे केले आहेत, ते महाराष्ट्र वीज निर्मिती कंपनी मर्यादित व कोळसा पुरवठा कंपनी यांच्यातील मान्य तत्वानुसार नाहीत व म्हणून कंपनीला ते मान्य नाहीत.

(vi) पाटबंधारे विभागाने मागणी केलेले पाण्यावरील 'स्वामित्व धन' (रॉयल्टी) हे तलावातील पाण्याची पातळी खालावली म्हणून मागितले आहे. तथापि यात चंद्रपूर नगरपालिकेने उचलेले पाणी पण समाविष्ट आहे. चंद्रपूर नगरपरिषद कुठलीही स्वामित्व धन (रॉयल्टी) सी.एस.टी.पी.एस. ला भरत नाही ही बाब चंद्रपूर नगरपरिषदेशी चर्चेत असून त्यांनी घेतलेल्या पाण्यासंबंधीचे पैसे वसूल करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. रु. १०.५२ कोटी जे पाटबंधारे विभागाने चंद्रपूर नगरपरिषदेकडे मागणी केली आहे (गतसाल रु. ४.६९ कोटी) हे ऑगस्ट १९९५ ते मार्च २००८ पर्यंतच्या काळाचे आहेत.

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

(vii) १९९४-९८ या काळात अतिकालिक (ओव्हरटाईम) वरील व्यावसायिक कर कपात करण्यात चूक झाली (तेव्हा तो कापला गेला नाही) तो १९९८ साली कापून भरणा करण्यात आला. या उशीरा भरणा केलेल्या कराप्रीत्यर्थ कारखान्याने रु. ७७२,५३०/- दंड आकारला होता. त्यावर रु. ७७२,५३०/- (तेवढ्याच रकमेचे) व्याज आकारले होते. याचे विरुद्ध कंपनीने अपील करून सहायक आयुक्त (अपील) विक्रीकर-अमरावती यांचे कडे रु. १९३,१३२/- भरणा केला. ही रक्कम व्याजाची होती. तर आणखी तेवढीच रक्कम दंड म्हणून भरणे आवश्यक ठरते बाकी रक्कम रु. १,१५८,७९६/- ही आकस्मिक देय आलेली रक्कम म्हणून दाखवली आहे.

(viii) जमीनीची वाढीव किंमत मिळावी म्हणून कोर्टात खटले चालू आहेत. संयुक्त, दिवाणी, दंडाधिकारी वरिष्ठ शाखा, चंद्रपूर यांचे न्यायालयात हे खटले प्रलंबित असून त्यांचे मोल रु. ४७,७६१,२४४/- एवढे आहे.

(ix) चंद्रपूर येथील औष्णिक वीज केंद्र मधील दोन जनित्रे (जनरेटर्स) प्रत्येकी ५०० मेगावॅट क्षमतेचे होते. त्यांच्यासाठी पुर्व जलोपचार कारखाना डीझाईन करून उभारणे आणि ते चालू करून देणे तसेच त्यासंबंधी सर्व आवश्यक बांधकाम (कन्स्ट्रक्शन) इत्यादिची निविदा आदेश नं. ४५४ दिनांक ४ मार्च १९८९ रोजी दिली होती. या कामाचे एकूण मोल रु. १५४,६७५,७१२/- एवढे होते. कंत्राटदार कंपनीने काम पूर्ण करून अतिरिक्त रु, १२,७३६,२३६/- या रकमेची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वीज कामा प्रीत्यर्थ असून, ती रक्कम न दिल्यास त्यावरचे व्याजही देय होत राहील. त्यांची ही मागणी कोराडी प्रकल्पावरील मुख्य अभियंता अमान्य केली असून त्यांचे (चीफ इंजीनीअरचे) म्हणणे असे की हा ''टर्नन्की'' प्रकल्प असल्यामुळे कंत्राटदाराची ही अतिरिक्त रकमेची मागणी गैरलागू ठरते. मेसर्स जीओ मिलर जे या कामाचे कंत्राटदार आहेत त्यांनी हा वाद लवादाकडे सुपूर्द केला. लवादाने मेसर्स जीओ मिलर्स यांचे बाजूने निकाल दिला व पूर्वकालीन म.रा.वि.मं. (MSEB) ला प्रदान केलेली रक्कम रु. ९,७७२,८३८/- ही भरण्याचा हुकुम दिला. अधिक त्यावरील व्याज (गतवर्षी रु. ९,७७२,८३८ अधिक व्याज) या लवादाचे प्रदानाविरोधात पूर्वकालीन म.रा. वि.मं. (MSEB) यांनी उच्च न्यायालयात दाद मागितलेली असून माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय येणे बाकी आहे.

(x) चंद्रपुर औष्णिक वीज केंन्द्रासाठी मुख्य अभियंता स्था.बा. १ यांनी कामाची आदेश क्रं. ९१६, दिनांक २० एप्रिल १९९९ या दिवशी काढली व त्यानुसार मेसर्स - विनोद मासाण्ड, नागपूर या कंत्राटदाराने मातीच्या भरावर असलेली रेल्वेलाईन काढून (परमनन्ट लींक) पी.एस.सी. स्लीपर पुरवठा व इतर परमनन्ट चे साहित्य पुरवणे अशा तऱ्हेने रेल्वे ट्रॅक क्रं. ७, चंद्रपूर औष्णिक वीज केंन्द्र पूर्ण करणे अशी कामे करायची होती. या कामाचे मोल रु. २७,१३१,७५२/- एवढे होते. पूर्वीच्या म.रा. वि.मं. (MSEB) कंपनीने पूर्वीच्या कंत्राटदारावर हलक्या प्रतीचे काम केल्याबद्दल रु. २४ लाख लावले होते. मेसर्स विनोद-भासाण्ड यांनी ते अमान्य करून वाद लवादाकडे सुपुर्द केला. त्यांनी म.रा.वि.मं. वर रु. ६०,२९८,५०६/- अधिक व्याज (गत वर्षी रु. ६०,२९८,५०६/- अधिक व्याज) दावा लावलेला होता. त्यात त्यांनी कामाच्या जागेचा ताबा उशीरा मिळणे, ठरलेल्या बीलाचे पैसे उशीरा चुकती करणे, मशीनरी वापर अपुरा असणे, इत्यादि कारणे लवादापुढे दिली आहेत. ही लवाद प्रक्रीया सुरू आहे व त्याचा निर्णय येणे बाकी आहे.

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

(xi) मेसर्स पिलकॉन इंजीनीअर्स, राजनांदगाव यांना 'रोड-ओव्हर ब्रिज' उभारणीचे कंत्राट, मुख्य अभियंता, स्थापत्य निर्मिती यांनी आदेश क्रं. ५७१ दिनांक ७ मार्च १९९८ रोजी दिले आहे. सदर काम 'नागपूर बल्लारशहा' या मुख्य रेल्वे मार्गावरील विवेकानंद नगर, चंद्रपूर या ठिकाणी उभारायचे आहे. या कामाची किंमत रु. २४,४३४,७५७/- एवढी आहे. पिलकॉन इंजीनीअर्स, राजनादगाव यांनी रु. ६५,३७१,९१७ इतक्या रकमेची मागणी केली ही मागणी अर्थातच त्यांनी पूर्वीच्या म.रा.वि.मं. (MSEB) कंपनीकडे केली. त्यासाठी त्यांनी खालील कारणे दिली आहेत:

केलेल्या/झालेल्या कामाचे पैसे न देणे, चुकीच्या कपातीचा परतावा, पी.व्ही. फॉर्म्युलानुसार पैसे देणे, वापरलेले स्टील सीमेंट व दिनांक १.३.२००३ पासूनचे मागणीवरील व्याज इत्यादि.

उपमुख्य अभियंता, स्थापत्य चंद्रपूर यांनी हे सर्व दावे नाकबूल करून फेटाळले आहेत व आता हा सर्व वाद लवादाकडे सुपूर्द केलेला आहे लवाद प्रक्रीया सुरू आहे. लवादाच्या अंतिम निर्णयाची वाट पाहातो आहोत.

(xii) मुख्य अभियंता, स्थापत्य निर्मिती यांनी आदेश क्रं. १८४२ दिनांक ३ ऑगस्ट १९९८ ही मेसर्स जॉर्ज कन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर यांना पुढील कामासाठी दिली आहे. खापरखेडा येथील औष्णिक वीज केंन्द्रामधील कामगार वर्गांसाठी शाळेच्या इमारती उभारणे. दिलेल्या आदेशानुसार कामाचे मोल रु. ९,९८१,४७२/- एवढे होते. मेसर्स जॉर्ज कन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर यांनी रु. १०,२०९,१८३/- नफ्यातील नुकसान भरपाई म्हणून मागणी केली. तसेच काम लांबल्यामुळे झालेला अतिरिक्त खर्च इत्यादी कारणे दिली आहेत. पूर्वकालीन म.रा.वि.मं. (MSEB) ने त्यांचे हे दावे फेटाळले असून मेसर्स जॉर्ज ॲण्ड कंपनी यानी हा वाद लवादाकडे सोपवला आहे. लवादाने जार्ज कन्स्ट्रक्शनच्या बाजूने निकाल दिला व पूर्वीच्या म.रा.वि.मं. (MSEB) ला रु. ६,४५१,३८०/- एवढी रक्कम जॉर्ज ॲण्ड कंपनीला द्यावी असा हुकुम दिला. म.रा.वि.मं. (MSEB) ने ह्या हुकुमाला नागपूर जिल्हा न्यायालयात आव्हान दिले असून त्यांचा निर्णय प्रलंबित आहे.

(xiii) मेसर्स एन्व्हॉरॉन्मेन्टल इंजीनीअर्स, नागपूर यांना मुख्य अभियंता, स्थापत्य निर्मिता यांनी आदेश क्रं. ४०६२ दिनांक २४ डिसेंबर १९९२ रोजी दिली असून, त्यानुसार त्यांनी ॲफ्ल्युअन्ट ट्रीटमेन्ट प्लान्ट उभारणीसाठी डिझाईन सादर करावा. मंजूर डिझाईननुसार प्लान्टची उभारणी करणे, साहित्य पुरवठा, तपासणी व कारखाना योग्य प्रकारे सुरू करून देणे अशी कामे/कर्तव्ये सोपविली आहेत. त्या आदेशामधे सर्व संबंधित बांधकाम करणे सामील आहेच. सदर प्लान्ट खापरखेडा वीज केन्द्र या ठिकाणी उभारणे अपेक्षित होते/आहे. या सर्व कामाचा मोबदला रु. २१,१९४,०१४/- इतका ठरला होता. मेसर्स एन्व्हॉरॉन्मेन्टल इंजीनीअर्स, नागपूर यांनी याच कामाचा रु. १५०,७९०,६८३/- इतक्या रकमेचे बील सादर करून मागणी केली. या वाढील रकमेच्या मागणीसाठी त्यांनी कामात झालेला विलंब, निवीदा आदेश देण्यात झालेला विलंब, बँक हमींच्या नूतनीकरणात झालेला विलंब बांधकामात झालेली वाढ प्लान्ट स्टीलर्स (Plant Stillers) च्या आकारात झालेली वाढ ही कारणे दिली आहेत. पूर्वीच्या म.रा.वि.मं. (MSEB) ने ही मागणी फेटाळली असून मेसर्स एन्व्हॉरॉन्मेन्टल इंजीनीअर्स यांनी हा वाद लवादाकडे सोपविला आहे. लवाद प्रक्रीया सुरू आहे व निर्णय प्रलंबित आहे.

(xiv) मार्च २००८ काळात बँक ऑफ महाराष्ट्रने अंदाजे रु. ३८ लाख ओव्हर ड्राफ्ट व्याज म्हणून कंपनीच्या खात्यावर लावले. हे व्याज चुकीचे, अयोग्य असल्याचे कंपनीने बँकेला सांगून सध्या यावर बँकेकडे दुरुस्तीसाठी चर्चा चालू आहे.

## नफा-तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

५. **भाग भांडवल**

**भाग प्रलंबित खाते**

(i) रु. २५,६३३,६३३,५३७/- (रु. दोन हजार पाचशे त्रेसष्ठ कोटी छत्तीस लक्ष तेहत्तीस हजार पाचशे सदतीस) एवढी रक्कम प्रलंबित भाग-भांडवल दाखविली असून कंपनीचे नावे जी शिल्लक रक्कम हस्तांतरण (बदल) योजने अंतर्गत मिळाली आहे. (पूर्वकालीन म.रा.वि.मं. (MSEB)) विभाजन झाल्यानंतर आलेली) या योजने अंतर्गत कंपनीने स्वत:चे समभाग विक्रीला आणणे गरजेचे असून, ते पूर्वीच्या म.रा.वि.मं. (MSEB) च्या नावे करायचे आहेत. तथापि हा सर्व बदल हा योजना अंतिमत: महाराष्ट्र राज्य सरकारने मंजूर केल्यानंतर करावयाची आहे.

(ii) **भाग-भांडवलासाठी अर्जाचे खाते (भाग-भांडवल आवेदन खाते)**

